बिना तोडफोड वास्तुदोष निवारण
पं. शिवरतनजी दाधीच
इचलकरंजी में
मकान, दुकान, फॅक्टरी, औद्योगिक, प्रतिष्ठान, फ्लॅट्स, अपार्टमेंट, वास्तूगाईड, जन्मपत्रिका, हस्तरेखा, फेस रिडींग, ग्रहपीडा निवारण, घर में अशांती, लक्ष्मी बंधन, यंत्र से दोष निवारण, ग्रहरत्न, परामर्श, वास्तुशास्त्र की पुस्तक हिंदी, मराठी व गुजराथी भाषा में उपलब्ध!

Visit to Appointment 9825146557

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

One Third Company
9309895680
Maruti Suzuki Ertiga

BOOK NOW
SHOWROOM
TOP MODEL 8.5 LAKH-CNG

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

## पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करा

### न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले; पेन्शनला पैसे नाहीत, पण योजनेसाठी कोट्यवधी?



■ मुंबई,ता.१०-

**महायुती सरकारची महत्त्वपूर्ण योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला तीव्र शब्दांत सुनावले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्यास ही योजना बंद करण्याचा विचार करा, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या टिप्पणीमुळे राज्याच्या आर्थिक धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

ही सुनावणी एका निवृत्त महिलेच्या याचिकेवर झाली. मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या या महिलेने सातव्या वेतन आयोगानुसार मिळणारे निवृत्तीवेतन आणि इतर लाभ न मिळाल्यामुळे न्यायालयात धाव घेतली होती. यावर पालिकेच्या वकिलांनी कोर्टात मांडले की, या लाभांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नाही, कारण राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळत नाही. यावर न्यायालयाने कठोर शब्दांत प्रतिक्रिया देत सरकारच्या (पान २ वर)

**सरकारच्या भूमिकेकडे लक्ष**

राज्य सरकारने लाभार्थ्यांची सखोल पडताळणी सुरू केली आहे. पात्रता निकष पूर्ण न करणाऱ्या तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम महिलांनाही योजनेचा लाभ मिळत असल्याचे आढळल्याने केवायसी मोहीम राबवण्यात आली. त्यामुळे मोठ्या संख्येने लाभार्थी कमी झाले आहेत. मात्र, न्यायालयाच्या निरीक्षणानंतर आता या योजनेबाबत सरकार काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## यमुनेत बोट उलटून दहा पर्यटकांचा मृत्यू

### उत्तरप्रदेशमधील दुर्घटना ; अनेकजण बेपत्ता

■ वृंदावन,ता.१०-

**उत्तरप्रदेशच्या वृंदावनमध्ये शुक्रवारी दुपारी यमुना नदीत मोठा अपघात घडला. पंजाबच्या मुक्तसर येथून आलेल्या भाविकांनी भरलेली मोटर बोट असंतुलित होऊन उलटली आणि सर्व प्रवासी नदीत बुडाले. त्यापैकी १० जणांचे मृतदेह हाती लागले आहेत.**



यासंदर्भातील माहितीनुसार, पंजाबहून आलेले सुमारे ३२ भाविक या बोटीत होते. हे सर्व भाविक सकाळीच वृंदावन येथे पोहोचले होते आणि निधिवनाचे दर्शन घेतल्यानंतर यमुना नदीत पर्यटनासाठी गेले होते. केशीघाट येथे ते मोटर बोटीत बसले होते. अपघाताबाबत (पान २ वर)

## नितीश कुमार यांचा नवा राजकीय प्रवास

■ नवी दिल्ली,ता.१०-



**बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल (युनायटेड) चे राष्ट्रीय अध्यक्ष नितीश कुमार आज राज्यसभेतून आपल्या नव्या राजकीय प्रवासाची सुरुवात करत आहेत. शुक्रवारी दुपारी त्यांनी राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. यासाठी विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यसभेत सर्व तयारी आधीच पूर्ण करण्यात आली होती.**

मुख्यमंत्री नितीश कुमार आज (पान २ वर)

## छत्तीसगडमध्ये अपघात; चिमुकल्यासह ६ ठार

■ रायपूर,ता.१०-

**छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यातील कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी उशिरा रात्री नाथिया नवागावाजवळ दोन गाड्यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. मृत कुटुंब कांकेरमधील उडकुडा येथील रहिवासी होते. सांगितले जात आहे की, सर्वजण चीवरांज येथे लग्न समारंभाला उपस्थित राहून आपल्या (पान २ वर)

## मुलीसोबत चॅटिंग केल्याच्या रागातून युवकाचा खून

■ फलटण,ता.१०(वार्ताहर)-

**एका मुलीसोबत मोबाईलवर चॅटिंग केल्याच्या रागातून १८ वर्षीय युवकाला चार जणांनी लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण करत त्याचा निर्घृण खून केल्याची घटना मध्यरात्री फलटण तालुक्यातील ढवळ पाटी येथे घडली आहे. या घटनेमुळे फलटण तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून याप्रकरणी मृत युवकाच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून चार जणांविरुद्ध फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**फलटण तालुक्यातील घटना**

सोमनाथ संदीप जाधव (वय १८ रा.फलटण) असे या अमानुष मारहाणीत मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस ठाण्यात दाखल एफआयआर मध्ये नमूद केल्याप्रमाणे मृत सोमनाथ हा गुरूवारी रात्री जेवण करून घराबाहेर अंगणात झोपला होता. रात्री एक वाजण्याच्या सुमारास सोमनाथच्या वडिलांच्या मोबाईलवर सोमनाथच्याच मोबाईलनंबर वरून एका व्यक्तीचा फोन आला. त्या व्यक्तीने त्यांना तात्काळ पाटी येथे बोलवून घेतले. वडील तेथे पोहोचले असता एका लाल रंगाच्या कारमधून दोघेजण आणि त्यांचा मुलगा सोमनाथ खाली उतरले. त्या व्यक्तीने वडिलांना सांगितले की, तुमचा मुलगा आमच्या बहिणीशी मोबाईलवर चॅटिंग करत आहे. त्यामुळे आम्ही त्याला मारहाण (पान २ वर)

## शस्त्रसंधी करारात सहभागी होण्यास इराणचा नकार

■ वॉशिंग्टन,ता.१०-

**इराणने पाकिस्तानमधील शस्त्रसंधी करारात सहभागी होण्यास नकार दिला आहे. इराणी माध्यम फर्स न्यूज एजन्सीच्या वृत्तानुसार, लेबनॉनमध्ये शस्त्रसंधी लागू होईपर्यंत वाटाघाटी करणार नाही, असे इराणने म्हटले आहे.**

लेबनॉनमध्ये इस्रायलकडून सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे इराण नाराज आहे आणि याच कारणामुळे त्यांनी वाटाघाटींच्या संदर्भात कठोर भूमिका घेतली आहे. आतापर्यंत, या बैठकीत सहभागी होण्याबाबत त्यांच्याकडून कोणतेही स्पष्ट संकेत मिळालेले नाहीत.

यापूर्वी, अमेरिकन वेबसाइट वॉल स्ट्रीट जर्नलने वृत्त दिले होते की, संसद अध्यक्ष गालिबाफ (पान २ वर)

## ऑपरेशन टायगर केवळ राजकीय स्टंट

### 'खासदार फुटणार' वृत्ताचे सूत्रधार उबाठाचेच नेते

■ ठाणे,ता.१०-

**एकामागून एक निवडणुकांमध्ये झालेले दारुण पराभव, नेतृत्वाचे अपयश आणि पक्षांतर्गत उफाळून आलेल्या नाराजीवरुन लक्ष हटवण्यासाठी उबाठाचे नेते खासदार फुटणार, ऑपरेशन टायगर, अशा खोट्या बातम्या माध्यमांमध्ये पसरवण्याची केविलवाणी धडपड करत आहेत, अशी घणाघाती टीका शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांनी केली. शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ**



**शिंदे आणि उबाठा खासदारांमध्ये झालेल्या बैठकीचे वृत्त खासदार म्हस्के यांनी फेटाळून लावले. ठाणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**

खासदार म्हस्के म्हणाले की, शिवसेनेचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील सर्वपक्षीय खासदारांसाठी स्नेह भोजन आयोजित केले होते. (पान २ वर)

## आयटी कंपनीतील आरोपींना एनसी

■ नाशिक,ता.१०-

**मल्टिनॅशनल आयटी कंपनीमध्ये महिलांच्या लैंगिक अत्याचाराबाबत असलेल्या पाच आरोपींना न्यायालयीन कोठडी दिली आहे. तर ऑपरेशन मॅनेजर असलेल्या एका महिलेला १३ तारखेपर्यंत पोलीस कोठडी दिलेली आहे दरम्यान पोलीस दुसऱ्या गुन्ह्यांमध्ये या आरोपींना उद्या शनिवारी अटक करण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.**

नाशिक मधील टाटा उद्योग समूहाच्या टीसीएस या आयटी कंपनीमध्ये काम करणाऱ्या मुस्लिम समाजाच्या अधिकारी आणि काही (पान २ वर)

## कुपवाडमध्ये दोन एटीएम मशीन फोडले

■ कुपवाड,ता.१०(प्रतिनिधी)-

**शहरातील वर्दळीच्या आर.पी.पाटील चौकात आज पहाटे अज्ञात चोरट्यांनी दोन एटीएम मशीन फोडून रोकड लंपास करण्याचा धाडसी प्रयत्न केला. मात्र, सुदैवाने चोरट्यांचा हा प्रयत्न फसला असून एसबीआय एटीएममधील सुमारे १३ लाख ५० हजार रुपयांची रोकड सुरक्षित बचावली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली आहे.**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी आर.पी.पाटील चौकातील आठवडा बाजार परिसरात असलेल्या हिताची आणि एसबीआय या दोन एटीएमना लक्ष्य केले. चोरट्यांनी प्रथम हिताची एटीएमचे शटर उचकावून आत प्रवेश केला. त्यांनी मशीनची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली, परंतु त्या मशीनमध्ये रोख रक्कम नसल्यामुळे त्यांच्या हाती काहीच लागले नाही. (पान २ वर)

## कागल मेडिकल हब म्हणून नावारूपाला

### मंत्री हसन मुश्रीफ

■ कागल,ता.१०(प्रतिनिधी)-

**कागल शहर हे संपूर्ण महाराष्ट्राचे मेडिकल हब म्हणून नावारूपाला येत आहे. या शहरालगतच १०० बेड्सचे ग्रामीण रुग्णालय प्रशिक्षण पथक, मौजे सांगाव येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, पिंपळगाव खुर्द येथील शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय यामुळे वैद्यकीयदृष्ट्या कागलचे महत्त्व वाढतच आहे, असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.**



**कागल-शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागाचा लोकार्पण सोहळा वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते संपन्न झाला, त्याप्रसंगीचे छायाचित्र.**

शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालयाच्या कागलमधील बाह्यरुग्ण विभागाच्या लोकार्पण सोहळ्यात मंत्री श्री. मुश्रीफ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. जागतिक आरोग्य दिनाच्या औचित्यावर या कार्यक्रमाचे (पान २ वर)

## कोल्हापूर बाजार समितीच्या सभापतीपदी नानासो कांबळे

■ कोल्हापूर,ता.१०(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी साके (ता.कागल) येथील नानासो धर्मा कांबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शुक्रवारी झालेल्या विशेष सभेत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. एका सामान्य शेतकरी कुटुंबातील कार्यकर्त्याला जिल्हास्तरावरील महत्त्वाच्या संस्थेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याने याकडे विशेष लक्ष वेधले जात आहे.**

सभापती पदासाठी नानासो कांबळे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. त्यांच्या अर्जाला मावळते सभापती सूर्यकांत पाटील यांनी सूचक म्हणून तर शेखर देसाई यांनी अनुमोदक म्हणून पाठिंबा दिला. निवडणूक निर्णय अधिकारी प्रिया दळणर यांनी कांबळे यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

नानासो कांबळे हे माजी आमदार संजय घाटगे यांचे समर्थक मानले जातात. त्यांनी यापूर्वी २००७ ते २०१२ या (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १४९५०० रु. | २३८००० रु. |

अंडी ४८० रुपये शेकडा

**हास्यतुषार** -सुरेंद्र दास




खरात प्रकरणाची चर्चा दुसरीकडे वळवण्यासाठी या फोडाफोडीच्या वावड्या उडवायचा हेही राजकारणच..!

## अफगाणिस्तानमध्ये पूर, भूकंप आणि भूस्खलन

### १४८ लोकांचा मृत्यू

■ काबुल,ता.१०-

अफगाणिस्तानमध्ये गेल्या दोन आठवड्यांपासून हवामानाने प्रचंड कहर माजवला आहे. मुसळधार पाऊस, अचानक आलेले पूर, भूस्खलन, भूकंप आणि वीज कोसळण्याच्या घटनांनी देश हादरून गेला आहे. या आपत्तींमध्ये आतापर्यंत १४८ जणांचा मृत्यू झाला असून २१६ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. परिस्थिती इतकी गंभीर आहे की हजारो कुटुंबे बेघर झाली आहेत आणि अनेक भागांमध्ये जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.



माहितीनुसार, अफगाणिस्तानच्या अनेक भागांमध्ये (पान २ वर)

## अशोक खरात प्रकरणात १६० जीबी डेटा जप्त

### चाकणकरांच्या बहिणीला नोटीस

■ नाशिक,ता.१०-

**नाशिकमध्ये चर्चेत असलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणात नवे धक्कादायक तपशील समोर आले आहेत. तपास यंत्रणांनी तब्बल १६० जीबी इतका डिजिटल डेटा जप्त केला असून, या पुराव्यांमुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. दरम्यान या सर्व प्रकरणांमध्ये आता रूपाली चाकणकर यांची बहीण व तिच्या मुलाचे खाते सापडले असल्याने शिर्डी पोलिसांनी जबाबसाठी हजर राहण्याची नोटीस बजावली आहे.**



फॉरेन्सिक तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित अहवाल विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सादर करण्यात आला आहे. या नव्या पुराव्यांमुळे (पान २ वर)

|| सोळावे पुण्यस्मरण ||



म. हाजी हैदर नबीसाहब गजबरवाडी

आपलं असणं आमच्यासाठी सर्व काही होतं
ते आपल्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं
आज सर्व काही असण्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणे ही मोठी उणीव आहे.

गजबरवाडी परिवार, संग्राम चौक, इचलकरंजी.

(पान १ वरून)

# नितीश कुमार यांचा नवा राजकीय प्रवास

आपल्या निवासस्थानावरून निघून राज्यसभेत पोहोचले. यावेळी केंद्रीय मंत्री ललन सिंह, जदयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हेही त्यांच्या सोबत होते. १६ मार्च रोजी नितीश कुमार राज्यसभा सदस्य म्हणून निवडून आले होते. ३० मार्च रोजी त्यांनी विधान परिषद सदस्यपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आज त्यांनी राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. पुढील तीन ते चार दिवसांत ते आपला मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा राज्यपालांकडे सादर करणार आहेत.

दरम्यान, ९ एप्रिल रोजी दिल्लीत पोहोचलेल्या नितीश कुमार यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, आता आम्ही इथेच राहणार आहोत, तिकडे नव्या लोकांना संधी मिळेल. इथे (दिल्लीत) बराच काळ काम केले आहे, आता पुन्हा इथेच काम करणार आहे. बिहारमध्ये २० वर्षे खूप काम केले आहे आणि ते काम पुढेही सुरू राहील.

# आयटी कंपनीतील आरोपींना एनसी

कर्मचाऱ्यांनी एकत्र संगनमत करून या ठिकाणी हिंदू धर्मातील आर्थिक अडचणीत असलेल्या तसेच काही महिलांना आणि मुलींना हेरुन त्यांना विविध ठिकाणी पार्टीला घेऊन जाणे. त्या ठिकाणी त्यांच्यावरती लैंगिक अत्याचार करणे तसेच आर्थिक छळवणूक करणे याबरोबरच नको त्या मार्गाचा वापर त्यांच्यावर करण्यात आला. या महिला व मुलींना इस्लाम धर्म स्वीकारण्यासंदर्भामध्ये बळजबरी करण्यात येत होती. हा प्रकार मागील चार वर्षापासून सुरू होता. पण यातील एका महिलेने पुढे येऊन अतिशय हिमतीने नाशिक पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली आणि त्यानंतर या प्रकरणाला खरी वाचा फुटली. एका मागोमाग एक अशा एकूण नऊ तक्रारी दाखल झाल्या. या प्रकरणात पोलिसांनी सहाजणांवर गुन्हा नोंदवला होता.

या प्रकरणामध्ये पोलिसांनी तीन दिवसांपूर्वी तौसीफ अत्तर, रजा मेमन, शाहरुख कुरैशी, शफी शेख और आसिफ अंसारी या आरोपींना अटक केलेली होती. या आरोपींना न्यायालयाने आज शुक्रवार पर्यंत पोलीस कोठडी दिली होती ती कोठडी संपल्यानंतर त्यांना आज न्यायमूर्ती आर.सी. नरवाडिया यांच्या न्यायालयात सादर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे

# छत्तीसगडमध्ये अपघात; चिमुकल्यासह ६ ठार

१२गावाकडे उडकुडाला परतत होते. त्यावेळी नाथिया नवागावाजवळ त्यांच्या गाडीची दुसऱ्या गाडीशी धडक झाली. दोन्ही गाड्या वेगात होत्या आणि धडक इतकी भीषण होती की वाहनांचे तुकडे तुकडे झाले.

गाडीमधील एकाच कुटुंबातील ३ महिला, २ पुरुष आणि एका मुलाचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या गाडीमधील ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. कांकेरचे पोलीस अधीक्षक निखिल राखेचा यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. डॉक्टरांच्या माहितीनुसार, सर्वांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे.

# मुलीसोबत चॅटिंग केल्याच्या रागातून युवकाचा खून

केली असून त्याला जिवंत ठेवणार नाही. असे सांगत असताना तेथे आणखीन दोघेजण मोटरसायकलवरून आले. त्यानंतर त्या चौघांनी मिळून सोमनाथला लाथा बुक्क्यांनी तोंडावर छातीवर पोटावर अमानुष मारहाण करण्यास सुरुवात केली. जीव वाचवण्यासाठी सोमनाथ पळू लागला. मात्र आरोपींनी त्याचा पाठलाग करून ढवळ पाटीवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयाजवळील पटांगणात त्याला गाठले. तेथे त्याला पुन्हा बेदम मारहाण करून डांबरी रस्त्यावर आपटले. त्यावेळी एका स्थानिक नागरिकांने मदतीसाठी धाव घेतली असता ते चौघे आरोपी कार आणि दुचाकीवरून पसार झाले. या गंभीर मारहाणीत सोमनाथ बेशुद्ध पडला होता. त्याला उपचारासाठी तात्काळ फलटण येथे रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली होती.

या धक्कादायक घटने प्रकरणी मृत सोमनाथ वडील संदीप उमाजी जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात मुलीच्या नातेवाईकासह एकूण चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पैसे नसतील तर लाडकी बहीण योजना बंद करा

(पान १ वरून)

प्राधान्यक्रमांवर सवाल उपस्थित केला. न्यायालयाने विचारले की, लाडकी बहीण योजनेसाठी ४० हजार कोटी रुपये खर्च करता, मग पेन्शनसाठी पैसे कसे नाहीत? सरकारच्या या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा परिस्थितीत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे. जर निधीची कमतरता असेल, तर अशा मोठ्या योजनांचा पुनर्विचार करावा, असेही न्यायालयाने सूचित केले. या वक्तव्यामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचेही समोर आले आहे. या योजनेअंतर्गत सुमारे २ कोटी ४३ लाख महिलांनी नोंदणी केली होती. प्रत्येक लाभार्थी महिलेला दरमहा १,५०० रुपये दिले जात असल्याने वार्षिक खर्च सुमारे ४३ हजार ७४० कोटी रुपयांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे राज्याच्या आर्थिक संतुलनावर या योजनेचा परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

योजनेतील पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. महिला व बालकल्याण विभागाने केलेल्या पडताळणीत ७१ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे या महिलांना योजनेतून वगळण्यात आले. तसेच काही प्रकरणांमध्ये सरकारी कर्मचारी, तसेच महिलांच्या नावावर पुरुषांनीही लाभ घेतल्याचे आढळून आले. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी समोर आल्या आहेत.

# शिवाजी विद्यापीठात पदोन्नतीसाठी ठिय्या आंदोलन

## प्रशासनाकडून आदेश काढण्याची ग्वाही

■ कोल्हापूर,ता.१०(प्रतिनिधी)–

**विविध संवर्गातील प्रलंबित पदोन्नती तातडीने देण्यात याव्यात या मागणीसाठी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी ठिय्या आंदोलन करण्यात आले. सकाळपासून सुरू झालेल्या या आंदोलनानंतर प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने दुपारी आंदोलन मागे घेण्यात आले.**

शुक्रवारी सकाळी विद्यापीठातील कर्मचारी मोठ्या संख्येने एकवटले. सेवक संघाच्या नेतृत्वाखाली प्रवेशद्वारासमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी कुलसचिवांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले. कोणतीही पूर्वसूचना न देता आंदोलन सुरू झाल्याने कामानिमित्त विद्यापीठात आलेल्या नागरिकांना काही काळ प्रतीक्षा करावी लागली.

विद्यापीठातील उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, अधीक्षक, सहायक अधीक्षक, वरिष्ठ लेखनिक व लेखनिक या पदांच्या पदोन्नतीचा विषय दीर्घकाळ प्रलंबित होता. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी होती. पदोन्नती लवकर व्हावी यासाठी संघटनेकडून सातत्याने पाठपुरावा सुरू होता.

दरम्यान, कुलसचिव व्ही. एन. शिंदे कार्यालयात आल्यानंतर चर्चेला सुरुवात झाली. प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव शिंदे, संबंधित अधिकारी विभा अंत्रेडी आणि सेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीत प्रशासनाकडून पदोन्नतीचा विषय लवकर मार्गी लावण्यात येईल, अशी ग्वाही देण्यात आली. काही पदोन्नतीचे आदेश सोमवारी काढण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच संबंधित प्रक्रियेला गती देण्याचे निर्देशही देण्यात आले. प्रशासनाकडून ठोस आश्वासन मिळाल्यानंतर सेवक संघाने आंदोलन मागे घेतले. सकाळपासून सुरू असलेले आंदोलन दुपारी स्थगित करण्यात आले.

# चौंडेश्वरी गृहनिर्माणच्या सदाशिवराव सातपुते उद्यानाचे आज उदघाटन

■ तारदाळ,ता.१०(वार्ताहर)–

**तारदाळ गावच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या तारदाळ-खोतवाडी रोडलगत वसलेल्या चौंडेश्वरी गृहनिर्माण सह. संस्थेच्या कै. सदाशिवराव सातपुते या उद्यानाचा उदघाटन समारंभ अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत शनिवार दि.११ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता संपन्न होत आहे.**

उदघाटन समारंभ माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी आम. डॉ. राहुल आवाडे असणार आहेत. यावेळी जि.प. सदस्या सौ. सानिका आवाडे यड्रावकर-पाटील, देवांग समाज अध्यक्ष विश्वनाथ मुसळे व चौंडेश्वरी परिवारातील सर्व संस्थांचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तारदाळ परिसरातील एक अद्ययावत कॉलनी सर्व सोयीनियुक्त सेवा देणारी कॉलनी म्हणून चौंडेश्वरी गृहनिर्माण संस्थेचा उल्लेख केला जातो. येथे बगीचा उभारला असून याठिकाणी लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी, व्यायामाचे साहित्य उपलब्ध आहे. तसेच ज्येष्ठांना हे एक विरंगुळा केंद्र ठरणार आहे. लहान-सहान कार्यक्रमासाठी हे उद्यान वापरात दिले जाणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे चेअरमन महेश सातपुते, व्हा.चेअरमन शशिकांत हावळे, सेक्रेटरी दशरथ पाटील, सर्व संचालक व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



**चौंडेश्वरी गृहनिर्माणच्या वतीने उभारण्यात आलेल्या सदाशिवराव सातपुते उद्यानाचे छायाचित्र.**

# कागल मेडिकल हब म्हणून नावारूपाला

(पान १ वरून)

आयोजन केले होते. श्री. मुश्रीफ पुढे म्हणाले, या बाह्य रुग्ण विभागात मेडिसिन विभाग, सर्जरी विभाग, बालरोग विभाग, स्त्रीरोग विभाग, इमर्जन्सी सेवा विभाग कार्यरत राहणार आहेत. लवकरच सर्व रक्त तपासण्यांसाठी पॅथॉलॉजी, एक्स-रे यंत्रसामुग्री, फिजिओथेरपी आणि योगा या सुविधाही उपलब्ध होणार आहेत. येथे उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांवर ईश्वरसेवा मानून उपचार करा. जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शिल्पालाई खोत, कागल नगराध्यक्षा सौ. सविता माने, कागल पंचायत समिती सभापती सौ.सुवर्णा पाटील, केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने, कागल पंचायत समिती उपसभापती डॉ. इंद्रजीत पाटील, कागल नगरपालिकेचे मुख्याधिकारी अजय पाटणकर, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अभिजीत अहिरे, डॉ. राजकुमार पाटील, डॉ. भाग्यश्री खोत आदी प्रमुख उपस्थित होते. स्वागत डॉ. रोझारीओ डिसोजा यांनी केले. प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. अभिजीत अहिरे यांनी केले. आभार स्वप्नाली बावरे यांनी मानले.

# अशोक खरात प्रकरणात १६० जीबी डेटा जप्त

(पान १ वरून)

अशोक खरात यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपासादरम्यान विविध डिजिटल उपकरणांतून मोठ्या प्रमाणावर माहिती मिळाली आहे. तीन पेन ड्राइव्हमधील ३२ जीबी डेटा, त्यामधील १९ स्वतंत्र फोल्डर्स, ६४ जीबी क्षमतेचा ओटीजी पेन ड्राइव्ह तसेच एक लॅपटॉप यांची तपासणी करण्यात आली. या सर्व उपकरणांतील माहिती सायबर आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांकडून सखोल तपासली जात असून, एकूण १६० जीबीपेक्षा अधिक डेटा तपास यंत्रणांच्या हाती लागला आहे.या डिजिटल पुराव्यांमधून नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत घडलेल्या घटनांचा तपशील उघड झाला आहे. विशेषतः कॅनडा कॉर्नर परिसरातील कार्यालयातून जप्त केलेल्या माहितीमुळे अनेक बाबी स्पष्ट होत आहेत. तपास यंत्रणांनी प्रत्येक पुराव्याचे ए,बी आणि सी अशा कोडमध्ये वर्गीकरण केले असून, ए गटातील माहिती अत्यंत संवेदनशील असल्याचे समोर आले आहे. याशिवाय, या प्रकरणात साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले असून न्यायालयात सादर करण्यासाठी पुरावे व्यवस्थित गोळा केले जात आहेत. डिजिटल माहिती आणि साक्षीदारांच्या जबाबांमुळे तपास अधिक मजबूत झाला आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी नवे पैलू समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणातील तिसऱ्या गुन्ह्यात अशोक खरात यांना नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# तंत्रज्ञानामुळे निदान, उपचार पध्दती अचूक-डॉ.रानडे

■ कोल्हापूर,ता.१०–

**कृत्रिम बुध्दीमत्ता डिजीटल हेल्थ, टेलीमेडीसीनच्या वापरामुळे रूग्णांच्या लक्षणांचे विश्लेषण कमी वेळेत होऊन रोगांचे अचूक निदान करणे सोपे झाले आहे, असे प्रतिपादन होमिओपॅथिकतज्ञ डॉ. संतोष रानडे यांनी केले.**

पंचाचार्य होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालयामध्ये जागतिक होमिओपॅथी दिन व होमिओपॅथिचे जनक डॉ. सॅम्युअल हनिमान यांची जयंती साजरी झाली. यानिमित्त संजीवनी रूग्णालयात मोफत सर्वरोग निदान, औषधोपचार शिबिर आयोजीत केले होते. शिबीराचे उदघाटन डॉ.एम.आर.कुलकर्णी यांचे हस्ते झाले.

कृत्रिम बुध्दीमत्ता आणि होमिओपॅथी, या विषयावर बोलताना डॉ. संतोष रानडे म्हणाले की, नव्या तंत्रज्ञानामुळे निदान आणि उपचार पध्दती अगदी अचूक आणि परिणामकारक होत आहेत. होमिओपॅथीचा जन्म जर्मनीमध्ये झाला तरी ही चिकीत्सा प्रणाली भारतामध्ये खूप लोकप्रिय आहे. होमिओपॅथीमुळे बऱ्याच प्रमाणात शस्त्रक्रिया देखील टाळता येतात. होमिओपॅथी जगातील दुसऱ्या क्रमांकाची औषधप्रणाली आहे.

यावेळी प्राचार्य डॉ.राजकुमार पाटील, डॉ.सुहास पाटील, डॉ.फरजाना मुकादम, डॉ. सुजाता कामिरे, डॉ.मिलींद गायकवाड, डॉ.सचिन कुलकर्णी, डॉ.दिपाली पाटील, डॉ.सुनेत्रा शिराळे, डॉ.वर्षा पाटील, डॉ. रूपाली पाटील, डॉ.सचिन मगदूम, डॉ. महेश पटेल, डॉ.दिपक लडगे, डॉ.रितू सुतार, डॉ.शिवानी पाटील, डॉ. प्रियांका चोपदार, डॉ.श्रध्दा काकडे, डॉ. चंद्रकांत मुळे, डॉ.धनश्री पाटील यांचेसह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. रूग्णालयामध्ये एप्रिल अखेर सर्व रक्त चाचण्या अल्प दरात करण्यासह सर्वसाधारण शस्त्रक्रिया व औषधोपचार पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत.



**डॉ. हनिमान यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना डॉ.एम.आर. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.राजकुमार पाटील, डॉ. संतोष रानडे, डॉ. फरजाना मुकादम, डॉ. सुजाता कामिरे व इतर.**

# अफगाणिस्तानमध्ये पूर, भूकंप आणि भूस्खलन

(पान १ वरून)

सतत खराब हवामानामुळे परिस्थिती अधिकच बिकट होत आहे. मदत संस्थांच्या म्हणण्यानुसार, ही आपत्ती केवळ जीवित व मालमत्तेचे नुकसान करत नाही, तर देशात मानवी संकटही निर्माण करत आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर असून तेथे लोकांकडे बचावाची साधनेही उपलब्ध नाहीत.

पूर्व अफगाणिस्तानातील नंगरहार प्रांत या आपत्तीने सर्वाधिक प्रभावित झाला आहे. येथे मागील दोन दिवसांतच २४ जणांचा मृत्यू झाला असून ३३ जण जखमी झाले आहेत. अनेक लोकांचा मृत्यू घरांच्या छत कोसळणे, पुराचे पाणी आणि वादळ यामुळे झाला आहे. या भागात १,१४९ घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून रस्ते, शेती आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. अहवालानुसार, ७,५०० हून अधिक कुटुंबे या आपत्तीमुळे प्रभावित झाली आहेत.

पुराच्या पाण्याने गावे आणि शहरे जलमय झाली आहेत. अनेक लोक अडकले होते, ज्यांना हवाई मार्गाने सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. रस्ते तुटल्यामुळे काबुल आणि इतर प्रांतांमधील संपर्क खंडित झाला आहे, ज्यामुळे मदत कार्यात अडथळे निर्माण होत आहेत.

हवामान खात्याने इशारा दिला आहे की येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी बिघडू शकते. त्यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मृत्यू आणि नुकसानीचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# शस्त्रसंधी करारात सहभागी होण्यास इराणचा नकार

(पान १ वरून)

आणि परराष्ट्र मंत्री अराघची यांच्यासह एक इराणी शिष्टमंडळ गुरुवारी संध्याकाळी पाकिस्तानात दाखल झाले. तथापि, फर्स न्यूजने हे वृत्त खोटे असल्याचे सांगत फेटाळून लावले. यापूर्वी, ७ एप्रिल रोजी अमेरिका आणि इराण दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधीवर सहमत झाले होते. दोन्ही देशांचे नेते बैठकीसाठी पाकिस्तानात भेटतील, असेही ठरले होते. ही चर्चा शनिवारी इस्लामाबादमध्ये होणार आहे. यासाठी अमेरिकन शिष्टमंडळ आज इस्लामाबादमध्ये दाखल होईल.

# अमेरिकेच्या हल्ल्यात जखमी इराणचे माजी मंत्री खर्राजी यांचे निधन

तेहरान,ता.१०–

**इराणचे माजी परराष्ट्र मंत्री कमाल खर्राजी यांचे गुरुवारी उशिरा रात्री निधन झाले. गेल्या आठवड्यात झालेल्या अमेरिकन हवाई हल्ल्यात ते जखमी झाले होते. या वृत्ताची पुष्टी इराणच्या सरकारी दूरदर्शनने केली आहे.**

अहवालानुसार, तेहरानमधील त्यांच्या निवासस्थानी हा हल्ला करण्यात आला होता. हल्ल्यानंतर त्यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. इराणी माध्यमे आणि स्थानिक अहवालांमध्ये याला 'हत्या करण्याचा प्रयत्न' असे म्हटले आहे.

खर्राजी हे इराणच्या 'स्ट्रॅटेजिक फॉरेन रिलेशन्स कौन्सिल'चे अध्यक्ष होते. ही संस्था थेट देशाच्या सर्वोच्च नेत्याला सल्ला देते आणि परराष्ट्र धोरणाशी संबंधित महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मोठी भूमिका बजावते. ही घटना अशावेळी घडली आहे, जेव्हा अमेरिका आणि इस्रायलचे इराणवरील हल्ले सलग पाचव्या आठवड्यातही सुरू आहेत. मोहम्मद खातामी यांच्या सुधारवादी कार्यकाळात खर्राजी यांनी परराष्ट्र मंत्री म्हणून काम केले होते. त्यानंतर त्यांनी देशाचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे परराष्ट्र विषयक सल्लागार म्हणूनही महत्त्वाची जबाबदारी सांभाळली.

# ऑपरेशन टायगर केवळ राजकीय स्टंट

(पान १ वरून)

दिल्लीत महाराष्ट्रातील खासदार एकमेकांच्या संपर्कात असतात. ही एक संस्कृती आहे. वेगवेगळ्या पक्षांच्या खासदारांनी एकमेकांशी संवाद साधला, एकत्र भोजन केले तर पक्ष फुटणार, असे समजणे चुकीचे आहे, असे खासदार म्हस्के म्हणाले. त्यामुळे माध्यमांमध्ये सुरु असलेल्या ऑपरेशन टायगरसंदर्भातील बातम्या निराधार आहेत. उबाठा खासदारांबाबत कोणत्याही विषयावर बैठक झालेली नाही, असे शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे व संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही स्पष्ट केले आहे, असे खासदार म्हस्के म्हणाले. ते पुढे म्हणाले की, उबाठाच्या नेतृत्वावर पक्षांतर्गत प्रचंड नाराजी आहे. पक्षातील कार्यकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना उबाठाने वाऱ्यावर सोडले आहे. निवडणुकीत उबाठा मुंबईबाहेर न गेल्याने पक्षाचे कार्यकर्ते नाराज आहेत, असा दावा खासदार म्हस्के यांनी केला. पक्षातील नाराजी असल्याने लोकप्रतिनिधी एकनाथ शिंदे यांना भेटणार, पक्ष फुटणार अशा खोट्या बातम्या उबाठाचे नेतेच माध्यमांमध्ये पसरवत आहेत, असे खासदार म्हस्के म्हणाले. उबाठाचा खासदारांवर विश्वास नसल्याने त्यांना बदनाम करण्यासाठी खोट्या बातम्या पसरवण्याचे काम संजय राऊत करत आहेत, अशी टीका खासदार म्हस्के यांनी केली.

**ठाकरे गटाच्या खासदारांसोबत बैठकच झाली नाही–ना.शिंदे**

उबाठाच्या खासदारांसोबत माझी कोणतीही बैठक झालेली नाही. अशा प्रकारचे वृत्त पूर्णपणे निराधार असून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या स्पष्टीकरणामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना आता पूर्णविराम मिळाला असून, खासदारांच्या कथित बंडाच्या वावड्या केवळ राजकीय स्टंट असल्याचे समोर आले आहे.

**राऊतांमुळे उबाठा पक्ष मृतावस्थेत**

राऊतांच्या कटकारस्थानामुळेच उबाठा पक्ष मृतावस्थेत गेला आहे, अशी खरमरीत टीका खासदार म्हस्के यांनी केली. आदित्य ठाकरे आणि राऊत यांच्यात शीतयुद्ध सुरु आहे. आदित्य ठाकरे राऊत यांना जाब विचारत असतील तर राऊतांची त्यांच्याच पक्षातील अवस्था बिकट आहे. उद्धव ठाकरे रसातळाला गेले आहेत. याउलट एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेना पक्ष हा देशातला आघाडीचा प्रादेशिक पक्ष आहे, असे ते म्हणाले. उबाठा खासदार अरविंद सावंत यांचे पक्षांतर्गत हितशत्रूच अशा बातम्या पसरवत आहेत. पक्षांतर्गत कोणीतरी सावंत यांना बदनाम करत आहेत, म्हणून त्यांना वारंवार अग्निपरिक्षा द्यावी लागतेय, असा टोला खासदार म्हस्के यांनी लगावला.

# बोट उलटून दहा पर्यटकांचा मृत्यू

(पान १ वरून)

प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, मांट पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या पँटून पुलाला बोट धडकली आणि त्यानंतर ती उलटली. यात बोटीत बसलेले सर्व ३२ जण नदीत पडले. घटनेनंतर तातडीने पोलीस आणि स्थानिक पाणबुड्यांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. आतापर्यंत १० जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून सुमारे १० जणांना सुरक्षित वाचवण्यात यश आले आहे. उर्वरित प्रवाशांचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम सुरूच आहे.घटनास्थळी मोठी गर्दी झाली असून परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या असून वाचवलेल्या भाविकांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात येत आहे.

# कुपवाडमध्ये दोन एटीएम मशीन फोडले

(पान १ वरून)

त्यानंतर चोरट्यांनी शेजारीच असलेल्या एसबीआयच्या एटीएमवर डल्ला मारण्याचा प्रयत्न केला. चोरट्यांनी या मशीनचीही तोडफोड केली, मात्र यंत्रणेतील तांत्रिक अडथळ्यामुळे त्यांना आतील रोख रक्कम काढता आली नाही. या मशीनमध्ये सुमारे १३ लाख ५० रुपये असल्याची माहिती मिळाली आहे. चोरट्यांच्या या कृत्यामुळे एसबीआय मशीनचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे एटीएम केंद्रांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गजबजलेल्या चौकात दोन एटीएम असूनही बँकांनी तिथे कोणताही सुरक्षारक्षक तैनात केला नव्हता. हिताची एटीएम केंद्रातील सीसीटीव्ही कॅमेरे आधीपासूनच बंद होते. एसबीआयच्या मशीनमधील कॅमेरा चोरट्यांनी केलेल्या तोडफोडीमुळे बंद पडला. मात्र, सुदैवाने एटीएमच्या समोरील बाजूचा एक कॅमेरा सुरू असून त्यात चोरट्यांच्या हालचाली कैद झाल्याची शक्यता आहे. याबाबत अज्ञात चोरट्या विरोधात चोरीचा प्रयत्न करण्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच कुपवाड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आनंदराव घाडगे यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकानेही घटनास्थळाची पाहणी केली आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून संशयित आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध पथके रवाना करण्यात आली आहेत.

# कोल्हापूर बाजार समितीच्या सभापतीपदी नानासो कांबळे

(पान १ वरून) कालावधीत बोरवडे मतदारसंघातून जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. तसेच उपसरपंच आणि विविध संस्थांमध्येही त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत त्यांनी मागासवर्गीय गटातून मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला होता. बैठकीला संचालक राजाराम चव्हाण, भारत पाटील भुयेकर, बाळासाहेब पाटील, प्रकाश देसाई, नंदकुमार वळंजू, शेखर देसाई, सुयोग वाडकर, शिवाजी पाटील, संदीप वरांडेकर, मेघा देसाई, कुमार अहुजा तसेच सचिव तानाजी दळवी आदी उपस्थित होते.

# उपायुक्त कार्यालयात नगरसेविका पटेकरी यांचा ठिय्या

## उद्यानात कर्मचारी नेमण्यासह स्वच्छतेची मागणी

**इचलकरंजी,ता.१०– शहिद भगतसिंग उद्यानात कायमस्वरुपी कर्मचारी नेमावा, भागातील विकासकामे करण्यासह मैदानाची स्वच्छता करावी आदी मागण्यांसाठी नगरसेविका जुलेखा पटेकरी आणि समर्थकांनी उपायुक्त नंदु परळकर यांच्या कार्यालयात ठाण मांडले. वारंवार मागण्या करुनही त्याकडे दुर्लक्षच होत असल्याने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. अर्धा तासाच्या आंदोलनानंतर चर्चेअंती उपायुक्त परळकर यांनी सर्व मागण्या मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही दिली.**

भागातील विविध विकासकामांसह शहिद भगतसिंग उद्यानात कर्मचारी नसल्याने दूरवस्था होत चालली आहे. या संदर्भात वारंवार मागणी करुनही त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने नगरसेविका जुलेखा पटेकरी आणि जहाँगिर पटेकरी यांनी उपायुक्त परळकर यांची भेट घेतली. मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त करत कामे मार्गी लावण्यासाठी आदेश न दिल्यास कार्यालयास ठाळे ठोकण्याचा इशारा देत कार्यालयात ठाण मांडले.


उपायुक्त कार्यालयात ठिय्या मांडून उपायुक्त नंदु परळकर यांना धारेवर धरताना जुलेखा पटेकरी आणि समर्थक.(छाया–छोटूसिंग)

**विविध कामाकडे प्रशासन लक्ष देत नसल्याच्या कारणावरून सत्तारूढ गटामधीलच नगरसेविकेने आंदोलनाचे हत्यार उपसले. तर अनेक नगरसेवक आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. त्यामुळे सत्तारूढ गटात प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.**

अर्धातास चाललेल्या या आंदोलनानंतर उपायुक्त परळकर यांच्यासोबत चर्चा झाली. त्यामध्ये परळकर यांनी भगतसिंग उद्यानात कर्मचारी नियुक्तीसह उर्वरीत मागण्या मार्गी लावण्याची ग्वाही दिली. या चर्चेत नगरसेवक तानाजी पोवार, दिलीप मुथा सहभागी झाले होते.

# चंदूरमध्ये जुन्या वादातून घरात घुसून मारहाण

## एकजण जखमी : दहा जणांविरुध्द गुन्हा

**इचलकरंजी,ता.१०– जुना वाद व एकमेकांकडे बघण्याच्या कारणावरुन दहाजणांनी काठी, लोखंडी सळी व लाथाबुक्क्यांनी केलेल्या मारहाणीत एकजण जखमी झाला. तर घरावर दगड आणि विटा फेकत घराचेही नुकसान करण्यात आले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दहाजणांवर गुन्हा दाखल झाला असून सुजल सचिन शिंदे (वय २२ रा. शिंदे गल्ली माळभाग, चंदूर) याने फिर्याद दिली आहे.**

सुजल शिंदे व संशयित यांच्यामध्ये गुरुवारी ९ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास पूर्वीच्या वादातून पुन्हा वाद झाला होता. त्याच रागातून रात्री १० वाजण्याच्या सुमारास विजय शिंदे, आकाश शिंदे, अजित शिंदे, उदय शिंदे, भानुदास शिंदे, पुंडलिक शिंदे, सजन शिंदे, अजित आयवळे, विजय आयवळे आणि सुमित शिंदे (सर्व रा.चंदूर) यांनी काठी, लोखंडी सळीसह सुजल याच्या घरावर हल्लाबोल केला. त्यामध्ये सुजल याला लाथाबुक्क्यांसह काठी व लोखंडी सळीने मारहाण करण्यात आली. तर भांडणे सोडविण्यास आलेल्या सुजल याच्या नातेवाईकांनाही मारहाण करण्यात आली. त्याचबरोबर संशयितांनी सुजल याच्या घरावर दगड आणि विटा फेकून घराचेही मोठ्या प्रमाणात नुकसान केले.







आमच्या नेत्या, मार्गदर्शिका माजी खासदार **श्रीमती निवेदिता माने (वहिनी)** यांना वाढदिवसाच्या **हार्दिक शुभेच्छा!**

मा. खासदार श्रीमती निवेदिता माने (वहिनी)

शितल पाटील (पक्षप्रतोद) | जोतिराम रंगराव सांगले (सेक्रेटरी) | अनिल मधूकर लोखंडे (व्हा. चेअरमन) | पियुष अब्दुल लालबेग (चेअरमन)

* संचालक मंडळ- प्रमोद कामत, दिपक खोत, कांचन कांबळे, सुरेश होनुले, कुमार कांबळे, शरद रावळ, सुशिलकुमार पाडळकर, तानाजी कांबळे, हरीष कांबळे, शब्बीर मणेर, लव लाखे, मिरा निंबाळकर, कर्मचारी वर्ग व सर्व सभासद.

**दलितमित्र काकासाहेब माने इचलकरंजी महानगरपालिकेच्या नोकरांची को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि., इचलकरंजी.**

चंद्रकांत कोठावळे (सेक्रेटरी) | शिवाजी जगताप (कार्याध्यक्ष) | अमरसिंह माने (अध्यक्ष)

डॉ. सुनिलदत्त संगेवार,आण्णासो कागले, पांडुरंग कोकरे, विजय पाटील, प्रकाश कांबळे, अविनाश मोरे, शिवाजी कांबळे, अजय जाधव, राहुल पोटे, कृष्णात तोरस्कर, दत्तात्रय खोंद्रे युवराज चव्हाण, विजय चव्हाण, आयुब शेख, दिनेश नगरकर, धनराज पाल, नारायण जाधव, दिपक गेजगे, किशोर पाल, प्रकाश जाधव, अनिल कांबळे, धोंडीराम कांबळे, सदाशिव कांबळे, पुंडलिक कुरणे, प्रभाकर जावळे, श्रीकांत देसाई, नागेंद्र अनंतपुरे, श्रीमती वैशाली पोवार, श्रीमती विमल कांबळे व सर्व सभासद.

**जनरल कामगार संघ (इंटक), इचलकरंजी**

प्रकाश कलागते (उपाध्यक्ष) | मुस्ताक मोमीन (अध्यक्ष)

दत्तात्रय ठाणेकर -सेक्रेटरी | बिरोबा बंडगर -खजानिस | मुकूंद कांबळे - कार्याध्यक्ष

**सर्व पदाधिकारी व सदस्य इचलकरंजी नगरपरिषद सेवा निवृत्त कर्मचारी संघ, इचलकरंजी**


# ग्राउंड पेनिट्रेटिंग रडारचा वापर करावा

## प्रभारी महापौर ॲड.अनिल डाळ्या यांच्या सुचना

**इचलकरंजी,ता.१०– रस्ते विकास, देखभाल दुरुस्तीची कामे करताना संबधित ठेकेदारांनी त्या रस्त्याखालील सेवा वाहिन्यांची माहिती करून घेण्यासाठी ग्राउंड तंत्रज्ञानयुक्त पेनिट्रेटिंग रडार या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीखालील सेवा वाहिन्यांचे सर्वेक्षण करणे महापालिकेने बंधनकारक करणे गरजेचे आहे.तसेच रस्त्यांचे खोदकाम करताना सेवा वाहिन्यांचे नुकसान आणि संभाव्य अपघात टाळण्यास मदत होणार आहे,तेव्हा त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी लेखी सूचना प्रभारी महापौर ॲड.अनिल डाळ्या यांनी आयुक्त पल्लवी पाटील याना केली.**

दरम्यान,दिवसभर शहरातील विविध भागात असलेले अतिक्रमण हटविण्यासह भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा यासह प्रभाग ८ मध्ये तातडीने जलकुंभाची उभारणी करुन गावभागासाठी नियमित पाणी पुरवठा सुरु करावा, अशा विविध मागण्या नगरसेवकांच्या वतीने प्रभारी महापौर अनिल डाळ्या यांच्याकडे करण्यात आल्या.


प्रभारी महापौर पदाची सुत्रे स्विकारल्यानंतर कामकाज पाहताना ॲड. अनिल डाळ्या शेजारी इतर पदाधिकारी,अधिकारी.(छाया–अनंतसिंग)

महापौर उदय धातुंडे हे रजेवर गेल्याने त्यांचा पदभार हा उपमहापौर अनिल डाळया यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. नगरसेविका सौ. मोनाली मांजरे यांची डेक्कन चौक परिसरातील अतिक्रमण हटवावे आणि उघड्यावरील मांस, मासे विक्री बंद करण्याची मागणी केली.

नगरसेविका सौ. रुपाली कोकणे यांनी, यड्राव फाटा ते पंचगंगा साखर कारखाना या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासह भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून त्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी केली. नगरसेविका सौ. संगिता आलासे, परिवहन सभापती सौ. अरुणा बचाटे आणि शिवछत्रपती क्रीडा संघ, कोल्हापूर जिल्हा आशा वर्कर्स संघटना आदींच्यावतीने प्रभारी महापौर ॲड.डाळ्या यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.


|| श्री चौंडेश्वरी प्रसन्न ||



सस्नेह निमंत्रण

**श्री चौंडेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या; तारदाळ इचलकरंजी.**

सप्रेम नमस्कार वि.वि.

श्री चौंडेश्वरी मातेच्या कृपेने व सर्व सभासद, समाज बांधवांच्या सहकार्याने श्री चौंडेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितः तारदाळ इचलकरंजी. या संस्थेच्या जागेवर नविन तयार केलेल्या कै. सदाशिवराव सातपुते उद्यानाचा

**उद्घाटन समारंभ**

**मा. श्री. प्रकाशराव आवाडेसो**
माजी वस्त्रोद्योग मंत्री यांच्या शुभ हस्ते
**मा. आमदार श्री. राहुलजी आवाडेसो**
यांच्या अध्यक्षते खाली व

**सौ. सानिका आवाडे यड्रावकर पाटील** (जिल्हा परिषद सदस्या, कोल्हापूर.) | **मा. श्री. विश्वनाथजी मुसळे** (अध्यक्ष देवांग समाज इचल.)

यांचे प्रमुख उपस्थितीत

**तसेच देवांग समाज सुकाणू समिती व चौंडेश्वरी परिवार**
सर्व संस्थाचे पदाधिकारी यांचे उपस्थितीत संपन्न होत आहे.
तरी सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

-* आपले स्नेहांकित *-

श्री. दशरथ बापू पाटील (सेक्रेटरी) | श्री. शशिकांत बंडू हावळ (व्हा. चेअरमन) | श्री. महेश सदाशिव सातपुते (चेअरमन)

सर्व संचालक व पदाधिकारी

* स्थळ : श्री चौंडेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या; तारदाळ


* वेळ – शनिवार दि. ११/०४/२०२६ रोजी सायंकाळी ठिक ०६:०० वा.

* टीप – सर्व सभासदांना व निमंत्रितांना जाणे येण्यासाठी दुपारी ०४:०० वाजलेपासुन देवांग मंदिर, मंगळवार पेठ, इचलकरंजी येथुन वाहनाची सोय करण्यात आली आहे.



# विनम्र अभिवादन..!

'सहकार रत्न'



**स्व.रावसाहेब आण्णासाहेब पाटील (दादा)**

आमच्या कृषी संघाचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ सहकार नेते, श्रावक रत्न, सहकार रत्न, स्वर्गीय रावसाहेब आण्णासाहेब पाटील (दादा) यांच्या ८२ व्या जन्म जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..!

**श्री. उत्तम रावसाहेब पाटील** (अध्यक्ष) | **श्री. सुमित रोड्डु** (उपाध्यक्ष)

**श्री.आर.टी. चौगुला** C.E.O.


--------------------: संचालक मंडळ :--------------------

श्री. राजेंद्र पाटील   श्री. प्रदीप माळी   श्री. प्रविण पाटील
श्री. राजेंद्र ऐदमाळे   सौ. सुनिता बंकापूरे   सौ. प्राजक्ता पाटील   श्री. राजू गजरे
बँक प्रतिनिधी बीडीसीसी बँक, बेडकिहाळ विभाग
■ सभासद, ठेवीदार, हितचिंतक, शेतकरी व कर्मचारी वर्ग ■

## विविधोध्देश प्राथमिक ग्रामिण कृषी सहकार संघ
बोरगांव, ता. निपाणी

## श्री अरिहंत गारमेंट्स्
बोरगांव व खडकलात





# कर्नाटकात बारावीपर्यंतच्या मुलांनाही मोफत बसप्रवास

## सरकारकडून विद्यार्थी-मैत्रीपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरु करण्याची तयारी

बेंगळुरू,ता.१०(प्रतिनिधी)-

**कर्नाटक राज्यातील शालेय विद्यार्थ्यांचा सुरक्षित आणि सुलभ प्रवास सुनिश्चित करण्यासाठी सरकार विद्यार्थी-मैत्रीपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरु करण्याच्या तयारीत आहे. या उपक्रमांतर्गत १२ वी पर्यंत शिकणाऱ्या मुलांनाही परिवहन महामंडळाच्या (केएसआरटीसी) बसमधून मोफत प्रवासाची सुविधा देण्याचा विचार शासनाकडून सुरू असून लवकरच याची सुरुवात होण्याची शक्यता आहे.**



सध्या राज्यात फक्त विद्यार्थिनींनाच मोफत बस प्रवासाचा लाभ मिळतो. मात्र, कर्नाटक राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या शिफारशींनुसार ही योजना मुलांनाही देण्यासाठी हालचाली सुरु आहेत. यासंदर्भात राज्य परिवहन महामंडळास प्रस्तावाचा अभ्यास करुन आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश परिवहन विभागाने दिले आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रवासातील अडचणी दूर करणे आणि त्यांना सुरक्षित, विश्वासार्ह वाहतूक उपलब्ध करुन देणे हा आहे. विशेष बस आणि अतिरिक्त फेऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असलेल्या मार्गावर, विशेषतः ग्रामीण भागात, शाळा आणि महाविद्यालयांसाठी स्वतंत्र बस सुरु करण्याचा प्रस्ताव आहे. शाळांच्या वेळेनुसार सकाळी आणि संध्याकाळी पीक अवर्समध्ये अतिरिक्त फेऱ्या वाढविण्याचीही योजना आखली आहे.

**टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी**


परिवहनमंत्री रामलिंग रेड्डी यांनी ही योजना टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येईल असे स्पष्ट केले. पहिल्या टप्प्यात बंगळूर आणि आसपासच्या जिल्ह्यांत ही सेवा सुरु केली जाईल. त्यानंतर हळुहळू राज्यभर विस्तार केला जाईल, असे त्यांनी सांगितले

**अत्याधुनिक सुरक्षा उपाय**

या प्रस्तावित योजनेत अनेक सुरक्षा उपायांचा समावेश आहे. सर्व बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली आणि आपत्कालीन पॅनिक बटण अनिवार्य असणार आहेत. प्रत्येक बसमध्ये बाल सहाय्यता क्रमांक १०९८ स्पष्टपणे लिहिणे बंधनकारक राहील. तसेच बसच्या मार्ग आणि वेळेचे काटेकोर पालन करण्यावर भर दिला जाणार आहे.

**कर्मचारी प्रशिक्षणावरही लक्ष**

बसचालक आणि कर्मचाऱ्यांना दरवर्षी अनिवार्य प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्यात बालहक्क आणि बालसुरक्षा कायद्यांची माहिती दिली जाईल. ज्या मार्गावर मुलींची संख्या अधिक आहे, तेथे महिला वाहक (कंडक्टर) नियुक्त करण्याचीही शिफारस केली आहे.



कोगनोळी येथे रस्त्याकडेला विक्रीसाठी ठेवण्यात आलेली कलिंगडे.

# कलिंगड,काकडीला मागणी वाढली

कोगनोळी,ता.१०(प्रतिनिधी)-

**कोगनोळीसह परिसरात उन्हाचे चटके वाढले असल्याने थंडाव्यासाठी शीतपेयांचा खप वाढला आहे. ताक, काकडी व कलिंगडे यांनाही मोठी पसंती दिली जात आहे. रस्त्याकडेला अनेक विक्रेते बसलेले दिसत आहेत. परिसरात काकडी, कलिंगडाची पिके मोठ्या प्रमाणात घेतली जात असल्याने शेतकरी ताजा माल उपलब्ध करुन देत आहेत.**

तापमान वाढीचा परिणाम

काकडी, कलिंगड हे शितलता देणारे फळ आहे. आरोग्याच्या दृष्टीने लाभदायी असलेल्या या फळांना चांगली मागणी आहे. साधारणतः दोन महिने या फळांचा व्यवसाय चालतो. काकडी, कलिंगडे ताजी मिळत असल्याने ग्राहकांकडून मागणी वाढत आहे. शिवाय दोन महिन्यांच्या कालावधीत चांगला हंगामी रोजगार यातून मिळत असल्याने शेतकऱ्यांनाही काहीसा आर्थिक लाभ मिळत आहे. सध्या कलिंगड नग २५ ते १०० रुपयांपर्यंत तर काकडी ६० ते ८० रुपये किलो या दराने मिळत आहे. लोक वाहने थांबवून कलिंगड व काकडी या पदार्थांचा आस्वाद घेत आहेत.



गॅस एजन्सीसमोर ग्राहकांनी केलेली गर्दी.

# संकेश्वरात गॅस सिलिंडरसाठी तोबा गर्दी

संकेश्वर,ता.१०(प्रतिनिधी)-

**संकेश्वरात नागरिकांना स्वयंपाक गॅस सिलिंडर मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.येथील गॅस सिलिंडर वितरक नागरिकांना प्रत्येक महिन्यास एक सिलिंडर मिळणार असल्याचे सांगत असले तरी दिड पावणे दोन महिन्यास गॅस सिलिंडर मिळत आहे.**

याविषयी बोलताना उमेश फडी म्हणाले, संकेश्वरातील गॅस सिलिंडर वितरक ग्राहकांना प्रत्येक महिन्यास एक गॅस सिलिंडर मिळणार असल्याचे सांगत असले तरी वास्तवात दिड ते पावणे दोन महिन्याला एक सिलिंडर मिळत आहे. आपण बरोबर ३० दिवसानंतर ५ मार्च २०२६ रोजी गॅस सिलिंडर मिळणेसाठी नोंदणी केली. २० मार्च २०२६ रोजी सिलिंडर मिळाले. आता ३० दिवसानंतर गॅसची नोंदणी करावी लागणार आहे.त्यामुळे सर्वसामान्य लोकांची चांगलीच पंचाईत होतांना दिसत आहे. महिन्याकाठी लोकांना गॅस सिलिंडर मिळायला हवे.

**नोंदणी नंतर आठवडा-** पंधरा दिवसानंतर गॅस मिळणार असेल तर लोकांना पर्यायी इंधन शिवाय गत्यंतर नाही अशी अवस्था निर्माण होणार आहे. काळ्या बाजारात जादा पैसे मोजल्यास गॅस सिलिंडर मिळत असल्याची चर्चा आहे.गॅस वितरण कार्यालय पूर्वी सकाळी वेळेत सुरू करुन सायंकाळी उशीरापर्यंत सेवेसाठी सज्ज राहायचे. अलिकडे गॅस वितरण कार्यालय उशीरा सुरू करुन सायंकाळी लवकर बंद करण्याचा प्रकार चालला आहे.गॅस वितरकांनी लोकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन गॅस सिलिंडर वितरकांनी ग्राहकांना वेळेत गॅस सिलिंडर मिळवून देण्याचे कार्य करायला हवे असल्याचे त्यांनी सांगितले.

# चिकोडीत आज सीईटी सराव परिक्षेचे आयोजन

चिकोडी,ता.१०(प्रतिनिधी)-

**येथील केएलई अभियांत्रिकी महाविद्यालयात बारावी विज्ञान उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सीईटी सराव परिक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा आज शनिवारी ता.११ रोजी सकाळी साडेनऊ ते दुपारी एक या वेळेत पार पडणार असून रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व गणित या विषयांचा समावेश असणार आहे.**



विद्यार्थ्यांना सीईटी परिक्षेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा तसेच त्यांच्या तयारीचे मूल्यमापन व्हावे या एकमेव उद्देशाने या सराव परिक्षेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दर्शनकुमार बिळळूर यांनी सांगितले. या परिक्षेसाठी नोंदणी शुक्ल पन्नास रुपये ठेवण्यात आले आहे.परिक्षेत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

# दूधगंगा मल्टिपर्पज संस्थेस १ कोटी १५ लाखाचा नफा-आळते

बारवाड,ता.१०(वार्ताहर)-

**कारदगा येथील श्री दूधगंगा मल्टिपर्पज को.ऑप.सोसायटीस सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १ कोटी १५ लाख रुपये नफा झाल्याची माहिती संघाचे संस्थापक चेअरमन कुबेर आळते यांनी दिली.तसेच या संस्थेशी संलग्न असलेल्या श्री.दूधगंगा विविध्योद्देश प्राथमिक ग्रामीण कृषी संघास आर्थिक वर्षात ८ लाख ६५ हजार रुपये नफा झाल्याची माहिती चेअरमन आण्णासो दत्तवाडे यांनी संघाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.**

प्रारंभी दूधगंगा मल्टिपर्पज संस्थेचे मुख्य कार्यनिर्वाहक दीपक तपकीरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.त्यानंतर दूधगंगा मल्टिपर्पज



कारदगा येथे दूधगंगा मल्टिपर्पज सोसायटीचा आर्थिक वर्षाचा आढावा वाचून दाखवताना चेअरमन कुबेर आळते.

संस्थेचा आढावा घेताना चेअरमन कुबेर आळते म्हणाले की, ठेवी ४९ कोटी १ लाख रु., एकूण कर्जे २७ कोटी ९३ लाख, स्थावर मालमत्ता १ कोटी १२ लाख रु.असून १ कोटी १५ लाखाचा नफा झाल्याचे शेवटी सांगितले.

तर दूधगंगा विविध्योद्देश प्राथमिक ग्रामीण कृषी संघाची माहिती देताना शीतल खोत म्हणाले की, संघाच्या ठेवी २ कोटी ४१ लाख रुपये इतक्या असून जिल्हा बँक कर्ज १ कोटी ४७ लाख इतके आहे.तर गुंतवणूक ६३ लाख व एकूण कर्जे ३ कोटी ६९ लाख इतकी असून संघास ८ लाख ६५ हजार रुपये इतका नफा झाल्याचे शेवटी सांगितले.

यावेळी व्हा.चेअरमन शीतल खोत, आप्पासाहेब नोरजे, रावसाहेब कुंभार, आण्णासो दत्तवाडे, आवाण्णा गावडे, अशोक वैद्य, भाऊसाहेब माणगावे, आप्पासाहेब गुणके, स्वप्नील आळते, महादेव कांबळे, सुमित्रा पाटील, सुजाता निगवे यांच्यासह दोन्ही संस्थेचे सल्लागार, सभासद व सेवक वर्ग उपस्थित होते. शीतल खोत यांनी आभार मानले.

# जी.आर.बागेवाडी महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९६.७५ टक्के

निपाणी,ता.१०(प्रतिनिधी)-

**कर्नाटक राज्य सरकारने नुकताच बारावी विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केला आहे.जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे निपाणी येथील केएलई संस्थेचे जी.आय बागेवाडी पदवीपूर्व महाविद्यालयाचा ९६.७५ टक्के निकाल लागला आहे. महाविद्यालयातील कला विभागाचा ९३.८७ टक्के, विज्ञान विभागाचा ९८.७३ टक्के तर वाणिज्य विभागाचा निकाल ९५.७ टक्के असा लागला आहे.**

कला विभागात अनुक्रमे पहिले तीन विद्यार्थी ऐश्वर्या हरके ९६.१६ टक्के, पूजा भिंगरे ९५.६० टक्के, लक्ष्मी इरगार ९३.५१ टक्के तर विज्ञान विभागात अनुक्रमे जैनाब बागवान ९८.१० टक्के, खातिजा हवालदार, अथर्व कोरे ९७.६० टक्के, संचिता शिंपूकडे ९६.६० टक्के, वाणिज्य विभागात अनुक्रमे प्रणाली पाटील ९८.३३ टक्के, लावण्या नागराळे ९७.५०टक्के वृंदा पाटील ९७ टक्के यांनी यश मिळविले.

विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या दैदिप्यमान कामगिरीबद्दल केएलई संस्थेचे संचालक प्रवीण बागेवाडी, स्थानिक कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष महेश बागेवाडी यांच्यासह सदस्य, पदवी प्राचार्य डॉ.एम.एम.हूरळी, पदवीपूर्व प्राचार्या हेमा चिकमठ, तसेच प्राध्यापक वर्गांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# कॅम्पस मुलाखतीत व्हीएसएमच्या २२२ विद्यार्थ्यांची निवड

निपाणी,ता.१०(प्रतिनिधी)-

**येथील व्ही.एस.एम. बीबीए, बीसीए आणि पदवी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीत व्ही.एस.एम.चे २२२ विद्यार्थी निवडले गेले आहेत.**

बंगळुरू येथील क्रिएटिव्ह इंजिनियर्स आणि एमिनंट एचआर सोल्युशन्स या कंपन्यांच्या सहयोगाने, बुधवार आणि गुरुवार या दिवशी महाविद्यालयात ही कॅम्पस मुलाखत पार पडली. या मुलाखतीत व्ही.एस.एम. बीबीए, बीसीए आणि पदवी महाविद्यालयातील एकूण ३०५



कॅम्पस मुलाखतीत यशस्वी झालेल्या विद्यार्थांसोबत शिक्षक वर्ग.

विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

ही कॅम्पस मुलाखत यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे नोडल अधिकारी राजू पाटील, प्लेसमेंट अधिकारी प्रा.चिदानंद कांबळे, बीसीए विभागाचे प्रमुख बाहुबली मगदूम आणि बीबीए विभागाचे प्रमुख प्रा.ए.एम.बागवान यांनी परिश्रम घेतले. विद्या संवर्धक मंडळाचे चेअरमन चंद्रकांत कोठीवाले, उपाध्यक्ष पप्पू पाटील, सचिव समीर बागेवाडी आणि सदस्य, सीईओ डॉ.सिद्धगौडा पाटील,प्राचार्य चिदंबर जोशी तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सकाळी थंडी अन् दुपारी उन्हाचा तडाखा

## वातावरणातील बदलामुळे नागरिक त्रस्त

संकेश्वर,ता.१०(प्रतिनिधी)-

**संकेश्वर परिसरात विचित्र हवामान निर्माण झाले आहे. सकाळी थंडगार वाऱ्याची झुळूक अन् दुपारी जीवघेण्या गरमीने नागरिक हैराण झालेले दिसत आहेत.जीवघेण्या गरमीने अंगाची लाही लाही होतांना दिसत आहे.तप्त उन्हाळ्यात सकाळी थंडगार वाऱ्याची झुळूक नागरिकांना मोठा दिलासा मिळवून देताना दिसत आहे.**

दिवसभर जीवघेण्या गरमीपासून बचाव करण्यासाठी नागरिक भिरभिरणाऱ्या पंख्यांचा, एसीचा अन् कुलरचा सर्रास वापर करताना दिसत आहेत.गरमी पासून बचाव करण्यासाठी लोक थंडगार आईस्क्रीमचे सेवन आणि शितपेयांचा जादा वापर करताना दिसत आहेत. त्यामुळे आईस्क्रीमचे गाडे आणि शितपेयगृह हाऊसफुल्ल दिसत आहेत. सकाळी थंडगार वारा असल्याने लोक चाय पे चर्चा करताना दिसत आहेत. गरमीपासून बचाव करण्यासाठी शालेय मुले टोपी तर मुली ओढणी तर कॉलेज युवती छत्रींचा वापर करतांना दिसत आहेत.

# मुरगूड बसस्थानकासाठी सहा कोटींचा निधी द्या

## संजय मंडलिक यांची परिवहन मंत्र्यांकडे मागणी

मुरगूड,ता.१०(प्रतिनिधी)-

**मुरगूड येथील अद्यावत नवीन बसस्थानक बांधकामासाठी सहा कोटी रुपयांच्या निधीची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केल्याची माहिती माजी खासदार संजय मंडलिक यांनी निवेदनाद्वारे केली आहे.**

परिवहन मंत्री सरनाईक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कोल्हापूर विभागातील मुरगूड शहरातील बस स्थानकाची इमारत जुनी असल्याने वाहतुकीसाठी अपुरी पडत आहे.तालुक्यातील ८६ पैकी



मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देताना उपस्थित मान्यवर.

५२ गावे मुरगूड शहराशी विविध कारणांनी जोडली गेली आहेत.चार किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बाळूमामा तीर्थक्षेत्रामुळे येथे मोठ्या प्रमाणावर प्रवाशांची वर्दळ वाढली आहे. यासाठी बसस्थानक अद्ययावत करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

माजी खास.मंडलिक यांच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र युवा सेनेचे निरीक्षक ॲड. वीरेंद्र मंडलिक, नगरसेवक शिवाजीराव चौगले, माजी उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले, माजी नगरसेवक दीपक शिंदे यांनी मुंबई येथे याबाबतचे निवेदन परिवहन मंत्री सरनाईक यांना दिले आहे.



निपाणी: बैठकीत बोलताना सुधाकर माने.

# निपाणीत डॉ.आंबेडकरांना अभिवादन सभेचे आयोजन

निपाणी,ता.१०(प्रतिनिधी)-

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची निपाणी येथे १९२५ रोजी पहिली सभा झालेली आहे. या सभेला १२ एप्रिल २०२६, रोजी १०१ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने निपाणी नगरपालिका आंबेडकर पुतळा येथे सायंकाळी सहा वाजता अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**

अभिवादन सभेस मार्गदर्शन करण्यासाठी प्रा.मुकुंद कांबळे (महागाव) हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत,अशी माहिती शताब्दी महोत्सव कमिटीचे अध्यक्ष सुधाकर माने यांनी दिली.या कार्यक्रमास प्रा.अच्युत माने, प्रा.जे.डी.कांबळे, प्रा.वसंत जाधव हे उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी उपस्थित राहून महामानवांना अभिवादन करावे, असे आवाहन माने यांनी केले आहे. प्रारंभी स्वागत आणि प्रास्ताविक संतोष मेस्त्री यांनी केले.प्रा.डॉ.आर.के.दिवाकर, प्रा.अजित कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संतोष मेस्त्री, गणू गोसावी,संदीप माने,दिलीप कांबळे,जयसिंग कांबळे, आरेश सनदी, जनार्दन मोहिते, अविनाश माने उपस्थित होते. आभार सुशील कांबळे यांनी मानले.

# बारावी परिक्षेत माय लेकीचे यश

ढोणेवाडी,ता.१०(प्रतिनिधी)-

**नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी केंद्र परीक्षेच्या निकालामध्ये कारदगा येथील मायलेकीने यश मिळविले आहे. त्यांच्या या यशाचे कौतुक केले जात आहे.**

कारदगा येथील राजेंद्र परीट यांच्या पत्नी सविता परीट- आगसर या अंगणवाडीत दायी म्हणून सेवा बजावत आहेत. बारावीपर्यंतचे शिक्षण असावे म्हणून त्यांनी बारावी परीक्षेस बसल्या होत्या.जिद्द, चिकाटी व मेहनतीने ६०० पैकी २६२ गुण घेऊन त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. तसेच मुलगी श्रद्धा परीटने देखील बारावी विज्ञान शाखेमधून परीक्षा दिली होती.तिनेही ६०० पैकी ४२९ गुण घेऊन प्रथम श्रेणीत यश संपादन केले आहे. मायलेकींनी मिळवलेल्या या यशाचे परिसरात कौतुक केले जात आहे.

# कागलमध्ये राष्ट्रसंत कैकाडी महाराज जयंती उत्साहात

कागल,ता.१०(प्रतिनिधी)-

**राष्ट्रसंत श्री. कैकाडी महाराज यांनी संपूर्ण आयुष्यभर समाजाला मानवतेची महान शिकवण दिली, असे उद्गार वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी काढले. मानवांनो, माणुसकीला जागा... जरा माणसात मिसळून वागा, असा संदेश ते समाजाला द्यायचे, असेही ते म्हणाले.**

कागलमध्ये कोरवी समाजाच्यावतीने आयोजित राष्ट्रसंत कैकाडी महाराज जयंती कार्यक्रमात मंत्री श्री.मुश्रीफ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे हेही उपस्थित होते. उपस्थित मान्यवर व नागरिकांच्या हस्ते कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रसंत कैकाडी बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.



कागल- येथील कार्यक्रमात बोलताना मंत्री हसन मुश्रीफ, शेजारी उपस्थित समरजीतसिंह घाटगे व इतर प्रमुख.

यावेळी बोलताना मंत्री श्री.मुश्रीफ पुढे म्हणाले, राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी समाज परिवर्तनासाठी स्वतःचा देह झिजवला. त्यांनी संपूर्ण भारत भ्रमण केले. त्यामुळेच त्यांना कन्नड, तेलगू अशा काही भाषाही येत होत्या. कागल शहरात कोरवी समाजाने संघटित होऊन संत कैकाडी महाराज जयंती पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात साजरी होत आहे याचा मनस्वी आनंद होत आहे. हातावरती पोट असलेला अत्यंत प्रामाणिकपणे काबाडकष्ट करून जगणारा हा समाज आहे. या समाजाने दर्जेदार हे शिक्षण घेऊन फार मोठ व्हावं. तसेच वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरणालाही चालना मिळावी, अशी कैकाडी बाबांची इच्छा होती.

शाहू ग्रुपचे अध्यक्ष राजे समरजीतसिंह घाटगे म्हणाले, राष्ट्रसंत श्री.कैकाडी महाराज यांनी महाराष्ट्रासह अनेक प्रांतामध्ये जाऊन समाज प्रबोधन केले व कठीण तपश्चर्या केली. कागल शहरातील कोरवी समाजाने संघटित होत राष्ट्रसंत श्री. कैकाडी बाबा जयंती मोठ्या उत्साहात आणि प्रबोधनपर पद्धतीने साजरी केली. कैकाडी समाज हा काबाडकष्ट करणारा अत्यंत प्रामाणिक व कष्टाळू समाज आहे. बँड हा पारंपारिक व्यवसाय असलेल्या या समाजाने हा व्यवसाय पुन्हा नव्याने आधुनिकतेसह नीटनेटकेपणाने सुरू करावा. या समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत.

यावेळी अध्यक्ष विक्रम कोरवी, उपाध्यक्ष भिकाजी कोरवी, माजी नगरसेवक चंद्रकांत गवळी, नगरसेवक आनंदा पसारे, सुशांत कालेकर, माजी नगरसेवक विवेक लोटे, माजी नगरसेविका जयश्री कोरवी, श्रीकांत कोरवी, सुधाकर कोरवी, विक्रम कोरवी, डॉ. तुषार कोरवी,रणजीत पाटील,बाळू कोरवी, तानाजी कोरवी, गजानन माने, विशाल कोरवी, अविनाश कोरवी,अंकुश कोरवी आदी प्रमुखांसह समाजबांधव व नागरिक उपस्थित होते.

# निढोरीत विद्यामंदिर शाळेच्या दुरुस्तीचे काम सुरू

निढोरी,ता.१०(वार्ताहर)-

**येथील विद्यामंदिर निढोरी शाळेच्या दुरुस्तीसाठी मंत्री हसन मुश्रीफ यांनी दहा लाख रुपयांचा निधी मागील वर्षात मंजूर करून दिला आहे. त्यामुळे सध्या शाळेची डागडुजी करण्याचे कामकाज सुरू आहे.**

तसेच महत्व पुर्ण खोल्यांमध्ये दुरुस्तीचे कामकाज करण्यात येणार असल्याची माहिती मुख्या.एन.डी.गोरुले व शिक्षण समितीचे पदाधिकारी यांनी दिली आहे. शाळेसाठी नव्याने संरक्षण भिंत, प्ले ग्राउंडसाठी ग्रामपंचायतीचे प्रयत्न सुरू असुन लवकरच ते मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे, असे सरपंच सौ.शुभांगी सुतार यांनी सांगितले.

# बाजार समितीतील नियमबाह्य पदोन्नती प्रकरणी दोषींवर कारवाईची मागणी

**कोल्हापूर,ता.१० (प्रतिनिधी)–**

**कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सेवा ज्येष्ठतेचे नियम डावलून देण्यात आलेल्या पदोन्नती रद्द झाल्यानंतर आता या संपूर्ण प्रक्रियेस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.**

भारतीय जनता पार्टी सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुधीर देसाई यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीचे सचिव तानाजी दळवी यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले.

बाजार समिती प्रशासनाने काही दिवसांपूर्वी सेवा ज्येष्ठतेचे नियम डावलून काही कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली होती. या निर्णयाविरोधात काही संचालकांनी तक्रारी दाखल केल्यानंतर प्रशासनाने त्या तक्रारींची दखल घेत अखेर संबंधित पदोन्नती रद्द करण्याचा निर्णय घेतला.मात्र, केवळ पदोन्नती रद्द करून प्रकरण संपवू नये, तर नियमबाह्य प्रक्रिया राबवून संस्थेची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि संबंधित दोषींवर प्रशासकीय कारवाई करावी, अशी ठाम मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी भाजपा सहकार आघाडीचे सुधीर बोलवे, उपाध्यक्ष अनिल कोळेकर, प्रशांत दिघे, ईश्वरा पाटील, चिटणीस प्रसाद खोत तसेच व्यापारी प्रतिनिधी अमोल कापसे उपस्थित होते.

## सांगलीत मजूरावर कोयत्याने हल्ला; तिघांवर गुन्हा दाखल

**सांगली, ता.१०(प्रतिनिधी)**

**रंगकामाच्या पैशाबाबत विचारणा केल्याचा राग आल्याने एका मजूरावर कोयत्याने हल्ला करण्यात आल्याचा प्रकार घडला.**

यामध्ये संजय आब्बास शिकलगार (वय ४१,रा. भारतनगर, सांगली) हे गंभीर जखमी झाले. याप्रकरणी सांगली शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,फिर्यादी संजय शिकलगार हे मजुरी काम करतात. बुधवारी रात्री दहाच्या सुमारास ते संशयित करण शिकलगार (रा. भारतनगर, सांगली) यांच्या घरी रंगकामाच्या पैशाबाबत विचारणा करण्यासाठी गेले होते.याचा राग आल्यामुळे करण शिकलगारने त्याच्याजवळ असणाऱ्या कोयत्याने फिर्यादी संजय शिकलगार यांच्या डोक्यात, कपाळ आणि डोक्याच्या मागील बाजूस वार केले. भांडण सोडविण्यासाठी संजय यांचा मुलगा कृष्णा गेला असता त्यालाही दोघा अनोळखी व्यक्तींनी मारहाण केली. यानंतर संशयित तेथून पसार झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेकरीता,

**मौजे टाकळीवाडी**, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील गट नंबर ५५६, ५५१, ४८१, ५३२ या शेत मिळकतीबाबत व मौजे टाकळी येथील सि.स.नं. १६८८ व १७६४ या घर मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. लक्ष्मण बाबू उर्फ बाबुराव निर्मळे रा. गौरीशंकर नगर तारदाळ यांनी मे. दिवाणी न्यायाधिशसो, श्रीमती व्हि. आर. मानेसो, कुरुंदवाड यांचे कोर्टात रे.क.नं. ४२/२०२६ चा वाटपाचा, हक्कज्ञापनाचा व कायम मनाई ताकीदीचा दावा श्री. पुंडलिक, रामचंद्र बाबु उर्फ बाबुराव निर्मळे रा.टाकळीवाडी, ता. शिरोळ नगैरे यांचेविरुध्द दाखल केला आहे. सदर दावेतील तुर्तातुर्त मनाई अर्जावर मे.कोर्टानी कारणे दाखवाचा हुकूम केला आहे. सबब सदर मिळकतीबाबत न्यायालयात वाद प्रलंबित असलेने श्री.पुंडलिक, रामचंद्र बाबु उर्फ बाबुराव निर्मळे रा. टाकळीवाडी, ता. शिरोळ, श्रीमती शानाबाई भंडारे, सौ. मंगल वंजिरे यांचेबरोबर कोणीही, खरेदी विक्री, कर्जबोजा अगर अन्य कोणताही व्यवहार, फेरबदल करु नये. तसा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांचे हिस्सेवर व त्यांचे हक्कावर बंधनकारक रहाणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये यासाठी प्रसिध्द केली जाहीर नोटीस समज

तारीख :- ०९/०४/२०२६

**ॲड. सुभाष ए. येलपले**

**१२/२२७, साई शिवाजीनगर इचलकरंजी.**

**मो. नं. ९८२२३२१३५७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

जि. व तु. कोल्हापूर, पो. तु. हातकणंगले मा. सह. दुय्यम निबंधकसाो वर्ग २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेपैकी तसेच तालुका व ता.पं.समिती हातकणंगलेपैकी मौजे कबनूर येथील ग.नं. ६९९ चे एकूण क्षेत्र हे.५-३५.०० आर पो.ख.हे. ०.०७.०० आर, आकार रु.७-८१ पै. यापैकी प्लॉट नं १३ पैकी क्षेत्र १०१-४८ चौ. मी. याची मोजमापे पूर्व बाजूस-४२-० फूट, पश्चिम बाजू -४२-० फूट, दक्षिण बाजू-२६-० फूट, उत्तर बाजू-२६-० फूट याचे एकूण क्षेत्र १०९२-० चौ. फूटची खुली जागा व यावरील बंदिस्त घर मिळकत याचा ग्रा.पं.मि.नं. ७३२० असा नमूद आहे. यासी चतु:सिमा अनुक्रमे - पुर्वेस - श्री.नकाते यांची मिळकत, पश्चिमेस-पद्मावती सोसायटी यांची मिळकत,दक्षिणेस-संकपाळ यांची मिळकत, उत्तरेस - २० फूट रुंदीचा रस्ता, येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही सौ. कविता काशिनाथ कारवेकर यांच्या मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून भरीव संचकारदाखल रक्कम स्विकारुन त्यांना लेखी करारपत्र करुन दिलेले आहे.सदर मिळकतीबाबत कोणाचा, कोणताही हक्क, करार, दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दी पासून ७ दिवसाच्या मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता.१०/४/२०२६.

**ॲड. सोनल आनंदा कदम**

**ओमकार चौक, कबनूर,इचलकरंजी.**

**मो.नं. ७०३८७३६७७३**

## जाहीर नोटीस

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील इचलकरंजी येथील री. स.नं. ६/१ असा असून त्यापैकी माझे मालकी हक्काची असलेली मिळकत इचलकरंजी महानगरपालिका यांचेकडील गुंठेवारी बिगरशेती झालेला प्लॉट नं. ५ पैकी पश्चिम बाजूचे क्षेत्र १३८१.०० चौ.फु.याचे १२८.०चौ.मी.ची खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पूर्वेस - सौरभ बेडक्याळे पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नंबर ७ ची मिळकत उत्तरेस- रस्ता येणेप्रमाणे सदरची मिळकत श्री. संजय महादेव कांबळे रा. इचलकरंजी यांचे कब्जेमालकीची असुन सदरील मिळकती संदर्भात त्यांनी आमचे अशिलांकडुन करार पत्राने संचकार रक्कम स्वीकारून त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध, निष्कर्जी असल्याचा निर्वाळा देवून खरेदी देणेचे ठरले आहे. सदर मिळकत संदर्भात कोणताही न्यायालयीन वाद,हक्क,पोटगी कोणताही खाजगी सरकारी बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली जाहीर नोटीस दि. १०/०४/२०२६

**ॲड. बाबासो एम. पाटील**

**वार्ड नं. १७/७७ स्वामी विवेकानंद कॉलनी शाहू पुतळ्या जवळ इचलकरंजी**

**मो.९२२६८८७००१**

## जाहीर नोटीस

**मिळकतीचे वर्णन**– तारदाळ येथील गट नं. १९८ पैकी प्लॉट नं. १४ याचे क्षेत्र १३८ चौ.मी.ची खुली प्लॉट मिळकत यांसी चतु:सिमा- पूर्वेस - प्लॉट नं. ११ ची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. १२ ची मिळकत, दक्षिणेस-प्लॉट नं. १५ ची मिळकत व उत्तरेस-रस्ता. येणे प्रमाणे चतु:सिमेतील मिळकत.

वर नमूद मिळकत ही श्रीकांत बाळगोंडा कुंभार, रा. इचलकरंजी यांचे स्वकष्टार्जीत मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून ती निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून सचिन दामोदर नाकील,रा. इचलकरंजी यांचे नावे संचकारपत्र पुर्ण करुन दिले आहे.सदर संचकारपत्रातील प्राप्त हक्क व अधिकारानुसार सचिन नाकील यांनी वर नमूद मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून आमचे अशिलांकडून रक्कम स्विकारुन आमचे अशिलांचे लाभात संचकारपत्र करुन दिले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, कर्जबोजा इ. असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

ता. १०/०४/२०२६

**ॲड. शफीक एस. मुजावर**

**५/१०००, तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**

**मो. नं. ९४२२४१८१४४**

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील क. गट नंबर ६० पैकी प्लॉट नंबर ६ ची क्षेत्र चौरस फुट १३५४.१२ याचे चौ. मिटर १२५.८५ ची बिगरशेती खुली जागा श्री. अरूण तुकाराम केसरे यांच्या मालकीची आहे. तसेच यालगतची प्लॉट नंबर ७ ची क्षेत्र चौरस फुट १३४५.७५ याचे चौ. मिटर १२५.०६ तसेच, प्लॉट नंबर ८ ची क्षेत्र चौरस फुट १३५०.० याचे चौ. मिटर १२५.४६ तसेच, प्लॉट नंबर ९ ची क्षेत्र चौरस फुट १३६२.३७ याचे चौ. मिटर १२५.६१ ची बिगरशेती खुली जागा. अशी प्लॉट नंबर ७ ते ९ ची मिळकत ही श्री. दादासो गुंडू भाटले व श्री. सौरभ अशोक निर्मळ यांच्या सामाईक मालकीची आहे. याप्रमाणे वर वर्णन केलेली प्लॉट नंबर ६ ते ९ याचे एकुण चौरस फुट ५४१२.२४ याचे एकुण चौ. मिटर ५०२.९८ ची बिगरशेती खुली जागा यांसी एकत्रित चतुःसिमा पुर्वेस-प्लॉट नं.५ ची मिळकत, पश्चिमेस प्लॉट नंबर १० ची मिळकत, दक्षिणेस-गट नंबर ५९ ची मिळकत, उत्तरेस सदर गट नंबर मधुन सोडलेला २५ फुट रूंदीचा सामाईक वहिवाटीचा रस्ता. येणेप्रमाणेची मिळकत ही श्री. केसरे, भाटले, निर्मळ यांनी आमचे मित्र यांना खरेदी देणेचे तोंडी ठरवुन संचकारदाखल रक्कम स्विकारलेली आहे व सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेबाबत श्री. केसरे, भाटले, निर्मळ यांनी आमचे मित्र यांना निर्वाळा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही करार, कर्ज, बोजा, गहाण, दान, वाटणी, हिस्सा वगैरे कसलाही अधिकार असलेस सात (७) दिवसाचे आत खाली दिले पत्त्यावर समक्ष भेटून कागदोपत्रानिशी खात्री पटवून द्यावी. मुदतीत तक्रार न आल्यास तर आमचे मित्र सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुरा करुन घेतील त्यानंतर कोणाचीही तक्रार अगर हरकत आमचे मित्र यांचेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही असे ता.१०/०४/२०२६

**श्री.संजय मारूती घोरपडे**

**(स्टँप रायटर)**

**राजाराम स्टेडीयम, रजिस्टर ऑफिससमोर, इचलकरंजी. मोबाईल नं.–९४२२०४५६६५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व वित्तीय संस्थांना जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी व ता. हातकणंगले पैकी मे. दुय्यम निबंधकसाो, इचलकरंजी यांचे अधिकार क्षेत्रातील व जिल्हा परिषद कोल्हापूर व तालुका पंचायत समिती, हातकणंगले यांचे हद्दीतील ग्रामपंचायत मौजे कबनूर या गावाचे हद्दीतील गट नं. २१० क्षेत्र ० हे ५४ आर, आकार रु.६-३१ पैसे यापैकी क्षेत्र ० हे १८ आर, आकार रु. २- १० पैसे ची मिळकत या पैकी क्षेत्र हे.०.०९ आर, आकार रु. ०१-०५ पैसे ची मिळकत. यांसी चतु:सिमा - पूर्वेस २० फूटाचा रस्ता, पश्चिमेस - दिनेश जैन व कय्युम खान यांची मिळकत, दक्षिणेस - याच मिळकतीमधील कय्युम खान यांचे हिस्सेची मिळकत, उत्तरेस - श्री इंगवले यांची मिळकत.

येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही श्री. दिनेश बच्चाराम जैन व श्री सुरेश श्रीचंद टेहलानी, रा. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी त्यांचे नावांची नोंद आहे. सदर श्री. दिनेश बच्चाराम जैन व श्री सुरेश श्रीचंद टेहलानी यांनी वर नमूद मिळकत आमचे अशिलांना खुष खरेदी देणेचे ठरवून तसा व्यवहार ठरविला आहे. सदर खरेदी व्यवहारास सह हिस्सेदार कय्युम अजिज खान यांची मान्यता घेऊन देणेची खात्री व आश्वासन मिळकत मालकांनी दिली आहे. आमचे अशिलांनी वर नमूद मिळकत मालकांना संचकारापोटी भरीव रक्कम दिलेली आहे. आमचे अशिल विषयांकित मिळकतीचा ठरले व्यवहाराप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, रस्ता वहिवाट अथवा करार, मदार, बोजा, पोटगी, दान, लिज, अथवा तत्सम हक्क संबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसांचे आत आपली हरकत तक्रार सर्व कागदपत्रानिशी खालील पत्त्यावर लेखी अथवा प्रत्यक्षपणे कळवावी. मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही हरकत तक्रार बंधनकारक राहणार नाही.म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता.१०/०४/२०२६.

**ॲड.बी.डी.कांदेकर**

**दिवाणी कोर्टासमोर, जामा मस्जीद रोड, इचलकरंजी**

**मो. नं. ९४२२६२४८४९**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन :- जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि.स.नं.६/१८ याचे क्षेत्र हे. १=०५ आर खराब हे. ०=०५ आर आकार रू. १२-१२ पै., यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १ क्षेत्र १३८.०५ चौ. मी. (१४८५.४१ चौ. फूट) ची खुली मिळकत यांसी चतुः सिमा पुर्वेस - ९ मीटर रूंदीचा रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. २ ची मिळकत, दक्षिणेस - ९ मीटर रूंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ३ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील खुली बिगरशेती प्लॉट मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूंसह आणि इझमेंटरी हक्कांसह.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत प्रणाली रविंद्रकुमार चौगुले, भारती रविंद्रकुमार चौगुले, उदय सुरेंद्र चौगुले, किरण सुरेंद्र चौगुले, विशाल रविंद्रकुमार चौगुले आणि सुवर्णा सुरेंद्र चौगुले यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत आमचे अशिल खरेदी करणार आहेत. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलांना देणेत आला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी

ता. ०९/०४/२०२६

**ॲड.श्रीप्रसाद लक्ष्मण उरूणकर**

**रा. ३/४५७/१/२, पॅराडाईज कॉलनी, आमराई रोड, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**

**मो. नं.९९२३४२२९५१**

## जाहीर नोटीसीस हरकत

दि.७/४/२०२६ इ.रोजी ॲड. अजित शंकर लटके यांनी दैनिक महासत्तामध्ये प्रसिध्द केले जाहीर नोटीसीस हरकत अशी की,

मौजे कबनूर, ता. हातकणंगले येथील क.ग.नं. ७४७ पैकी, शेती क्षेत्र ५०.८६आर यासी चतु:सिमा पुर्वेस :- यड्रावे यांची मिळकत, पश्चिमेस :- सरकारी रस्ता, दक्षिणेस :-तांबे यांची मिळकत व उत्तरेस :- झोले यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही मुळची वसंतराव आळतेकर यांची वाडवडिलार्जित मिळकत आहे. गीता वसंतराव आळतेकर यांचा सदर वडिलार्जित मिळकतीशी कोणताही हक्क व संबंध येत नाही असे असताना वसंतराव आळतेकर यांनी इतर वारसांचे हक्क डावलणेच्या हेतूने, अनाधिकाराने गीता वसंतराव आळतेकर यांचे नांवे तथाकथित बक्षिसपत्राने मिळकत तबदिल केली आहे. सदर तबदिली व्यवहार बेकायदेशीर असलेने त्यावरुन झालेला फेरफार रद्द करणेबाबत मा.प्रांताधिकारीसाो, इचलकरंजी यांचे कोर्टात वाद क्र.२५५/२०२५ तसेच इचलकरंजी दिवाणी न्यायालयात रे.क.नं.७४/२०२५, फौजदारी न्यायालयात १९९/२०२५ असे विविध वाद, खटले प्रलंबित आहेत. अशी वस्तुस्थिती असताना गीता वसंतराव आळतेकर यांना वर नमुद मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करणेचा हक्क व अधिकार नाही.

सबब वर नमुद मिळकतीबाबत ॲड. लटके यांचे अज्ञात अशिल अथवा तर्फे इसमांनी गीता वसंतराव आळतेकर यांचेशी जाहीर नोटीसीत नमुद प्रमाणे कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. याउपर कोणी काही व्यवहार केलेस तो आमचे अशिलांचे वर नमुद मिळकतीतील हक्क व हिस्स्यावर लागू व बंधनकारक राहणार नाही व खरेदी घेणार यांना निर्वेध मालकी प्राप्त होणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये याकरीता दिली जाहीर हरकत सही

ता. १०/०४/२०२६.

**ॲड. सचिन दामोदर सवदी**

**महालक्ष्मी पसायदान अपार्टमेंट, गावभाग,हरी मंदिर समोर, इचलकरंजी. मो.नं. ९०७५००४०८१**

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. सुनिल व सुधीर नारायण सांगले, रा. ९/३३६, इचलकरंजी यांनी दिले माहितीवरून, दिले अधिकारावरून व कागदपत्रावरून त्यांचेकरिता तमाम लोकांना कळविण्यात येते की,

इचलकरंजी येथील रि.स.नं. ७अ/७ क्षेत्र हे ०.२५.७५ आर या जमिनीची श्री. अरुणकुमार सिद्धाप्पा चौगुले रा. इचल. यांनी इचलकरंजी महानगरपालिकेकडून द.ठ.नं.८४/१७/१२/२०२४ नुसार गुंठेवारी आदेश करून घेऊन त्यानुसार दि. २१/०१/२०२५ इ. रोजी प्राथमिक उपविभागणी करून घेतली आहे. सदरचा गुंठेवारी आदेश व उपविभागणीमधील ले - आऊट नकाशामध्ये अरुणकुमार चौगुले यांनी आमचे अशिलांचे मालकी कब्जे हक्काची जागा स्वतःची असलेचे दाखवून खोटी कागदपत्रे, नकाशे हजर करून जागेची स्वतंत्र मोजणी व हद्दी कायम न करता व आमचे अशिलांची लेखी हरकत असताना तसेच गुंठेवारी प्रस्ताव सादर न करता गुंठेवारी कायद्याविरुद्ध द.ठ.नं.८४/१७/१२/२०२४ चे आदेशाने गुंठेवारी केली असलेमुळे आमचे अशिलांनी सदर आदेशाविरुद्ध मा.ना. हायकोर्ट मुंबई सर्किट बेंच कोल्हापूर येथे रिट पिटीशन नं. १३८६ / २०२६ चे रिट दाखल केले असून त्यामध्ये मा. ना. हायकोर्ट यांनी सदर मा. आयुक्तांचे आदेशाचे अनुषंगाने आमचे अशिलांचे मालकी हक्काविरुद्ध कोणतीही कार्यवाही करू नये असा मनाईचा आदेश दि. ०२/०४/२०२६ इ. रोजी दिलेला आहे.

अरुणकुमार चौगुले हे सदर प्राथमिक उपविभागणी मधील प्लॉट्सची बेकायदेशीर विक्री करीत असलेचे महापालिकेचे निदर्शनास आणून दिलेने मा. सहा. संचालक नगररचना इचल., महानगरपालिका इचल. यांनी जा. क्र./इम पा/नरवि/५०२६/ प्र.क्र. / २१ / २६ दि. ०२/०४/२०२६ चे लेखी आदेशाने मा. सहा. दुय्यम निबंधक वर्ग २ क्र. १ व क्र. २ इचलकरंजी व सह जिल्हा निबंध कोल्हापूर यांना श्री अरुणकुमार चौगुले यांचे रि.स.नं. ७ अ/७ यामधील प्राथमिक उपविभागणीमधील प्लॉट्सची खरेदी - विक्री करू नये असे कळविले आहे. तसेच मा. आयुक्तसो यांनी दि. ०४/१२/२०२५ इ. रोजीच्या आदेशाने श्री चौगुले यांनाही प्राथमिक उपविभागणी- मधील प्लॉट्स विक्री करू नये असा मनाईचा आदेश दिलेला आहे. अशी वस्तुस्थिती असताना अरुणकुमार चौगुले हे सदर प्लॉटचे विक्री बाबत दै. महासत्तामध्ये जाहीर नोटीस देऊन मा. आयुक्तसो यांचे आदेशाचा भंग करीत असलेमुळे खरेदी घेणार व देणार, दस्त

करणार या सर्वांविरुद्ध कंटेम्प्टची कार्यवाही करणेबाबतही लेखी कळविले आहे. त्यामुळे अरुणकुमार सिद्धाप्पा चौगुले यांचेशी रि.स.नं.७ अ / ७ मधील प्राथमिक उपविभागणी-मधील प्लॉटची कोणीही खरेदी- विक्री व्यवहार करू नये. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून दिली जाहीर नोटीस. सही.

ता. १०/०४/२०२६.

**ॲड. बंकट द. गजबी**

**१६/६४२,बालाजीसदन, इचलकरंजी. मो.नं. ८३८००७००२३.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) **मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि. स. नं. ६/१८ याचे क्षेत्र हे. १=०५ आर खराब हे. ०=०५ आर आकार रू. १२ = १२ पै., यापैकी बिगरशेती प्लॉट नं. १० क्षेत्र १०८.९४ चौ. मी. ची खुली मिळकत यांसी चतुः सिमा पुर्वेस - प्लॉट नं. १४ व १५ ची मिळकत, पश्चिमेस- ९ मीटर रूंदीचा रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. ११ ची मिळकत, उत्तरेस - प्लॉट नं. ९ ची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील खुली बिगरशेती प्लॉट मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूंसह आणि इझमेंटरी हक्कांसह.

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत प्रणाली रविंद्रकुमार चौगुले, भारती रविंद्रकुमार चौगुले, उदय सुरेंद्र चौगुले, किरण सुरेंद्र चौगुले, विशाल रविंद्रकुमार चौगुले आणि सुवर्णा सुरेंद्र चौगुले यांचे मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत आमचे अशिल खरेदी करणार आहेत. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा आमचे अशिलांना देणेत आला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी

ता. ०९/०४/२०२६

**ॲड.श्रीप्रसाद लक्ष्मण उरूणकर**

**रा. ३/४५७/१/२, पॅराडाईज कॉलनी, आमराई रोड, इचलकरंजी,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**

**मो. नं.९९२३४२२९५१**

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन:-

"जिल्हा- कोल्हापूर, तालूका- हातकणंगले येथिल मा. दुय्यम निबंधकसो, वर्ग २ इचलकरंजी यांचे अधिकार क्षेत्रातील कसबा इचलकरंजी येथिल टी. पी. स्कीम नंबर २, फायनल प्लॉट नंबर २१ (याचा जुना रि.स.नंबर ५९०, याचा जुना सि.स.नंबर १२९०४, १२९०४/१, १२९०४ / २ ) याचे क्षेत्र ३४८२२.३० चौ. मिटर यापैकी क्षेत्र ८९.३ चौरस मिटर याचे ९६०.९० चौरस फुट (याचे खरेदीपत्राप्रमाणे एकुण १००० चौरस फुट ) ची खुली मिळकत व यावरील इचलकरंजी महानगर पालिका इचलकरंजी यांचे कडे मालमत्ता क्रमांक १८/६४० (याचा नविन नंबर १८२०००३९९ ) ने नोंद असलेली बांधीव मिळकत याची चतुर्सिमा- पूर्वेस- दिलावर अप्पालाल मोमीन मिळकत, पश्चिमेस- बाळासो इब्राहिम मुजावर, दक्षिणेस- विनोद सुधाकर शिंदे यांची मिळकत, उत्तर- सदानंद शंकर दुधाणे.येणेप्रमाणे चतु:सिमा मिळकत व त्यातील जल,तरू काष्ठ,पाषाण, तदंगभूत वस्तुसह व इजमेंटरी हक्कसह सर्व यास यापुढे मिळकत असे संबोधले आहे.

२) वर कलम १ यात नमुद केलेली मिळकत ही श्री. अरविंद भानुदास कुमठेकर यांचे मालकी वहीवाटीची आहे. श्री. अरविंद भानुदास कुमठेकर हे वर नमुद कलम १ ची मिळकत ही "नांदणी सहकारी बँक लि. नांदणी, शाखा-कबनूर" या बँकेस तारण देवुन कर्ज उचल करणार आहेत.

३) सबब या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविणेत येते की, सदर वर नमूद मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क संबंध, करार, अधिकार, बोजा वगैरे असलेस तो त्यांनी आजपासून ०७ दिवसाचे आत आम्हास वर नमुद केले पत्त्यावर कागदपत्रांसह लेखी पटवून द्यावे. सबब तद्नंतर येणारी हरकत,तक्रार वगैरे आमचे अशिल,बँकेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस.

दिनांक ०९/०४/२०२६

**ॲड. मंजुनाथ विठ्ठल भाट**

**वन वे रोड, कोर्ट समोर,इचलकरंजी.**

**मो.बा.८४८४९८४०८४/८६०५३००८००**

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णनः-

जि व तु कोल्हापूर पो. तु. हातकणंगले पैकी मा. सह. दुय्यम निबंधकसो वर्ग २, इचलकरंजी शहर इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील येथील रि.स.नं. ६१३/१ याचा सि.स.नं. १०६३९ याचाच टिपी स्किम न. २,फायनल प्लॉट नं ११३ मधील-

अ) प्लॉट नं. १३ क्षेत्र ४६४.५१ चौमी म्हणजेच क्षेत्र ४९९८ चौ. फुटाची खुली जागा मिळकत. यासी चतुःसिमा पुर्वेस-प्लॉट नं. १४ वी मिळकत,पश्चिमेस-सरकारी रस्ता, दक्षिणेस-प्लॉट नं. १५ ची मिळकत, उत्तरेस-प्लॉट नं ११ ची मिळकत

ब) प्लॉट नं. १५ याचे क्षेत्र चौ. फूट ५००० याचे चौ. मी. ४६४.६८ ची बिगरशेती खुली प्लॉट जागा मिळकत. यासी चतुःसिमा पूर्वेस प्लॉट नं. १६ ची श्री. कांबळे यांची मिळकत, पश्चिमेस- ४५ फूटी रस्ता, दक्षिणेस प्लॉट नं. १७ ची श्री. बोहरा यांची मिळकत व उत्तरेस प्लॉट नं. १३ ची श्री. पठाण यांची मिळकत.

सदर दोन्ही मिळकती एकासएक लगत असुन त्याचे एकत्रित क्षेत्र ९२९.१९ चौ. मी. म्हणजेच ९९९८.०८ चौ. फुटाची मिळकत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील नंबर डी.ई.एस. के. ।।। आर.बी./एलएन.ए./ एस.आर./१२८१ ता. २०/०८/१९८७ ने बिगरशेती झालेली आहे.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली ही मिळकत सौ. कनकश्री लक्ष्मीकांत भट्टड रा. इचलकरंजी यांचे मालकी व कब्जे वहिवाटीस असून सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना दिलेने सदरची मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरवून तसा तोंडी व्यवहार पुर्ण केलेला असून सदर व्यवहारापोटी संचकार रक्कम अदा केलेली आहे.

३) सबब वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकती बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा तारणगहाण, दान, बोजा, कर्ज, आरक्षण, नोंद बोजा, जप्ती आदेश, मनाई आदेश तसेच वारसा, वाटणीपत्राबाबत व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर आपले लेखी कागदपत्रासह मुदतीत कळवावे. मुदतीत तक्रार वा हरकत ना आलेस आमचे अशिल यर नमुद मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण करतील मग नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता.०९/०४/२०२६

**ॲड.आर.बी.जमदाडे**

**५/२०७, मेन रोड, शाळा नं.२ जवळ, इचलकरंजी. मो.नं.९०२८४७७५५८**

# अन्न व्यावसायिकांनी फॉस्टॅकचे प्रशिक्षण घेणे आवश्यक

## संजय शेटे; कोल्हापुरात अन्नसुरक्षा प्रशिक्षण व प्रमाणपत्र कार्यशाळा

कोल्हापूर,ता.१०(प्रतिनिधी)–

**अन्न व्यावसायिकांनी भारतीय अन्नसुरक्षा व मानके कायद्यानुसार फॉस्टॅकचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. हे प्रशिक्षण ग्राहकांबरोबरच अन्न व्यावसायिकांच्या आरोग्यासाठी उपयुक्त असून अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षा प्रशिक्षण घेऊन आपल्या व्यवसायाला अधिक सुरक्षित बनवावे, असे आवाहन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे यांनी केले.**



कोल्हापूर: अन्नसुरक्षा प्रशिक्षण व प्रमाणपत्र कार्यशाळेत बोलताना संजय शेटे, व्यासपीठावर अन्य प्रमुख मान्यवर.

कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व दि कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापुरात अन्न व्यावसायिकांचे अन्नसुरक्षा प्रशिक्षण व प्रमाणपत्र कार्यशाळा कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशन येथे घेण्यात आली. ३०० हून अधिक अन्न व्यावसायिकांनी याचा लाभ घेतला.अन्नसुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन संजय शेटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, भारतीय अन्नसुरक्षा व मानके कायदा यांचे परिपत्रकानुसार सर्व अन्न व्यावसायिकांनी फॉस्टॅकचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.प्रशिक्षण घेतल्यानंतर त्याचे प्रमाणपत्र दिले जाते.अन्न व्यावसायिकांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी चेंबरच्या माध्यमातून पाठपुरावा केला जाईल अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणच्या प्रशिक्षिका क्रीर्ती गौतम यांनी मार्गदर्शन केले.दि कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष संजीव परीख यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी चेंबरचे उपाध्यक्ष राजू पाटील,कन्झ्युमर प्रोडक्ट डिस्ट्रीब्युटर्स वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत शिंदे, किराणा, भुसार व्यापारी असोसिएशनचे सचिव राहुल नष्टे, अरुण सावंत,चेंबरचे संचालक संपत पाटील,अनिल धडाम, रवी बनछोडे, अजय जाधव, पी-टेक एज्युकेशन ट्रस्टचे असलम कोथळी, ऋतुजा पाटील, इरफान अत्तार, भाग्यश्री सूर्यवंशी, शाहीन तांबोळी, गणेश बाबर यांच्यासह अन्न व्यावसायिक उपस्थित होते. सूत्रसंचालन विवेक शेटे यांनी तर आभार वैभव सावर्डेकर यांनी मानले.

# कळे पोलीस ठाण्याकडून अभिनव उपक्रम

बाजारभोगाव.ता.१०(प्रतिनिधी)–

**ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना पोलिसांपर्यंत त्वरित पोहोचता यावे, तक्रारींचे तत्काळ निवारण व्हावे आणि पोलिसींग अधिक दृश्यमान व्हावे, यासाठी कळे पोलीस ठाण्याने अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. कळे पोलीस ठाणे हद्दीतील ४० ग्रामपंचायतींमध्ये पोलीस पाटलांच्या नाव व संपर्क क्रमांकाचे फलक लावण्यात येणार आहेत.**

कळे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात गावे व वाड्या मिळून एकूण ५३ गावे आहेत. या भागात ४० ग्रामपंचायती असून सर्व गावांसाठी केवळ ३० पोलीस पाटील कार्यरत आहेत. काही पोलीस पाटलांकडे अतिरिक्त गावांचा चार्जही आहे. त्यामुळे



पोलिस पाटलांना फलकाचे वितरण करताना कळे पोलीस ठाण्याचे सहा. पोलिस निरीक्षक दिपक कदम.

अनेकदा नागरिकांना पोलीस पाटील किंवा पोलिसांशी संपर्क साधताना अडचणी येत होत्या.याच पार्श्वभूमीवर कळे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कदम यांनी हा उपक्रम राबविला आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये लावण्यात येणाऱ्या फलकांवर संबंधित पोलीस पाटलांचे नाव, मोबाईल क्रमांक, कळे पोलीस ठाण्याचा संपर्क क्रमांक तसेच आपत्कालीन हेल्पलाईन ११२ यांची माहिती देण्यात आली आहे.

या फलकांमुळे गावकऱ्यांना तक्रार,वाद,अपघात, महिला अत्याचार,हरवलेली व्यक्ती, संशयास्पद हालचाली किंवा अन्य कोणत्याही घटनेची माहिती तत्काळ पोलीस पाटील व पोलिसांना देता येणार आहे. त्यामुळे नागरिक व पोलिसांमधील दुवा अधिक मजबूत होणार असून ग्रामीण भागात पोलिसांबाबतचा विश्वासही वाढण्यास मदत होणार आहे.

## श्री नामदेव सहकारी पतसंस्थेस २० लाखाचा निव्वळ नफा–कोळेकर

इचलकरंजी,ता.१०–

**येथील श्री नामदेव नागरी सहकारी पतसंस्थेस सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात २० लाख २० हजार रुपये इतका निव्वळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन उमाकांत कोळेकर यांनी दिली.**



चेअरमन कोळेकर म्हणाले,सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षात संस्थेचे वसुल भाग भांडवल २७ लाख असून अहवाल सालात राखीव व इतर निधी १ कोटी ३२ लाख आहे. ठेवी ४ कोटी ३९ लाख इतक्या आहेत तसेच येणे कर्ज ३ कोटी इतके आहे. संस्थेने ३ कोटी ३७ लाख इतकी एकूण गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचे खेळते भांडवल रु ६ कोटी ५० लाख इतके आहे. तसेच एकूण उलाढाल १७ कोटी इतकी झालेली आहे. सर्व तरतुदी वजा करुन मार्च २०२६ अखेर संस्थेस २० लाख २० हजार इतका निव्वळ नफा झालेला आहे. संस्थेचा निव्वळ एनपीए शुन्य टक्के इतका आहे.थकबाकी १ टक्के असल्याचे सांगितले. यावेळी व्हा.चेअरमन दिपक उरुणकर, नामदेव समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष व संचालक राजन उरुणकर, विजय खटावकर, संजय गोंदकर, योगेश नाझरे, चंद्रकांत पाडळकर, ज्ञानेश्वर पिसे, गोपिनाथ बोंगाळे, अशोक खोत, मनोज महाजन, मधुकर खटावकर, अमित बारट्टक्के, मंगल गणबावले, सिमा उरुणकर व सेक्रेटरी राजाराम जिरगे तसेच सेवक वर्ग उपस्थित होते.

# स्व-रचित काव्य वाचन स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

इचलकरंजी,ता.१०–

**येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने 'युवा स्पंदन २०२६' या उपक्रमामध्ये घेण्यात आलेल्या स्व–रचित काव्य वाचन स्पर्धेस स्पर्धकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यामध्ये हौसराव हुबाळे, शिराळा याने प्रथम, भारतजीवन प्रभूखोत, कोल्हापूर याने द्वितीय तर प्रियांका भाटले,इचलकरंजी हिने तृतीय क्रमांक मिळविला.**

या स्पर्धेसाठी प्रसिद्ध वक्ते प्रा.अशोक दास, कवी पाटलोबा पाटील आणि कवी सचिन कोरोचीकर हे परीक्षक म्हणून



युवास्पंदन उपक्रमातंर्गत स्व–रचित काव्य वाचन स्पर्धेतील विजेते स्पर्धक आणि परीक्षक व पदाधिकारी.

उपस्थित होते. प्रारंभी प्रतीक हुंद्रे याने परीक्षकांचा परिचय करून दिला तर मनोरंजन मंडळाचे सहकार्यवाह संतोष आबाळे यांनी प्रास्ताविक केले.

नाट्य परिषदेचे संचालक प्रा. मिलिंद दांडेकर यांच्या हस्ते परीक्षकांचे स्वागत करण्यात आले.यावेळी रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष घनश्याम सावलानी आणि सर्व परीक्षक तसेच पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि नटराज प्रतिमा पूजन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

या स्पर्धेतील सर्व युवक युवती स्पर्धकांनी, प्रेमापासून ते देशभक्तीपर्यंत विविध विषयावरील आशयपूर्ण कविता चांगल्या प्रकारे सादर केल्या व उपस्थितांचा प्रतिसाद मिळवला.स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ परीक्षकांच्या आणि संयोजक पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन सर्वेश होगाडेयाने तर संयोजनाची जबाबदारी त्रिंबक दातार व अनुजा कुलकर्णी यांनी पार पाडली. येथील रोटरी श्री दगडूलाल मर्दा मानव सेवा केंद्र सभागृहात सदरचा कार्यक्रम पार पडला. यावेळी स्पर्धक, पालक, शिक्षक आणि निमंत्रित उपस्थित होते.

## राजर्षी शाहू पतसंस्थेस १.९५ कोटींचा ढोबळ नफा–पोमाजे

कुरुंदवाड,ता.१०(प्रतिनिधी)–

**येथील राजर्षी शाहू नागरी सहकारी पतसंस्थेने सन २०२५ – २६ या आर्थिक वर्षात १९३ कोटी ४६ लाख रुपयांचा एकूण व्यवसाय केला आहे.संस्थेने १ कोटी ९५ लाख रुपयांचा विक्रमी ढोबळ नफा मिळविला आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन महावीर पोमाजे यांनी दिली.**

यावेळी ज्येष्ठ संचालक जिनगोंडा पाटील, माजी चेअरमन, दादासो पाटील, किरण आलासे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गजन्नावर आदी प्रमुख उपस्थित होते.

चेअरमन पोमाजे म्हणाले, संस्थेकडे चालू आर्थिक वर्षात ११८ कोटी ७५ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेने एकूण ७५ कोटी ३० लाख रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. भागभांडवल ३ कोटी १६ लाख रुपये आहे. राखीव व इतर निधी ९ कोटी ८२ लाख रुपये इतका आहे. संस्थेची एकूण गुंतवणूक ५६ कोटी ४ लाख रुपये आहे. खेळते भांडवल १३९ कोटी १ लाख रुपये आहे. संस्थेची थकबाकी केवळ १.०८ टक्के इतकी अल्प असल्याचे सांगितले. यावेळी संचालक आण्णासो गुदले, रावसो उगारे, धनपाल कोथळी, विजयकुमार जोंग, दौलत कांबळे, सुषमा उपाध्ये, पद्मराणी पाटील, आयेशा बागवान, धोंडीराम चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते.



विभागीय थ्रो बॉल स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक वर्ग.

## विभागीय थ्रो बॉल स्पर्धेत सरस्वती हायस्कूलचे सुयश

इचलकरंजी,ता.१०–

**रत्नागिरी येथे झालेल्या विभागीय थ्रो बॉल स्पर्धेत येथील सरस्वती हायस्कूलने यश मिळवले. या स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.**

या संघाचे अमृता जाधव हिने नेतृत्व केले तसेच वैभवी कुडाळकर, अलमित्रा गवते,वैष्णवी पत्तार,श्रुतिका वडे, वैभवी किणेकर, रिद्धी पाटील, कल्याणी वडर, अक्षरा म्हेतर या सर्वच विद्यार्थिनींनी उत्कृष्ट अशी खेळी करून संघास यश मिळवून दिले.त्याचबरोबर जिल्हास्तरीय थ्रो बॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला. या संघामध्ये अवधूत जमदाडे, श्रीनिवास सरबी, कृष्णा गांजवे, ऋषिकेश खोत यांनी उत्कृष्ट अशी खेळी करून संघास यश मिळवून दिले.तसेच १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने, १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने व १९ वर्षाखालील मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवला.संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह माने, सेक्रेटरी शिवाजी जगताप, जॉईंट सेक्रेटरी पृथ्वीराज माने व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सौ.रेखा जाधव,पर्यवेक्षक महावीर कांबळे, अरुण मोरे, संदीप हिरेमठ, सुनील दिवटणकर,संजय परीट,मंगेश खोत,उदय झपाटे,प्रशांत शिंगाडे,दिलीपकुमार सूर्यवंशी व सौ.शितल शिंदे या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

## डी.वाय.पाटील आर्किटेक्चर विद्यार्थ्यांच्या डिझाईन्सचे कोल्हापुरात प्रदर्शन

कोल्हापूर,ता.१०(प्रतिनिधी)–

**येथील डी.वाय.पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांनी बनवलेली विविध आर्किटेक्चर डिझाईन्स आणि वार्षिक कामाचे ता.१५ व ता.१६ एप्रिल रोजी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. बारावी उत्तीर्ण झालेले व आर्किटेक्चर ला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आर्किटेक्चर क्षेत्राची माहिती घेण्याची सुवर्णसंधी यानिमित्ताने उपलब्ध झाली आहे.**

डी.वाय.पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर, लाईन बाजार येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ पर्यंत होणाऱ्या या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांच्या आर्किटेक्चरल डिझाईन,बिल्डिंग कंस्ट्रक्शन,ग्राफिक्स, इंटिरियर डिझाईन, अर्बन डिझाईन तसेच अंतिम वर्षातील आर्किटेक्चरल प्रोजेक्ट इ. विषयांचे ड्रॉईन्स व मॉडेल्स मांडण्यात येणार आहेत. बुधवार ता.१५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरचे नॅशनल कौन्सिल मेंबर व नॅशनल हेरिटेज अँड कॉन्सर्व्हेशन समितीचे चेअरपर्सन सतीशराज जगदाळे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तर ता.१६ एप्रिल रोजी माजी विद्यार्थी आर्किटेक्ट अभिषेक नाईक व साकिब मुल्ला (बंगलोर) यांचे विद्यार्थ्यांसाठी सेमिनार आयोजित करण्यात आले आहे. सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रा.डॉ.संतोष चेडे, रजिस्ट्रार डॉ एल.व्ही.मालदे, विभाग प्रमुख इंद्रजीत जाधव यांनी केले आहे.

# कोरे महाविद्यालयात 'युरेका-जिज्ञासा'चे आयोजन

वारणानगर,ता.१०(प्रतिनिधी)–

**अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे तसेच त्यांच्यामधील नाविन्यपूर्ण कल्पकतेला चालना मिळावी व विज्ञान विषयक अविष्कार सादर करण्याची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने वारणा विद्यापीठाचे अग्रणी महाविद्यालय तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, वारणानगर गेली ३९ वर्षे 'युरेका–जिज्ञासा' ही राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्प प्रदर्शन व शोध निबंध स्पर्धा आयोजित करत असते.**

यावर्षी शनिवार ता.११ एप्रिल रोजी 'युरेका–जिज्ञासा टुके २६' या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना एक लाख पन्नास हजार रुपयांची बक्षिसे मिळणार आहेत. हि स्पर्धा राष्ट्रीय पातळीवरील असून विद्यार्थ्यांच्या संशोधन व चिकित्सक वृत्ती, संवादक्षमता, सर्जनशीलता या गुणांना प्रोत्साहन देते, अशी माहिती वारणा विविध उद्योग व शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.आ.विनय कोरे व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.व्ही. व्ही. कारजिन्नी यांनी दिली.

स्पर्धेसाठी वारणा विद्यापीठाचे कुलाधिकारी एन.एच.पाटील आणि कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के यांचे मार्गदर्शन लाभत आहे.या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गॅलेक्सी सरफेक्ट अँड कंपनीचे कार्यकारी संचालक,वैजनाथ कुलकर्णी व महेश माळकर उपस्थित राहणार आहेत.हि स्पर्धा एकूण अकरा विभागात घेतली जाणार आहे. नव्याने सुरू झालेल्या सायबर सिक्युरिटी, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि टीसीएस स्पॉन्सर्ड काम्प्युटर सायन्स अँड बिझनेस सिस्टम या विभागासाठी सायबर इथिक्स अँड सायबर कायदे, सायबर थ्रेट इंटेलिजन्स, एप्लीकेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन पावर सिस्टम ऑपरेशन,क्लाऊड काम्प्युटिंग,प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानावरती आधारित विषयांचा समावेश या स्पर्धेमध्ये करण्यात आलेला आहे.

# रेंदाळमध्ये डॉक्टर व सफाई कर्मचाऱ्यांचा गौरव

हुपरी,ता.१०(वार्ताहर)–

**जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून रेंदाळ येथील ग्रामपंचायतीमध्ये बिस्मिल्लाह फाउंडेशनच्यावतीने आरोग्य उपकेंद्रातील डॉक्टर आणि ग्रामपंचायतीचे सफाई कर्मचारी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.**

समाजाचे आरोग्य आणि स्वच्छता अबाधित राखणाऱ्या या घटकांचा कृतज्ञतापूर्वक गौरव उत्साहात पार पडला.याप्रसंगी बिस्मिल्लाह फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती मेहबूब मुजावर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरोग्य केंद्रातील डॉक्टर व सफाई कर्मचाऱ्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला रेंदाळचे उपसरपंच मुकुंद पतंगे,




बिस्मिल्लाह फाउंडेशनतर्फे डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा सन्मान करताना प्रमुख मान्यवर.

ग्रामपंचायत सदस्य गजानन वाईंगडे, अविनाश घोडेस्वार, दया पाटील, फैमुनीसा नाईकवाडे, आरोग्य केंद्राचे डॉ. प्रकाश गिरी, सफाई निरीक्षक सलोनी पुजारी, सरताज नाईकवाडे, जुबेर मोमीन, साहिल अत्तार,सरफराज खलिफा आदी उपस्थित होते.


श्रीहरी
शुक्रवार, ता. १०/०४/२०२६ पासून दुपारी १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
मस्तानी
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र ७ वा.
A लव स्टोरी प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १० पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
हायस्ट बिडर
A फक्त प्रौढांसाठी A

गुरु
शुक्रवार ता.१० पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.३०*३.३०*६.३० व ९.३० वा.
धुरंधर विसरा येत आहे त्यापेक्षाही जबरदस्त सुडाने पेटलेली प्रेमकथा



पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 गर्दीचा ३ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 7 वाजल्यापासून सुरू राहील
bookmyshow
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ३ खेळ
* दुपारी १२ व ४ आणि रात्री ९ वा.






राधाकृष्ण सिनेमा
RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow






" धुरंधर 2 : द रिव्हेंज " - हिंदी ( A )
09:45 AM, 11:00 AM, 12:15 PM, 02:00 PM 04:30 PM, 06:15 PM, 08:45 PM, 09:45 PM 10:30 PM
" सुपर डुपर " - मराठी ( U/A 16+ )
04:00 PM, 07:00 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ४ था आठवडा
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.
खास कमी केलेल्या दरात ति.दर रु. ५०






फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11






धुरंधर २ (HIN) (A)
11.00am, 01.30, 03.30, 06.00, 08.30, 10.30pm
सुपर डुपर (MAR) (U/A)
11.30am, 07.30pm
सखे गं साजणी (MAR) (U/A)
05.00pm
प्रोजेक्ट हेल मेरी (HIN) (U/A)
02.00, 10.00pm
आता पहा कोणताही शो फक्त 100 पासून पुढे

# सभेला दांडी मारणाऱ्या अधिकाऱ्यांना नोटीस

## मिरज पंचायत समिती सभापतींची कडक भूमिका

मिरज,ता.१०(प्रतिनिधी)-

**मिरज पंचायत समितीच्या पहिल्याच मासिक सभेला दांडी मारणाऱ्या विविध विभागातील शासकीय अधिकाऱ्यांविरोधात सभापती तन्वी कमलेकर यांनी कडक भूमिका घेत कारणे दाखवा नोटिसा बजावण्याचे आदेश दिले.**

सभापती कमलेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या पहिल्या सभेच्या सुरुवातीला एरंडोली येथील सुपूत्र व केज तालुक्याचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती निधनाबद्दल श्रद्धांजली वाहण्यात आली. यासाठी सदस्य सुप्रिया तवटे यांनी प्रस्ताव मांडला.उपसभापती ललिता शेजुळ व प्रभारी गटविकास अधिकारी ज्ञानदेव मडके यांची प्रमुख उपस्थिती होती. सभेदरम्यान सदस्य राजेंद्र माळी यांनी अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीचा मुद्दा उपस्थित करताच सभापतींनी तातडीने कारवाईचे निर्देश दिले.




यावेळी बांधकाम, कृषी, शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, पाणीपुरवठा, जीवन प्राधिकरण आदी विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. बांधकाम विभागाच्या कामांमध्ये दिरंगाई होत असल्याबद्दल सदस्य शोभा मोहिते यांनी नाराजी व्यक्त करत पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्याची मागणी केली.

संयोगिता कोळी यांनी जुनी धामणी शाळेच्या निर्लेखनाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सांगितले, तर सूरज मगदूम यांनी अंकलीतील विकास कामांची माहिती वेळेत मिळत नसल्याची तक्रार केली.

विनायक जाधव यांनी कसबेडिग्रज येथील बाजार कट्टा अपूर्ण असल्याचे निदर्शनास आणले. स्नेहल पाटील यांनी बुधगाव येथील मुलींची शाळा धोकादायक स्थितीत असल्याचे सांगून निर्लेखनाची मागणी केली.

गायत्री घोरपडे यांनी म्हैसाळ-नरवाड रस्ता रखडल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई केल्याचे सांगत लवकरच काम सुरू होईल, असे बांधकाम विभागाने स्पष्ट केले. बेडग-बोलवाड रस्त्याच्या साईड पट्टया भरण्याची मागणी विष्णू पाटील यांनी केली, तर बाळासाहेब पाटील यांनी भोसे प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील राष्ट्रीय मार्गाच्या सेवा रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची गरज व्यक्त केली. पाणीपुरवठा योजनेबाबत संदीप बंडगर यांनी खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. उन्हाळ्यातही केवळ ६०-७० टक्के काम पूर्ण झाल्याबद्दल शोभा मोहिते यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत आंदोलनाचा इशारा दिला.

पशुवैद्यकीय विभागाच्या आढाव्यात मिरज तालुक्यातील २४ पैकी १२ दवाखान्यांत डॉक्टरांची पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले. ही पदे तत्काळ भरण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. शिक्षण विभागाच्या आढाव्यात शिक्षकांवर बीएलओ, एसआयआर व जनगणनेची जबाबदारी टाकल्याने अध्यापनावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले. ही कामे समग्र शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांकडे देण्याची मागणी सभागृहाने केली.

दरम्यान, टाकळी येथील सदस्या रिदा सुलेमान मुजावर यांनी मिरज शहरातील नशेचे प्रमाण ग्रामीण भागात वाढत असल्याचा मुद्दा उपस्थित करत मेडिकलमधून मिळणाऱ्या संशयित औषधांवर कारवाई करावी,अशी मागणी केली.

# सांगली,मिरज,कुपवाडसाठी ५४७ कोटींचा निधी द्यावा

## आ.सुधीर गाडगीळ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

सांगली,ता.१०(प्रतिनिधी)-

**सांगली,मिरज,कुपवाड महापालिका क्षेत्राच सर्वांगीण विकास आणि मूलभूत पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी आमदार सुधीर गाडगीळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.**

जागतिक बँकेच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून सांगलीच्या विकासाला गती देण्यासाठी सुमारे ५४७ कोटी रुपयाची गरज असल्याचे निवेदन मुख्यमंत्र्यांना दिले.आमदार गाडगीळ यांनी दिलेल्या निवेदनात प्रामुख्याने दोन मोठ्या प्रकल्पांसाठी निधीची मागणी करण्यात आली आहे.वारणा नदी उद्भव आधारित पाणीपुरवठा योजना सांगली शहराच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता, वारणा नदीवरून पाणी उपलब्ध करून देणाऱ्या योजनेसाठी सुमारे ४५४ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.शेरीनाला व मलशुद्धीकरण प्रकल्प शेरीनाला, वखारभाग येथील उंच मलशुद्धीकरण केंद्र उभारणे आणि इतर अनुषंगिक कामांसाठी सुमारे ९३.५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे अधोरेखित केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देऊन चर्चा करताना आम.सुधीर गाडगीळ.

आमदार गाडगीळ यांनी मांडलेल्या विषयांचे महत्त्व लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावर सकारात्मक भूमिका दर्शवली आहे. जागतिक बँकेच्या निधीतून ही कामे मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.या भेटीमुळे सांगलीच्या प्रलंबित विकासकामांना आता मोठी गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## म्हैसाळच्या मानतेश पाटीलची उपजिल्हाधिकारी पदी निवड

मिरज,ता.१०(प्रतिनिधी)-

**म्हैसाळ (ता. मिरज) येथील मानतेश पिरगोंडा पाटील याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परिक्षेत उल्लेखनीय यश मिळवत उपजिल्हाधिकारी पद मिळवले. आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातून राज्यात प्रथम क्रमांक पटकावत त्याने गावाचे नाव उज्ज्वल केले.**



अंगणवाडी सेविका आई सुनीता पाटील व शेतमजूर वडील पिरगोंडा पाटील यांच्या कष्टांचे फळ म्हणून हे यश मानले जात आहे. यापूर्वी त्याने पोलिस उपअधीक्षक परीक्षेतही उत्तीर्ण होत तिसरा क्रमांक मिळवला होता. हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत,पुण्यात नोकरी करत अभ्यास सुरू ठेवत त्याने हे यश संपादन केले. त्याची जिद्द व चिकाटी स्पर्धा परीक्षार्थींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.उपजिल्हाधिकारी होण्याचे स्वप्न होते. नियोजनबद्ध अभ्यास केला. जिद्द आणि चिकाटीने तयारी केली. यातून हे यश मिळाले. आई, वडील,शिक्षक, मित्र परिवाराचे मार्गदर्शन,प्रोत्साहन व प्रेरणा लाभली,अशी प्रतिक्रिया मानतेश पाटील याने दिली.

## रिळे येथे ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन

चांदोली,ता.१०(वार्ताहर)-

**नागभूमी साहित्य मंच बत्तीस शिराळा यांच्यावतीने रविवार ता.१२ एप्रिल रोजी रिळे (ता.शिराळा) येथे चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती नागमणी साहित्य मंचच्यावतीने देण्यात आली.**

यावेळी रिळे येथील भैरवनाथ मंदिरामध्ये संपन्न होणाऱ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे उद्घाटन रिळे गावचे युवा सरपंच बाजीराव सपकाळ यांच्या हस्ते होणार असून या संमेलनाचे अध्यक्षपद सुप्रसिद्ध लेखक-विष्णू पावले हे भूषवणार आहेत. या संमेलनामध्ये कवयित्री सौ.भारती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नागमणी खुले कवी संमेलन होणार असून यामध्ये सांगली जिल्ह्यातील नामवंत व नवोदित कवी सहभागी होणार आहेत. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक आनंदहरी, बेलेवाडीच्या सरपंच वंदना जाधव, रिळे गावच्या उपसरपंच लक्ष्मी गायकवाड, बेलेवाडीच्या उपसरपंच सुवर्णा जाधव आदी मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी नागमणी साहित्य मंचचे सर्व पदाधिकाऱ्यांसह रिळे व बेलेवाडी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## सत्यजित सहकारी पतसंस्थेचा १७७ कोटींचा व्यवसाय-पाटील

कराड,ता.१०(प्रतिनिधी)-

**सत्यजित ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेने सभासद, ठेवीदार यांच्या सहकार्याने उत्तम आर्थिक प्रगती साधली आहे. संस्थेच्या ठेवीत सातत्याने वाढ होत असून चालू आर्थिक वर्षात सत्यजित पतसंस्थेने १०० कोटी ठेवी तर १७७ कोटींच्या व्यवसायाचा टप्पा ओलांडला असून १ कोटी १९ लाखांहून अधिकचा नफा झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक नामदेवराव पाटील यांनी दिली.**

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष शिवाजी जमाले, संचालक सत्यजित पाटील, व मुख्य व्यवस्थापक दीपक पाटील यांच्यासह अन्य संचालक उपस्थित होते.नामदेव पाटील यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा सादर केला. ठेवी १००.३० कोटी, कर्जे ७७.३८ कोटी, सभासद ५६२५, भाग भांडवल ५ कोटी ३३ लाख, गुंतवणूक ३२.२५ कोटी तर नफा १.१९ कोटी झाल्याचे त्यांनी सांगितले.

## रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या फळविक्रेत्यांवर कारवाईची मागणी

कराड,ता.१०(प्रतिनिधी)-

**कराड शहरात बाहेरून आलेल्या परप्रांतीय फळविक्रेत्यांकडून बिनधास्तपणे रस्त्यावर हातगाड्यावरून तसेच फुटपाथवर प्लास्टिकच्या पेट्या, लाकडी बॉक्स लावून फळविक्री केली जात आहे. त्यामुळे शहरातील फुटपाथवरील नागरिकांना रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे.अशा फळविक्रेत्यांवर पालिकेने तत्काळ कारवाई करावी, अशी नागरिकांच्यावतीने कराड पालिकेकडे मागणी करण्यात आली आहे.**

फळविक्रेते ज्या ठिकाणी आपला व्यवसाय थाटतात त्या ठिकाणी कालांतराने अतिक्रमण करतात. त्यांच्या अतिक्रमणालाही पालिकेने हटवावे. कृष्णा घाट, कार्वे नाका, कोल्हापूर नाक्यावर, बसस्थानक ते कृष्णा नाका पर्यंतचे पादचारी मार्ग अशा ठिकाणी फळविक्रेत्यांची संख्या हळूहळू वाढत आहे. त्यावर पालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकाने पहिली कारवाई करावी, अशी मागणी देखील नागरिकांकडून करण्यात आली आहे.

# कुसुमताई विशाल अंतकरणाच्या आदर्श माता होत्या-डांगे

वाळवा,ता.१०(प्रतिनिधी)-

**कुसुमताई नायकवडी या विशाल अंतकरणाच्या आदर्श माता होत्या. त्यांनी त्यांच्या मुलांच्यावर उत्तम संस्कार केलेच, पण सोबत हुतात्मा संकुलातील सर्व घटकांवर आईच्या ममत्वाचा पदर धरला. त्यांच्या पदराच्या सावलीमध्ये हुतात्मा शिक्षण आणि उद्योग समूहाची विकासाची गंगा वाहती झाली, असे गौरवोद्गार माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनी काढले.**

वाळवा येथील हुतात्मा शिक्षण आणि उद्योग समूहाच्या वतीने आयोजित स्वर्गीय कुसुमताई नायकवडी यांच्या ९४ व्या जयंती समारंभाच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कवी प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार म्हणाले,ज्यांच्या हृदयाचा दरवाजा उघडा असतो त्याला आई कळते. कुसुमताई नायकवडी या उत्तम शिक्षिका, आदर्श मुख्याध्यापक, आदर्श पत्नी आणि आदर्श आई होत्या.आणि त्या सिद्धहस्त लेखिका होत्या,असे गौरवोद्गार डॉ.पोतदार यांनी काढले.



वाळवा येथे स्व.कुसुमताई नायकवडी यांच्या जयंती समारंभ कार्यक्रमात बोलताना अण्णासाहेब डांगे, व्यासपीठावर अन्य प्रमुख मान्यवर.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. राजा माळगी यांनी उपस्थितांचे स्वागत करून,पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्वागत आणि प्रास्ताविक कार्यक्रमाचे निमंत्रक वैभव नायकवडी यांनी केले.या कार्यक्रमासाठी महादेव कांबळे, कारखान्याचे व्हा.चेअरमन ज्ञानदेव भाडळकर, कारखान्याचे संचालक व दूध संघाचे चेअरमन गौरव नायकवडी, वीरधवल नायकवडी, नंदिनी नायकवडी, हुतात्मा बझारचे चेअरमन दिनकर बाबर, हुतात्मा पतसंस्थेचे चेअरमन अजित वाजे, भगवान पाटील,सरपंच संदेश कांबळे, विश्वास थोरात,तुकाराम डवंग, गंगाराम सूर्यवंशी, रामचंद्र पाटील, शरद थोरात,अरविंद कदम, संभाजी पाटील, लक्ष्मण शिंदे ,विशाखा कदम, जयश्री अहिर,वैशाली मोहिते, जि.प. सदस्य संताजी मेटकरी आदी मान्यवर उपस्थित होते.

## विघ्नहर्ता पतसंस्थेला १.३० कोटींचा ढोबळ नफा-नायकल

पेठ,ता.१०(वार्ताहर)-

**पेठ (ता. वाळवा) येथील विघ्नहर्ता गा. बि. शेती सहकारी पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात तब्बल १ कोटी ३० लाख ८६ हजार रुपयांचा ढोबळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे चेअरमन सयाजी नायकल यांनी दिली.**



नायकल म्हणाले, सन २०१६ मध्ये राजारामबापू कारखान्याचे संचालक अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची स्थापना करण्यात आली. गेल्या नऊ वर्षांपासून संस्थेने शून्य टक्के एन.पी.ए.ची परंपरा कायम राखली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेकडे २५ कोटी ७२ लाख रुपयांच्या ठेवी असून, सभासदांना १७ कोटी ३२ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. संस्थेच्या तरतुदीनुसार ५३ लाख २३ हजार रुपयांचा निव्वळ नफा राखण्यात आला आहे.

यावेळी व्हाईस चेअरमन दीपक माळी,सरपंच सुभाष भांबुरे, हणमंतराव पाटील, अशोक पाटील, विकास मगदूम, संजय माळी, अमोल रायसिंग वारके, प्रल्हाद कदम,विजय मधाळे, सयाजी पवार, अरुण कदम, अंकुश मस्के,विनोद गावडे, सरदार जमादार, कुंदाताई साळुंखे, सारिका देसाई, पद्मावती माळी, सचिव विक्रम कदम, सल्लागार व सभासद उपस्थित होते.

# सांगली महापालिका क्षेत्रात नवीन शौचालये उभारणार

### स्थायी समिती सभेत मंजुरी

सांगली,ता.१०(प्रतिनिधी)-

**सांगली, मिरज, कुपवाड महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सोयीसाठी आणि स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी विविध भागांत नवीन सामुदायिक शौचालये उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झालेल्या स्थायी समिती सभेत घेण्यात आला. या प्रकल्पासाठी सुमारे १ कोटी ६९ लाख ८ हजार ४०० रुपयांच्या निविदा प्रक्रियेस स्थायी समितीने मंजुरी दिली आहे.**

महानगरपालिका मुख्यालयातील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृहात सभापती अतुल माने यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा पार पडली. या सभेला अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, उपायुक्त अश्विनी पाटील व स्मृती पाटील यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

शासनाकडून प्राप्त निधी आणि महानगरपालिकेचा हिस्सा मिळून एकूण ५० सीट्सची नवीन शौचालये उभारली जाणार आहेत. यासाठी ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यास आणि त्यावरील खर्चास समितीने कायदेशीर मान्यता दिली आहे.या कामासाठी शासनाचा ८७ लाख ५० हजार रुपये निधी आणि महानगरपालिकेचा ८१लाख ५८ हजार रुपये निधी अशा एकूण निधीतून शहर स्वच्छतेच्या पायाभूत सुविधा अधिक बळकट केल्या जाणार आहेत.

या सभेस स्थायी समिती सदस्य पद्मश्री पाटील,मालुश्री खोत, मोहन वाटवे,गणेश माळी, उदय बेलवलकर, स्वाती शिंदे, कीर्ती देशमुख, बबीता मेंढे, स्मिता यमगर, दिपाली पाटील, मयूर पाटील, अभिजीत भोसले, शिरीन पिरजादे, मैनुद्दीन बागवान आणि सुरेश बंडगर उपस्थित होते. सभेचे कामकाज महापालिका सचिव सहदेव कावडे यांनी पाहिले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सुविधांच्या पूर्ततेसाठी स्थायी समिती कटिबद्ध असल्याचे यावेळी अतुल माने यांनी नमूद केले.

# श्रीनिवास पाटील यांना 'सातारा भूषण' पुरस्कार

सातारा,ता.१०(प्रतिनिधी)-

**रा. ना. गोडबोले सार्वजनिक ट्रस्ट, सातारा व सातारकर नागरिकांतर्फे दरवर्षी ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला, क्रीडा, राजकीय तसेच सामाजिक अशा क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या आणि सातारा जिल्ह्याचा नावलौकिक वाढविणाऱ्या सातारा जिल्ह्याच्या सुपुत्राला / संस्थेला 'सातारा भूषण' पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी ट्रस्टने श्रीनिवास दादासाहेब पाटील यांना सदर पुरस्कार जाहीर केला आहे. रोख रु. ४०,००० व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.**



श्रीनिवास दादासाहेब पाटील यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात झाला. त्यांनी सातारा जिल्ह्याच्या आणि विशेषतः येथील ग्रामीण भागाच्या जडणघडणीत सामाजिक आणि शैक्षणिक स्तरावर अत्यंत मोलाचे कार्य केले आहे. सहकार क्षेत्रातील त्यांच्या कार्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतीला एक नवी दिशा मिळाली.

साताऱ्याची अस्मिता, गड-किल्ले आणि तिथला ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. प्रतिसरकारच्या चळवळीतील स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान आणि त्यांच्या कार्याचा इतिहास तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी विशेष कष्ट घेतले. श्रीनिवास पाटील यांनी सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असताना प्रशासनात अनेक धाडसी आणि लोकोपयोगी निर्णय घेतले. त्यापैकी लोकदरबार किंवा जनता दरबार ही संकल्पना खूप गाजली. सातारा आणि परिसरातील शिक्षण, सहकार आणि शेती क्षेत्रातील त्यांचे योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून 'सातारा भूषण' पुरस्कारासाठी ट्रस्टींनी त्यांची निवड केली आहे.अशी माहिती ट्रस्टचे ट्रस्टी डॉ.अच्युत गोडबोले यांनी दिली आहे.

## महापालिका शाळेत वॉटर फिल्टरची सोय

मिरज,ता.१०(प्रतिनिधी)-

**शहरातील वॉर्ड क्र. ४ मधील महानगरपालिका शाळा क्र. २२ येथे विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे नवीन फिल्टर व पाण्याच्या टाकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या सुविधेचे उद्घाटन मिरज शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक किरण चौगले यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.**

शाळेतील जुन्या पाण्याच्या टाकीची अवस्था अत्यंत खराब झाल्याने विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाली होती. ही समस्या लक्षात घेऊन फिरोज नदाफ यांच्या देणगीतून नवीन वॉटर फिल्टर बसविण्यात आला. तसेच पाण्याच्या टाकीचे संपूर्ण कामकाज आंबेडकरी चळवळीचे नेते डॉ.महेश कुमार कांबळे यांनी स्वखर्चातून पूर्ण केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अरुण कदम, निलेश वायदंडे, पिंटू कांबळे तसेच पालक वर्ग उपस्थित होते.

# पंढरीत महर्षी वाल्मिकी संघाचे अनोखे आंदोलन

## चंद्रभागा जलशुध्दीकरण मशिनरीवर झळकले डिजिटल फलक

पंढरपूर,ता.१०(प्रतिनिधी)-

**'मंत्र्यांचे दौरे असल्यावर,आठ एकादशी व चार यात्रा कालावधीतच मी चालू असते किंवा बिल काढण्याच्या दोन दिवस अगोदरच मी सुरू असते,इतरवेळी मात्र मी कायम बंदच असते त्यामुळे माझ्या चंद्रभागा जलशुद्धीकरणाच्या कामाचे बिल काढू नका, आम्ही चंद्रभागेचे पाणी शुध्द केलेले नाही.' अशा आशयाचा डिजिटल फलक चंद्रभागेच्या पात्रात जलशुद्धीकरणासाठी उभारण्यात आलेल्या सेबर टेक्नॉलॉजीच्या मशिनरीवर लावण्यात आला.**

पंढरपुरमधील महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने हे अनोखे आंदोलन सुरू केले आहे. आजपर्यंत या मशिनरी बसवलेल्या ठेकेदाराचे साडे पाच कोटी बिल शासनाने अदा केले.एकुण २४ ते अठ्ठावीस कोटींचे आणखी बिल संबंधित ठेकेदार शासनाकडून मिळवणार आहे, या ठेकेदारावर एका मंत्र्याचा वरदहस्त असल्याने भक्त पुंडलिकरायाच्या समोरंच पवित्रं चंद्रभागेच्या पात्रात ही पत्र्याची बिनकामाची डबडी उभारून शासनाला कोट्यावधीचा गंडा घालण्याचे महापातक चंद्रभागेच्या जलशुद्धीकरणाच्या नावाखाली केले जात आहे. हे आम्ही कदापीही खपवून घेणार नाही.संबंधित ठेकेदाराच्या या मशिनरीच्या जलशुद्धीकरण कामाची शहानिशा केली तर फक्त एकादशी, यात्रा कालावधीत व मंत्र्यांचे दौरे असतात तेव्हाच या मशिनरी सुरु केल्या जातात. इतरवेळी कायम बंद असतात, मग यासाठीचे कोट्यावधी रूपयांची बिलें शासनाने का द्यावी? असा खडा सवाल महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केला आहे.



'माझ्या चंद्रभागा जलशुद्धीकरणाच्या कामाचे बिल काढू नका, आम्ही चंद्रभागेचे पाणी शुध्द केलेले नाही.'अशा आशयाचा डिजिटल फलक लावून अनोखे आंदोलन करताना महर्षी वाल्मिकी संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

दरम्यान,शासनाने जर यासंदर्भात तातडीने चौकशी लावुन कोट्यावधीचं घबाड घशात घालणाऱ्या ठेकेदारावर व त्याला साथ देणाऱ्या शासनातीलंच काही दलालांना कडक शासन केले नाही तर आम्ही स्वस्थ बसणार नाही, चंद्रभागेच्या पात्रात मोठे जनआंदोलन उभारून सबंध महाराष्ट्राचे लक्ष या भ्रष्टाचाराकडं वेधून घेऊ आणि प्रसंगी सेबर टेक्नॉलॉजीच्या या मशिनरी भंगारात घालून टाकू, त्यावेळी जर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याला सर्वस्वी प्रशासन व शासन जबाबदार राहील. असा इशाराही महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव व कार्यकर्त्यांनी दिला.

महासत्ता, इचलकरंजी

# भविष्यज्ञान

पान १०

शनिवार, ११ एप्रिल २०२६

## महादशांचा प्रवास आणि आपली यशापयशाची अवस्था

विशिष्ट काळात विशिष्ट निर्णय व क्रुती होते आणि त्यातून तुमचे भवितव्य घडते. ह्या सगळ्यामागे तमच्या मनाची त्या त्या वेळी असलेली स्थिति जबाबदार असते. सातत्याने गतीमान असलेल्या सर्यमालेतील ग्रहस्थितीनुसार ती तशी स्थिति प्रभवित होते कां, ह्यावर सुरवातीच्या प्रश्नाच्या उत्तराची सत्यासत्यता अवलंबून आहे. एकाच दिवशी, एकाच वेळी , एकाच ठिकाणी जन्मलेल्या बाळाचे भागदेय सारखेच असते का? बहुतेक, हेच सत्य असावे:

मानसिक स्थितीनेच आपले भवितव्य अधिक घडते. दैवी शक्ती ही मनाला फक्त तथास्तु म्हणत असावी.

सर्वांना जीवनात सुख व दु:खाचे उन्हाळे वा पावसाळे अनुभवावेच लागतात. सदा सर्वकाळ कधीही कोणीही कायम सुखी वा दु:खी नसतो. आयुष्य हे खरोखर एक कोडे आहे, त्यातील चढ उतार प्रत्येकासाठी वेगवेगळ्या वेळचे आणि पर्णतः भिन्न असतात. ज्योतिष ह्या कोड्याचा उलगडा प्रत्येकाच्या आयुष्यात जन्मवेळेनसार असणार्या चंद्राच्या विशिष्ट राशीतील अंशात्मक स्थितीवरुन काढल्या जाणार्या ग्रह-महादशांच्या साखळीच्या सहाय्याने करते. हा आपला महादशांचा प्रवास आपली यशापयशाची अवस्था दाखवतो

महादशा:

जन्मवेळच्या चंद्र ज्या राशीत ज्या नक्षत्रात, जसा अंशात्मक स्थितीत असतो, त्यावरुन कोणत्या ग्रहाची महादशा कशी सरू होणार ते पंचांगातील कोष्टकावरून गणित करून काढता येते. प्रथम राशी तसेच नक्षत्रसमुहावरून जीवनात प्रथम कोणत्या ग्रहांची महादशा येते त्याचे कोष्टक पाहू. प्रत्येक ग्रहाची विशिष्ट कालखंडाइतकीच महादशा असते.

मेष-सिंह-धनु: सुरवातीची केतु महादशा

व्रुषभ-कन्या-मकर: सुरवातीची रवि महादशा

मिथून-तूळ-कुंभ: सुरवातीची मंगळ महादशा

कर्क-व्रुश्चिक-मीन:सुरवातीची गुरू महादशा.

ह्या प्रत्येक राशीसमुहाला सारख्याच क्रमाने ग्रहांच्या महादशा येतात.

ग्रहांच्या महादशांचा क्रम व **कालखंड असे:**

**केतु: ७वर्षे,शुक्र: २० वर्षे,रवि: ६ वर्षे,चंद्र:१० वर्षे ,मंगळ: ७ वर्षे,राहू:२०वर्षे,गुरु:१६वर्षे, शनी:१९वर्षे,बुध: १७वर्षे**

**आता नक्षत्रसमुहावरुन कोणत्या ग्रहाची महादशा येते ते पाहू:**

**१ क्रुत्तिका-उत्तरा-उत्तराषाढा: रवि ६ वर्षे**

**२ रोहिणी-हस्त-श्रवण: चंद्र १० वर्षे**

**३ म्रुग-चित्रा-धनिष्ठा: मंगळ ७ वर्षे**

**४ आर्द्रा-स्वाती-शततारका: राहू १८ वर्षे**

**५ पुनर्वसु-विशाखा-पूर्वाभाद्रपदा: गुरु १६ वर्षे**

**६ पुष्य-अनुराधा-उत्तराभाद्रपदा: शनी १९ वर्षे**

**७ आश्लेषा-ज्येष्ठा-रेवती: १७ वर्षे बुध**

**८ मघा-मूळ-अश्विनी: केतु ७ वर्षे**

**९ पूर्वा-पूर्वाषाढा-भरणी: शुक्र २० वर्षे**



आपण कोणत्या ग्रहाच्या महादशेपासून आपला जीवनारंभ करतो, ते आपल्या

किरण जक्कण्णावर,इचलकरंजी
मो.नं.९८६०७७६४६४

जन्मनक्षत्राप्रमाणे वरील माहितीनुसार समजेल. प्रत्येक नक्षत्र १३अंश व २० कला इतके असते. आपल्या जन्म चंद्राच्या अंशात्मक स्थितीवरुन आपल्या नक्षत्रात किती अंश व कला जन्मचंद्र आहे ते प्रथम काढावयाचे. त्याप्रमाणे जर, १३अंश २० कलांसाठी नक्षत्रासाठी जितकी वर्षे त्या ग्रहाची महादशा, तर ह्या जन्मचंद्राच्या अंश नक्षत्रांसाठी अगोदरच किती वर्षे महादशेची संपली ते उमजू शकते. उरलेली वर्षे, महिने दिवस त्या ग्रहाची महादशा आपणास असेल. शिवाय काही पंचांगात चंद्राच्या अंशात्मक स्थितीनुसार कोणती महादशा किती असेल त्याचे सुलभ कोष्टकही पाहता येईल. वरील क्रमवारीप्रमाणे, त्या ग्रहाच्या पुढच्या ग्रहाची पूर्ण महादशा त्यानंतर येईल. त्यापुढे त्यापुढच्या ग्रहाची.. अशा पद्धतीनुसार आपली महादशांची साखळी काढता येते.

जीवनरेखा व महादशांची साखळी:

जीवन हा जणु रेल्वेचा प्रवास आहे कोल्हापूर ते मुंबई असे पूर्ण अंतर आहे वरील सर्व महादशांच्या कालखंडाच्या बेरजेचे, अर्थात १२० वर्षे. तुम्ही जन्मता कुठल्या महादशेत त्यावरून तुमचे ह्या प्रवासातील सुरवातीचे स्थानक कोणते, ते लक्षात येईल. कोण मिरजेला चंद्रमहादशेपासून, तर कोण साताराला मंगळ महादशेपासून सुरवात करेल. म्हणूनच प्रत्येकाची महादशेची साखळी वेगळी व त्याप्रमाणे जीवनातील चढ उतार वेगळे. त्यांची तीव्रता तुमच्या पत्रिकेतील ग्रहमानाप्रमाणे बरी मध्यम वा चांगली असेल.

शुक्र बुध व गुरु ह्या ग्रहाच्या महादशा सर्वसाधारणपणे चांगली फळे देतात. तर रवि चंद्र महादशा पत्रिकेतील शुभाशुभ स्थितीनुसार बरी वा वाईट फळे देतील. शनीची महादशा संमिश्र तर राहू केतुच्या महादशा कसोटी पहाणाऱ्या असे ढोबळ अनुमान मांडता येईल. कुणाचे बालपण तर कुणाची प्रौढावस्था खडतर असेल, तर दुसऱ्या कुणाचे तारूण्य वा वार्धक्य सुखसमाधानाचे असू शकते ते त्या वयात येणाऱ्या ग्रहाच्या महादशेनुसार. असे हे जीवनातील सुख वा दु:खाचे कोडे ग्रह महादशांच्या साखळीशी निगडीत आहे.

अंतर्दशा :

ग्रहाची महादशा जितक्या वर्षांची असते, तिचे परत सर्व ग्रहांच्या अंतर्दशा, त्याच प्रमाणात त्याच क्रमाने येतात. म्हणजे शुक्राची २० वर्षे महादशा एकूण १२० वर्षांपैकी, म्हणून शुक्राच्या महादशेत प्रथम शुक्राची अंतर्दशा एकूण विस वर्षाच्या एक षष्ठांश म्हणजे ३वर्षे ४महिने, त्यापुढे रविची अंतर्दशा अशा प्रमाणे पुढे चंद्र, मंगळ... अंतर्दशा येतील. ह्या सर्वांची बेरीज विस वर्षे असेल. पुढे शुक्राच्या विस वर्षांच्या महादशेत सर्व ग्रहांच्या अंतर्दशा किती असतात, ते पंचांगातील कोष्टकावरून दिल्या आहेत: शुक्राच्या २० वर्षे महादशेत

**ग्रहांच्या अंतर्दशा-**

| ग्रह | अंतर्दशा |
| --- | --- |
| शुक्र | ३ वर्षे ४ महिने |
| रवि | १ वर्ष |
| चंद्र | १ वर्ष ८ महिने |
| मंगळ | १ वर्ष २ महिने |
| राहू | ३ वर्षे |
| गुरू | २ वर्षे ८ महिने |
| शनी | ३ वर्षे २ महिने |
| बुध | २ वर्षे १० महिने |
| केतु | १ वर्ष २ महिने |
| एकुण | २० वर्षे. |

सुक्ष्मदशा: व्यावहारिक उपयोग: आता प्रत्येक ग्रहाची अंतर्दशा प्रत्येक ग्रहाच्या सुक्ष्मदशेत तशीच त्याच प्रमाणात, त्याच क्रमाने विभागली जाते. सुरुवात अर्थातच ज्याची अंतर्दशा असेल त्याच्या सुक्ष्मदशेपासून होईल. हल्ली कॅम्पुटराईज्ड पत्रिका करून मिळतात. त्यात तुमच्या जीवनातील सुरवातीपासून अखेरपर्यंत येणाऱ्या महादशा अंतर्दशा सुक्ष्मदशा तारीखवार दिलेल्या असतात. त्यावरुन तुम्हाला वर्तमानात ह्या दशांची स्थिति कळेल. चालू व जवळच्या आगामी काळातील परिस्थितीचा बरा मध्यम चांगला असा अंदाज तुम्ही घेऊ शकता. त्याप्रमाणे आपल्या अपेक्षा व प्रयत्न ह्यांच्यात सुयोग्य समतोल साधणारे बदल नेहमी करू शकता.ज्योतिष व महादशा ह्यांचा असा व्यावहारीक जीवन अधिक काबूत ठेवण्यासाठी उपयोग करू शकता. तसेच आपल्या कुटूंबियांच्या महादशा आदि समजून घेऊन त्यांनाही मार्गदर्शन करू शकता. कठीण व उत्तम असे चक्र सातत्याने जीवनात कां चालू असते, त्याचा उलगडा ह्या महादशांवरील विवेचनावरून ध्यानात येईल.

## १३ एप्रिलपासून या राशींच्या लोकांसाठी सुवर्णकाळ



ग्रहांचा राजकुमार बुध पुन्हा एकदा आपले नक्षत्र बदलणार आहे. तो सोमवार, १३ एप्रिल रोजी दुपारी २ वाजून २६ मिनिटांनी उत्तरा भाद्रपदा नक्षत्रात प्रवेश करेल. बुध २२ एप्रिलपर्यंत याच नक्षत्रात राहील. ज्योतिषशास्त्रानुसार, उत्तरा भाद्रपदा नक्षत्राचा अधिपती ग्रह शनि आहे, जो न्यायाचा देव असून संघर्ष, कृती आणि शिस्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे, जेव्हा बुद्धी आणि व्यवसायाचा घटक असलेला बुध, शनिच्या घरात प्रवेश करतो, तेव्हा काही विशिष्ट राशींवर त्याचे शुभ परिणाम होऊ शकतात. यामुळे तुमची निर्णयक्षमता मजबूत होऊ शकते आणि रखडलेली कामे वेगाने पूर्ण होऊ शकतात. तसेच तुम्हाला करिअर आणि व्यवसायात अपेक्षित यश मिळू शकते. बुध संक्रमणाचा कोणत्या राशींच्या लोकांना फायदा होणार आहे जाणून घ्या

या राशींच्या लोकांना होणार फायदा

मेष रास

मेष राशीसाठी हा काळ चांगला राहील. व्यवसाय आणि करिअरमध्ये नवीन ऊर्जा येईल. या काळात बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेले व्यवहार पूर्ण होऊ शकतात. गुंतवणुकीतून आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. मेष राशीच्या व्यक्तींची त्यांच्या करिअरमध्ये प्रगती होईल आणि या काळात बाजारातील कल समजून घेतल्याने तुम्हाला माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होईल. तुम्हाला मोठ्या प्रमाणावर प्रवास करण्याची संधी मिळेल, जी फायदेशीर ठरू शकते. लोकांशी चांगल्या संवादामुळे आत्मविश्वासात वाढ होईल.

कर्क रास

कर्क राशींच्या लोकांना या काळात नशिबाची साथ मिळेल. तुम्हाला न्यायालयीन बाबींमधून दिलासा मिळेल. तुम्हाला तुमच्या मुलांसंबंधी काही चांगली बातमी मिळू शकते, ज्यामुळे तुमच्या घरात आनंदी वातावरण निर्माण होईल. तुम्हाला एखाद्या विशेष कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संधी मिळू शकते. या काळात तुमची प्रतिष्ठा आणि आदरही वाढेल. धार्मिक कार्यांमधील तुमची आवड वाढेल.

मीन रास

मीन राशींच्या लोकांसाठी हा काळ आनंदाचा राहील. तुमच्या सर्व प्रयत्नांमध्ये तुम्हाला तुमच्या पालकांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल, ज्यामुळे तुमच्या मनाला आनंद मिळेल. मनःशांती आणि स्थिरता येईल. काही चांगली बातमी तुमच्या जीवनात नवी आशा जागृत करेल. नोकरी करणाऱ्यांना पगारवाढीची अपेक्षा असू शकते. अविवाहित व्यक्तींसाठी विवाहाच्या संधी निर्माण होऊ शकतात, तसेच नातेसंबंध अधिक दृढ आणि जवळचे होतील.

## धनप्राप्तीसाठी...

जर तुम्ही तुमच्या घरात धन आणि संधी आकर्षित करू इच्छित असाल, तर कापरा माशाचे चित्र हा एक चांगला पर्याय आहे. त्याचे लाटांसारखे पंख आणि अनोखा आकार जीवनातील प्रगती आणि नवीन संधींचे प्रतीक आहेत. ते घराच्या उत्तर किंवा पूर्व दिशेला ठेवणे शुभ मानले जाते.




समुद्राचे पाणी जीवनातील विशालता आणि प्रगतीचे प्रतीक आहे. भिंतीवर लावल्यास समुद्रात पोहणाऱ्या माशांचे चित्र सकारात्मक ऊर्जा आणि सततच्या बदलाचे प्रतीक ठरते. हे ऑफिस किंवा अभ्यासिकेतही शोभून दिसते.

प्रवाळ आणि रंगीबेरंगी मासे दर्शवणारी चित्रे घरात समृद्धी, आरोग्य आणि शांती आणण्यासाठी शुभ मानली जातात. ती दिवाणखान्याच्या किंवा भोजनकक्षाच्या भिंतींवर लावणे उत्तम ठरते.

वास्तूनुसार, माशाचे चित्र घराच्या उत्तर किंवा पूर्व भिंतीवर लावावे. ही दिशा सकारात्मक ऊर्जा आकर्षित करते. मात्र, ते नैऋत्य दिशेला लावणे टाळावे, कारण त्यामुळे गोंधळ आणि अस्थिरता येऊ शकते.

## बेडरुममध्ये कोणत्या गोष्टी ठेवणे अशुभ



बेडरूम घराचा महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. कारण ही तीच जागा आहे या ठिकाणी व्यक्तीला आराम, शांतता आणि मानसिक शांती मिळते. वास्तुशास्त्रानुसार पती पत्नीची बेडरूम फक्त झोपायची जागा नाही तर प्रेम आणि मानसिक शांती देखील मिळते. मात्र बेडरूममध्ये ठेवलेल्या काही गोष्टींमुळे तुमच्या नात्यात दुरावा येऊ शकतो. काही अशा वस्तू आहेत ज्या बेडरूमध्ये ठेवल्याने घरात नकारात्मक ऊर्जा येऊ शकते. ज्याचा प्रभाव व्यक्तीच्या नात्यावर पडू शकतो. बेडरूमध्ये कोणत्या गोष्टी ठेवणे अशुभ आहे जाणून घ्या बरेच लोक बेडच्या समोर आरसा लावतात किंवा ठेवतात. वास्तुशास्त्रानुसार बेडच्या समोर आरसा लावणे अशुभ मानले जाते. झोपताना पती पत्नीचे प्रतिबिंब आरशामध्ये दिसू नये. असे म्हटले जाते की, यामुळे वैवाहिक जीवनात समस्या येऊ शकतात. जर आरसा हलवणे शक्य नसल्यास तो झाकून ठेवा.

बेडरूममध्ये चुकूनही काटेधार रोप ठेवू नका. वास्तुशास्त्रानसार बेडरूममध्ये काटेधार रोप ठेवल्याने पती पत्नीच्या नात्यामध्ये तणाव येतो. वैवाहिक जीवनात अडचणी येऊ शकतात.

बेडरूममध्ये देव्हारा किंवा देवी देवतांच्या प्रतिमा लावू नये. वास्तुशास्त्रानुसार असे करणे योग्य मानले जात नाही. बेडरूममध्ये देवाच्या मूर्ती ठेवल्याने वैवाहिक जीवनात काही समस्या उद्भवू शकतात.

बेडरूममध्ये टीव्ही, लॅपटॉप आणि भरपूर मोबाईल फोन ठेवू नये. वास्तुशास्त्रानुसार या वस्तू बेडरूममध्ये ठेवल्यास राहू ग्रहाचा प्रभाव वाढू शकतो. या वस्तूंमुळे नकारात्मक प्रभाव बाहेर येते. यामुळे झोपेची समस्या आणि मानसिक शांतीच्या समस्या उद्भवतात.

बेडरूममध्ये कधीही ताजमहाल किंवा इतर प्रकारचे छायाचित्र लावू नये. याशिवाय बेडरूममध्ये पूर्वजांचे फोटो देखील लावू नये. यामुळे नकारात्मक प्रभाव पडू शकतो. भिंतीवर महाभारताचे युद्ध, जंगली जनावेराची शिकार आणि रडणाऱ्या मुलांची प्रतिमा लावू नका. अशा प्रतिमा लावल्याने जोडीदारासोबत छोट्या छोट्या गोष्टींवरून वाद होऊ शकतात.

वाहणाऱ्या पाण्याचे फोटो, शो पीस किंवा कारंजा, बेडच्या खाली जुने सामान, बूट चप्पल, तुटलेली भांडी, फाटलेले जुने कपडे, बंद घड्याळ किंवा तुटलेल्या वस्तू बेडरूममध्ये ठेवू नये. या गोष्टी ठेवल्याने बेडरूममध्ये नकारात्मक ऊर्जा संचारू शकते.

## आठवड्याचे दिवस आणि केस धुणे यामधील ज्योतिषशास्त्रातील संबंध

सकाळी लवकर केस धुणे ही अनेक लोकांची रोजची सवय आहे. परंतु ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास रोज केस धुणे तुमच्या नशिबावर आणि तुमच्या घरातील ऊर्जेवर परिणाम करू शकते. तर ज्योतिषशास्त्रानसार त्यामागील काही प्रमुख विशिष्ट कारणे देखील आहेत. तर केस धुण्यासाठी कोणता दिवस उत्तम आहे हे समजून घेणे आजही अनेक लोकांसाठी खूप उपयुक्त आहे. चला तर मग आजच्या लेखात आपण ज्योतिषशास्त्रानुसार कोणत्या दिवशी केस धुतल्याने लक्ष्मी मातेचा आशीर्वाद मिळतो तसेच याने आरोग्यावर, मनावर कोणते परिणाम होतात ते जाणून घेऊयात.

ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक दिवसाची स्वतःची ग्रहीय ऊर्जा आणि वैशिष्ट्ये असतात. यावर आधारित केस धुण्याचे नियम सांगण्यात आले आहेत. असे मानले जाते की योग्य दिवशी केस धुतल्याने केवळ मन शांत होत नाही, तर त्याचा तुमच्या घराच्या स्थितीवर आणि तुमच्या प्रगतीवरही परिणाम होऊ शकतो.



सोमवार हा चंद्राचा दिवस मानला जातो. या दिवशी केस धुतल्याने मानसिक शांती आणि मनाला थंडावा मिळतो. अनेकांचा असा विश्वास आहे की यामुळे चेहऱ्यावर तेज येते आणि दिवसभर हलकेपणाची भावना टिकून राहते. तसेच यामुळे कामाच्या ठिकाणी किंवा घरी काम करताना एकाग्रता वाढते.

बुधवारी केस धुणे शुभ मानले जाते.ज्योतिषशास्त्रानसार या दिवशी केस धुतल्याने घरात संपत्ती आणि समृद्धी येते असा विश्वास आहे. आजही अनेक कुटुंबांमध्ये हा दिवस विशेष मानला जातो.

ज्योतिषशास्त्रानसार काहींसाठी शनिवारी केस धुणे हे दिलासादायक मानले जाते. असे मानले जाते की या दिवशी केस धुतल्याने गरिबी दूर होते आणि जीवनातील अडथळे हळूहळू कमी होतात. बरेच जण तर या दिवसाला रीसेट डे असेही मानतात.

## साप्ताहिक राशीभविष्य

**११ एप्रिल ते १७ एप्रिल २०२६**

**प्रगतीकडे वाटचाल**

**मेष –** आपल्या राशीत अनुकूल ग्रह असल्याने हा कालावधी आपल्याला शुभ जाणार आहे. स्वतःचे व्यवसाय असणाऱ्यांना फायदेशीर ठरेल. आपली प्रगतीकडे उत्तम वाटचाल असणार आहे. महत्त्वाची सरकारी कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने प्रयत्नशील असणे आवश्यक राहील. रखडलेले जमीन जुमल्या संबंधित असलेले कार्य पूर्ण होईल. त्यातन भरघोस आर्थिक फायदा मिळू शकतो. प्रतिष्ठित व्यक्तींच्या ओळखी होतील. मात्र सुरुवातीला सर्व व्यवहार काळजीपूर्वक करणे महत्त्वाचे ठरेल. कलाकारांना चांगल्या संधी मिळतील. तरुणांना संधी येतील.

**प्रतिष्ठित लाभ होतील**

**वृषभ –** समाजातील मान्यवर तसेच प्रतिष्ठित व्यक्तींच्या ओळखी होऊन भेटीगाठी होतील. प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेली महत्त्वाची कार्ये पूर्ण होण्यासाठी या भेटीगाठी उपयोगी पडतील. मध्यस्थी यशस्वी होतील. जमीन व स्थायी संपत्ती संबंधित असलेली रखडलेली कामे पर्ण होण्याच्या मार्गावर असतील. वडिलोपार्जित संपत्तीविषयी असलेले वाद-विवाद संपुष्टात येतील. सर्वमान्य तोडगा निघेल. भावंडांशी सख्य राहील. लहान-मोठे गैरसमज दूर होतील. जवळचे तसेस दूरचे प्रवास करावे लागतील. चांगल्या धनलाभाची शक्यता. नवीन संधी उपलब्ध होतील. चिंता मिटतील.

**व्यावसायिक अनुकूलता**

**मिथुन –** अनुकूल ग्रहमान लाभल्यामुळे अनेक मार्गाने धन आगमन होऊ शकते. नेहमीच्या उत्पन्नाच्या मार्गांशिवाय उत्पन्न वाढू शकते. खर्चाचे प्रमाण वाढेल. अनावश्यक खर्चाला कात्री द्या. अनेक चांगल्या घटना घडतील. खरेदी-विक्रीतन चांगले लाभ. काही महत्त्वाचे सौदे होतील. सरकार दरबारची कामे पूर्ण होताना दिसतील. ओळखीतन चांगले लाभ आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपण नवीन मार्ग शोधू शकाल. मात्र, नियोजन आवश्यक ठरेल. नवीन आव्हानांना सामोरे जावे लागण्याची शक्यता.राजकीय क्षेत्रातील जातकांना मानसन्मानाचे योग. आत्मविश्वास निर्माण होईल.

**शुभग्रहांचे पाठबळ**

**कर्क –** या कालावधीमध्ये आपल्याला शुभग्रहांचे चांगले पाठबळ राहणार आहे. उत्तमोत्तम प्रवास घडू शकतात, मात्र प्रवासात स्वतःची काळजी घेणे अपरिहार्य ठरेल तसेच भाजणी, कापणे इत्यादींपासन सावध राहणे गरजेचे ठरेल. वाहने सावकाश चालवा, कोणतीही स्पर्धा नको. नोकरीमध्ये हितशत्रूंचा त्रास होण्याची शक्यता आहे. गटबाजी आणि राजकारणापासून दूर राहणे गरजेचे ठरेल तसेच स्वतःच्या कार्याकडे लक्ष देणे हितकारक ठरेल. आपल्या ज्ञानाविषयी अद्यावत राहणे गरजेचे ठरेल. वरिष्ठांबरोबर वादविवाद टाळणे हितकारक ठरेल.स्त्रियांना कार्यक्षेत्रात कामाचा ताण जाणवणार आहे.

**व्यावसायिक प्रगती**

**सिंह –** अनुकूल ग्रहमान लाभल्यामुळे अनेक मार्गाने धन आगमन होऊ शकते. नेहमीच्या उत्पन्नाच्या मार्गांशिवाय उत्पन्न वाढू शकते. खर्चाचे प्रमाण वाढेल. अनावश्यक खर्चाला कात्री द्या. अनेक चांगल्या घटना घडतील. खरेदी-विक्रीतन चांगले लाभ. काही महत्त्वाचे सौदे होतील. सरकार दरबारची कामे पूर्ण होताना दिसतील. ओळखीतन चांगले लाभ आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपण नवीन मार्ग शोध शकाल. मात्र, नियोजन आवश्यक ठरेल. नवीन आव्हानांना सामोरे जावे लागण्याची शक्यता. सामाजिक व राजकीय क्षेत्रातील जातकांना मानसन्मानाचे योग.

**मतभेद मिटतील**

**कन्या –** आतापर्यंत आलेला मनावरचा ताण कमी होण्यास सुरुवात होईल. जोडीदाराची साथ लाभेल. धनलाभाचे योग आहेत. भागीदारीच्या व्यवसायात भागीदाराची मदत मिळेल. आपल्या जीवनसाथीशी मधुर संबंध राहतील. मात्र आपल्या बोलण्यावर व वर्तनावर नियंत्रण आवश्यक. कुटंबात एखादे धार्मिक कार्य घडेल. वडिलोपार्जित संपत्तीची कामे गतिमान होतील, मतभेद मिटतील. नोकरीत अनुकूल स्थिती निर्माण होईल मात्र आपण राजकारण व गटबाजीपासन दूर राहा. मित्रमंडळींच्या वर्तुळात वादविवाद टाळा. प्रवास घडतील. प्रवासात आहारावर नियंत्रण ठेवणे गरजेचे.

**कामे गतीमान होतील**

**तूळ –** प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेली कामे गतीमान होतील. सरकारी कामात लागणारा विलंब नाहीसा होईल. त्यामुळे आपल्याला आश्चर्य वाटेल. एखादे महत्त्वाचे काम होऊ शकते. व्यवसायिकांनी सरकारी कायदे व नियम कसोशीने पाळायला हवेत. आर्थिकदृष्ट्या बरोबर होईल काहींना दूरचे तसेच जवळचे प्रवास करावे लागतील. प्रवासात वाहनाच्या वेगावर ती नियंत्रण आवश्यक.जीवनसाथी बरोबर असलेले मतभेद संपुष्टात येतील.

**समाधान लाभेल**

**वृश्चिक –** अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करू शकाल. यशाचे प्रमाण वाढते राहील. नोकरीत आपल्याला नवीन अधिकार मिळेल. पदोन्नती आणि वेतन वृद्धीचे योग आहेत. सामाजिक मानसन्मानात वाढ होऊन प्रतिष्ठेत भर पडेल. एखाद्या समारंभात मानाचे पद मिळेल. आर्थिक परिस्थिती अतिशय उत्तम राहील. प्रेमामध्ये अनुकूल प्रतिसाद मिळू शकतो. अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. धार्मिक यात्रा घडून देवदर्शन होईल. त्यामळे समाधान लाभेल. कुटंबासाठी खर्च करावा लागेल. आरोग्याकडे लक्ष ठेवा. विवाह ठरतील.

**भाग्याची साथ लाभेल**

**धनु –** या सप्ताहात आपल्याला भाग्याची साथ मिळ शकते. प्रदीर्घ काळ मनात असलेली एखादी महत्त्वाची इच्छा पूर्ण होऊ शकते. अडलेली कामे होतील पर्यटन किंवा कामानिमित्त दूरचे तसेच जवळचे प्रवास घडू शकतात. प्रवास कार्य सिद्ध होतील. नोकरीत मानसन्मान मिळू शकतो. पदोन्नती तसेच वेतन वृद्धी होईल. बदलीची तयारी ठेवा. आर्थिकदृष्ट्या उन्नती होईल. रागावर नियंत्रण आवश्यक. कुटंबातील मलांविषयी सकारात्मक राहा. व्यवसायात नवीन बदल फायद्याचे ठरतील. जनी येणी वसूल होतील. मात्र, भागीदारी व्यवसायात भागीदाराशी मतभेद होऊ शकतात ते टाळा.

**नियोजन उपयोगी पडेल**

**मकर –** आपल्यासमोरील दीर्घकाळ प्रलंबित असलेली कामे होतील. विशेषतः सरकारी स्वरूपाची कामे. मात्र आजचे काम आजच करा, कामामध्ये विलंब नको. नोकरीत अपेक्षित सहकार्य मिळेल. वरिष्ठांबरोबर असलेले संबंध सुधारतील तसेच सहकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. जमीन जुमला व संपत्तीविषयीचे व्यवहार गतीमान होतील. मध्यस्ती फलद्रूप होतील. वडिलोपार्जित संपत्तीविषयी असलेले मतभेद संपुष्टात येतील. विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या क्षेत्रात कार्य करण्याची संधी मिळेल.मात्र, अभ्यासामध्ये दुर्लक्ष करू नका. वेळेचे नियोजन उपयोगी पडेल.

**लहान-मोठ्या प्रवासाचे योग**

**कुंभ –** कुटंबातून तसेच आपल्या कार्यक्षेत्रातन आपल्याला अपेक्षित सहकार्य लाभेल. आर्थिक परिस्थिती चांगली राहील. यामळे महत्त्वाची कामे हातावेगळी करू शकाल. व्यावसायिक बदल फायदेशीर ठरतील. नवीन तंत्रज्ञान व नव्या संकल्पनांचा वापर करू शकाल. अचानक धनलाभ होण्याची शक्यता, मात्र आपल्या स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे क्रमप्राप्त ठरेल. प्रवासाचे योग. प्रवासात वाहनाच्या वेगावर नियंत्रण आवश्यक. राजकारणी जातकांना विरोध झेलावा लागेल. विरोधक आक्रमक बनू शकतात.

**क्रोधावर नियंत्रण आवश्यक**

**मीन –** संमिश्र ग्रहमान यामळे आपल्याला संमिश्र फळे मिळण्याची शक्यता आहे. सुरुवातीला कामांमध्ये अडथळे जाणवू शकतात. त्याचप्रमाणे धावपळ आणि दगदग होईल. स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कुटुंबातील व्यक्तींकडून सहकार्य करावे, मात्र स्वतःच्या क्रोधावर नियंत्रण आवश्यक. व्यवसायिक परिस्थिती समाधानकारक राहून आर्थिक परिस्थिती सुधारेल. व्यावसायिक उलाढाल वाढन फायद्याच्या प्रमाणात वाढ होईल. जमीन-जुमला यांची कामे गतिमान होऊ शकतात. सरकारी नोकरीत प्रलोभने टाळणे हिताचे ठरेल. वाहन चालविताना दक्ष राहा.

# ५० किलो नियमावलीप्रमाणे अंमलबजावणी व्हावी

## टेम्पो चालक मालक कल्याणकारी असो.चे सहाय्यक कामगार आयुक्तांना निवेदन

इचलकरंजी ता.१०

**माथाडी कामगारांच्या ५० किलो नियमावलीप्रमाणे शासनस्तरावर शासकीय अधिकाऱ्याकडून अंमलबजावणी व्हावी तसेच वेअर हाऊस व ट्रान्सपोर्ट नियमाप्रमाणे अंमलबजावणी करत नसतीस तर त्यांच्यावर माथाडी कामगार कायदा महाराष्ट्र श्रमिक कायदा नुसार कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी टेम्पो चालक मालक कल्याणकारी असोसिएशनतर्फे सहाय्यक कामगार आयुक्त जानकी भोईटे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.**

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी ही औद्योगिक मोठे शहर आहेत. इचलकरजी शहरातील काही व्यापारी वर्गाकडून माथाडी कामगारांची शोषण करण्यासारखा प्रकार होत आहे. महाराष्ट्रातील इचलकरंजी, येथे सरासरी कापडाच्या गाठी व रोल प्रेस करून ७० किलो ९० किलो पासून १६०किलो पर्यंत माथाडी कामगारांना भरण्यास भाग पाडले जात आहे.




**टेम्पो चालक मालक कल्याणकारी असो.तर्फे सहाय्यक कामगार आयुक्त भोईटे यांना निवेदन देताना मिश्रीलाल जाजू,सचिन जाधव.**

माथाडी कामगार प्रतिनिधी यांनी वेळोवेळी निवेदने देऊन शासन स्तरावर माथाडी कामगारांना न्याय मिळावा कितीतरी निवेदने माथाडी बोर्डामध्ये देऊनही शासकीय अधिकाऱ्यांकडून निवेदनाला केराची टोपली दाखवण्याचा प्रकार होत आहे

प्रांत अधिकारी यांनी आदेश देऊनही माथाडी कामगार मंडळ अधिकारी यांच्याकडून कामाची कसूरता होताना दिसत आहे इचलकरंजी शहरात माथाडी कामगारांना न्याय मिळावा व नोंदणी नसणाऱ्या वेअर हाऊस व ट्रान्सपोर्ट धारकावर कारवाई करून संबधित माथाडी कामगारांना शासकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना राष्ट्रवादी कामगार संघटना अध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष कामगार नेते मिश्रीलाल जाजू, इचलकरंजी चालक-मालक कल्याणकारी असोसिएशन संस्थापक अध्यक्ष सचिन जाधव, माथाडी कामगार अध्यक्ष इसाक आवळे, युवराज लाखे, अमर आवळे, संग्राम केंगार, सुरेश कोरवी, आशिष आवळे, युसुफ आवळे आदी उपस्थित होते.

# माणुसकीचा वटवृक्ष : सहकाररत्न स्व.रावसाहेब पाटील



**काही माणसं वेगळ्या कर्तृत्वशैलीने मिळेल त्या पदाला प्रतिष्ठा प्राप्त करून देत असतात. ज्येष्ठ नेते सहकार महर्षी स्व. रावसाहेब पाटील हे सर्वार्थाने तसेच होते.बोरगांव शहरात सहकार शिक्षण आणि समाजकारण क्षेत्रात अतुलनीय क्रांती घडवून एक आदर्शाचा ठसा उमटविणारे सहकार तज्ञ रावसाहेब आण्णासाहेब पाटील-दादा यांची आज ८२ वी जन्मजयंती.त्यानिमित्त...**

रावसाहेब पाटील यांनी संपूर्ण आयुष्य गोरगरिबांच्या सेवेसाठी खर्ची घातले. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून अठरापगड जातींना एकत्रित घेत रंग माझा वेगळा हेच आपल्या कार्यातून दाखविले होते. सहकार क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान न भूतो न भविष्यती असेच आहे. समाजातील वृद्ध, दिव्यांग, निराधार, कामगार महिला या सर्वांनाच योग्य न्याय देत माणुसकी दाखवली. त्यांच्यातील अफाट कार्यक्षमता दुर्दम्य इच्छाशक्ती ही थक्क करणारे होते. त्यांची स्मरणशक्ती आणि जनतेसाठी अखंडपणे कार्य करण्याची तयारी अशा अनेक गुणांमुळे ते जनसामान्यात परिचित होते. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी संकट आले तरी न डगमगता त्यांनी संघर्ष करत संकटे परतवून लावली उलट संकटांनी दादांना मोठी उंची प्राप्त करून दिली. दादांची काम करण्याची हातोटी वेगळीच होती.त्यांनी बोरगाव शहराबरोबर तालुक्याच्या विकासासाठी अविरत प्रयत्न केले.अचूक निर्णय क्षमता,कामाचा विलक्षण झपाटा,कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम करण्याची वृत्ती होती. शाश्वत विकास कामांना प्राधान्य देऊया ही नेहमीच त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना सांगितले. विधायक कार्याची सातत्याने ओढ आणि प्रचंड विकास कामाचे ज्ञान असे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.माणसं पारक करण्याची क्षमता दादांमध्ये होती. त्यांनी अनेकांना घडविले, जीवनदान दिले. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. अनेकांचे हात बळकट केले.

१९७५ साली सहकार तत्वावर त्यांनी वर्धमान दूध संघाची स्थापना केली.१९७८ ते १९८३ तालुका विकास बोर्डावर त्यांनी आपल्या कार्याची चूणूक दाखवून दिली.१९७८ साली ते पंचगंगा साखर कारखान्याचे संचालक झाले. जवळपास ११ वर्षे त्यांनी संचालक पदाची धुरा सांभाळली. १९८६ ते १९८९ पर्यंत ते कर्नाटक राज्य रेक्रुटमेंट समितीचे सदस्य झाले.१९९० साली भगवान अरिहंतच्या नांवाने पहिली पतसंस्था स्थापन केली. आज संस्थेच्या जवळपास ६१ वर शाखा आहेत. दूध संघ,गारमेंट,आयटीआय महाविद्यालय, सूतगिरणी, साखर कारखाना, सी.बी.एस.ई, शाळा, अरिहंत हॉस्पिटल,या संस्थांनी दादांच्या मार्गदर्शनाखाली प्रचंड यश संपादन केले. सन २००२ साली दादांना दक्षिण भारत जैन सभेचे उपाध्यक्ष तर पुढे त्यांच्यावर अध्यक्ष पदाची जबाबदारी पडली. अनेक विधायक कार्य केलेले सहकारातील दादा आजही सर्वांच्या हृदयात, मनात आहेत.

**- श्यामलिंग किल्लेदार, बोरगांव**



# गणेश पतसंस्थेतर्फे मान्यवरांचा गौरव

तारदाळ,ता.१० (वार्ताहर)

**येथील श्री गणेश ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्यावतीने सैन्य दलातील निवृत्त अधिकारी सागर पाटील,नूतन पंचायत समिती सदस्या प्रियांका खोबरे यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.**

संस्थेचे चेअरमन संजय सांगावे, व्हा. चेअरमन अण्णासो हिंगमिरे व संचालक मंडळ यांच्या हस्ते शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे चेअरमन संजय सांगावे यांनी, सागर पाटील यांची सतरा वर्षाची देशसेवा खूप कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे संचालक कुमार चौगुले,राजू नर्मदे, धुळगोंडा चौगुले, सुकुमार डबाले, सचिन पाटील,सचिव बाळासो जाधव, रविंद्र कारदगे, शुभम समडोळे यांच्यासह संस्थेचे सभासद व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. स्वागत अण्णासो हिंगमिरे यांनी केले. आभार बाळासो जाधव यांनी मानले.

# खंडणीप्रकरणी मनसे पदाधिकाऱ्याविरोधात तक्रार

कोल्हापूर,ता.१०(प्रतिनिधी) -

**बालिंगा येथील एका रुग्णालयाच्या परवानगीवरून वाद निर्माण करत १० लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा गंभीर आरोप मनसेच्या पदाधिकाऱ्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणी करवीर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उत्तम मोहन मदने यांनी करवीर पोलिसात लेखी तक्रार दिली असून, प्रसाद पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.**

डॉ. मदने हे १७ एप्रिल २०२३ पासून पंचायत समिती करवीर येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यक्षेत्रात बालिंगा येथील श्री रेणुका मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा समावेश आहे. या रुग्णालयाने २०२५ मध्ये बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार आवश्यक कागदपत्रांसह परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर तो प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आणि नियमांनुसार रुग्णालयाला परवानगी देण्यात आली.३१ मार्च २०२६ रोजी प्रसाद पाटील यांनी दूरध्वनीवरून रुग्णालयाला परवानगी कशा प्रकारे देण्यात आली, याची माहिती घेतली. त्यानंतर ६ एप्रिल २०२६ रोजी त्यांनी डॉ. मदने यांना मनसे कार्यालयात बोलावून घेतले. तेथे रुग्णालयाच्या परवानगी प्रक्रियेत त्रुटी असल्याचे सांगत दबाव टाकण्यात आल्याचा आरोप आहे. याचवेळी संबंधित रुग्णालय बंद पाडण्याची धमकी देण्यात आल्याचेही सांगितले आहे.

यानंतर डॉ. मदने यांना कार्यालयाबाहेर नेऊन रुग्णालयाकडून १० लाख रुपये घेऊन देण्याची मागणी करण्यात आली. ही रक्कम मोबाईलवर टाईप करून दाखवण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे.

ही मागणी पूर्ण केली नाही तर नोकरीवर परिणाम होईल, अशी भीती दाखवण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.तसेच संबंधित पदाधिकाऱ्याने आरोग्य विभागाच्या कार्यालयात येऊन काही कागदपत्रे उचलून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी शिवीगाळ आणि दमदाटी केल्याचेही सांगण्यात आले आहे. सर्व डॉक्टरांकडून वर्गणी गोळा करून १० लाख रुपये देण्याचा तगादा लावण्यात आल्याचेही पुढे आले आहे.या प्रकारामुळे आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या प्रकरणाची करवीर पोलिसांकडून प्रसाद पाटीलसह त्याच्या साथीदारांवर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

## गणेश संस्थेतील बैठा पाणीपट्टी,कथित गैरव्यवहारप्रकरणी उपोषण सुरु

बुबनाळ, ता.१० (वार्ताहर)-

**गणेशवाडी (ता.शिरोळ) येथील गणेश सहकारी पाणी पुरवठा संस्थेतील थकीत बैठा पाणीपट्टी व कथित गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरून संस्थेचे सभासद शिवाजी कोळेकर यांनी शिरोळ तहसील कार्यालयासमोर शुक्रवारपासून प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली.**

कोळेकर हे संस्थेचे सभासद आहेत.संस्थेचे चेअरमन विजयकुमार गाताडे, संचालक चंद्रकांत गाताडे,दादासो देवताळे,आनंदा सांळुखे यांच्यासह काही सभासदांनी अधिकाराचा गैरवापर करत संस्थेच्या कार्यक्षेत्रात नियमबाह्य खाजगी पाणीपुरवठा योजना राबविल्या आहेत. या माध्यमातून संबंधितांकडून स्वतःच्या शेतीस पाणीपुरवठा केला जात असून काही ठिकाणी विहिरींमध्ये पाणी साठवून पुन्हा उपसा केला जात असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे हे संस्थेचे सभासद असूनही संस्थेकडून अधिकृत पाणी घेत नसून, संस्थेच्या कार्यक्षेत्रातील इतर सभासदांना नियमबाह्य पद्धतीने पाणीपुरवठा करत असल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.

# पेठवडगावच्या अंबाबाई मंदिर विकासासाठी ५० लाखांचा निधी मंजूर

## नगराध्यक्षा पोळ यांची माहिती

पेठवडगाव,ता.१० (वार्ताहर)

**येथील ग्रामदैवत श्री अंबाबाई मंदिर आणि परिसराच्या सुशोभिकरणासाठी राज्य शासनाकडून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून मंदिरात ऐतिहासिक दगडी दर्शन कमान आणि संरक्षक भिंत बांधण्याचे काम तातडीने हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती नगराध्यक्षा विद्याताई पोळ यांनी दिली.**

मंदिराचा सर्वांगीण विकास आराखडा तयार करून पुढील सुशोभिकरणासाठी ७ ते ८ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. याकामी उपमुख्यमंत्री शिंदे, खास. धैर्यशील माने, आम. अशोकराव माने यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचेही पोळ यांनी नमूद केले.

यावेळी महालक्ष्मी देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक गुरुप्रसाद यादव व उपनगराध्यक्ष जवाहर सलगर यांनी विकासकामांच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

या विकासकामांबाबत नागरिक आणि भाविकांनी आपल्या काही सूचना असल्यास त्या मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

याप्रसंगी नगरसेवक प्रवीण पाटील, विशाल वडगांवे, शीतल कोळी, माजी नगराध्यक्ष अभिजित पोळ, विजय भोसले, धनंजय गोंदकर, महादेव अनुसे, श्रीकांत ठिगळे, पालिका अधिकारी महादेव सरांबळे, संतोष गुरव, इंजिनिअर विशाल चव्हाण उपस्थित होते.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांचे आगमन

शिराळा,ता.१० (प्रतिनिधी)-

**सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातील वाघांच्या खाद्यासाठी तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. पुण्यातील राजीव गांधी प्राणी संग्रहालयातून एकूण ४० वन्यप्राण्यांचे यशस्वी स्थलांतर करण्यात आले.**

या मोहिमेत चितळ ३० (१७ नर व १३ मादी) आणि सांबर १० (४ नर व ६ मादी) यांचा समावेश होता. एप्रिलदरम्यान ही विशेष मोहीम राबविण्यात आली. सर्व प्राण्यांना पुणे ते चांदोली वनक्षेत्रातील झोळंबी व जानिचा आंबा परिसरात सुरक्षितपणे आणण्यात आले असून त्यांना नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे.



## ४० चितळ,सांबरांचे यशस्वी स्थलांतर

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या वास्तव्याला पूरक वातावरण निर्माण करण्यासाठी आणि जैवविविधता टिकवण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी किरण माने यांनी सांगितले. तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढल्यास वाघांसाठी खाद्यसाखळी मजबूत होऊन त्यांच्या संवर्धनाला चालना मिळणार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण प्रक्रिया पार पडली.यामध्ये क्षेत्र संचालक तुषार चव्हाण, उपसंचालक चंद्रकांता पाटील, सहायक वनसंरक्षक संदेश पाटील यांच्यासह वनपरिक्षेत्र अधिकारी किरण माने यांच्या नेतृत्वाखाली झोळंबी वनपाल, वनरक्षक व वनसेवकांच्या पथकाने ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

# शाहुवाडी तालुक्यात गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

सरूड,ता.१० (प्रतिनिधी)

**शाहूवाडी तालुक्यातील आंबा परिसरातील तळवडे येथे एका २५ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी शाहूवाडी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.**

सुरज शिवाजी शेळके (वय २५) याला दारूचे व्यसन होते. घटनेच्या दिवशी तो दारूच्या नशेत होता. घरात कोणी नसल्याची संधी साधून त्याने घराच्या मागील बाजूस असलेल्या झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली.

याबाबतची फिर्याद त्याचे वडील शिवाजी शेळके यांनी शाहूवाडी पोलीस ठाण्यात दिली आहे. फिर्यादीनुसार, पोलीस हेडकॉन्स्टेबल हनुमंत कुंभार यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मलकापूर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला होता. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेचा पुढील तपास शाहूवाडी पोलीस करत आहेत

**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.जि.कोल्हापूर**
**वाहन विभाग**
**निविदा सुचना क्र.०१/२०२६-२७**

इचलकरंजी महानगरपालिकेकरिता मागणीनुसार बाह्ययंत्रणेद्वारे वाहनचालक सेवा वार्षिक मक्ता पद्धतीने पुरविणे याकामी पात्र व्यक्ती/संस्थेकडून ई-निविदा मागविणेत येत आहे. निविदा सूचना महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर तसेच वाहन विभागाकडे दि.१०/०४/२०२६ दुपारी ०३.३० वाजलेपासून दि.२२/०४/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल. भरलेल्या निविदा सादर करणेची अंतीम तारीख दि.२२/०४/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत राहील. शक्य झालेस प्राप्त झालेल्या सर्व निविदा मा.उपायुक्त यांचेसमोर दि.२४/०४/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. उघडणेत येतील त्यावेळी निविदाधारकांनी उपस्थित रहावे. सर्व अटी व शर्ती संबंधित विभागात सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत व या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**सही**
**उपायुक्त,**
**इचलकरंजी महानगरपालिका**

# चोरीस गेलेले १४ लाखांचे ९२ मोबाईल मूळ मालकांना परत

निपाणी,ता.१०(प्रतिनिधी)-

**निपाणी शहर परिसरात विविध ठिकाणाहून चोरीस गेलेले तब्बल १४ लाख रूपये किंमतीचे ९२ मोबाईल शोधून काढत निपाणी पोलिसांनी ते मूळ मालकांना परत केल्याची माहीती चिक्कोडी डीएसपी गोपाळकृष्ण गौडर यांनी दिली.**

यावेळी सीपीआय बी.एस तळवार,उपनिरीक्षक शिवानंद कारजोळ, शिवराज नायकवडी उपस्थित होते.

सीपीआय तळवार म्हणाले, शहरातील बसस्थानक, आठवडी बाजार, गर्दीच्या ठिकाणी निपाणी सर्कलच्या शहर, ग्रामीण व बसवेश्वर चौक पोलीस स्टेशन येथे मोबाईल फोन हरवल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. निपाणी शहर पोलीस ठाण्याचे यासीन कलावंत , ग्रामीण पोलीस ठाण्याचे यू.आर. माळगे,



**पत्रकार बैठकीत बोलताना डीएसपी गोपाळकृष्ण गौडर,शेजारी सीपीआय बी.एस.तळवार, शिवराज नाईकवडी, शिवानंद कारजोळ.**

एम.ए.तेरडाळ, आर आर मदणे, एस.ए मुल्ला यांनी सीईआयआर पोर्टलवर सदर मोबाईल शोधून काढले. निपाणी शहर पोलीस स्टेशनमधून एकूण ७० मोबाईल जप्त केले असून ज्यांची किंमत रु.११ लाख ८२ हगजार आहे. ग्रामीण पोलिस ठाण्यातून जप्त केलेल्या १२ मोबाईलची किंमत १ लाख २२ हजार आणि निपाणी बसवेश्वर चौक पोलीस ठाण्यातून १ लाख ९ हजार रू.किमतीचे १० मोबाईल जप्त करण्यात आले. अशा एकूण १४ लाख १३ हजार किमतीचे ९२ मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले आले.यावेळी तिन्ही पोलिस ठाण्यातील कर्मचारी उपस्थित होते. अनेक मोबाईल मालकांना तब्बल २ ते ३ वर्षानंतर हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावंर आनंद दिसत होता.

*** मुंबई,ता.१०**

प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने 'ट्रेन ऑन डिमांड' अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या विशेष गाड्यांच्या धावण्याला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

*** रत्नागिरी,ता.१०-**

रत्नागिरी टपाल विभागामार्फत रत्नागिरी जिल्ह्यात दोन हजार डझन हापूसचे वितरण झाल्याची माहिती रत्नागिरीचे डाकघर अधीक्षक ज्ञानेश कुलकर्णी यांनी दिली.

राजापुरातील ४० बागायतदारांकडून आतापर्यंत ५०० डझन रत्नागिरी हापूस आंबा थेट ग्राहकापर्यंत पोहोचला आहे.

महावितरण
**ई निविदा-सूचना**

म. रा. वि. वि. कं. मर्या. विभागीय कार्यालय इचलकरंजी अंतर्गत लघुदाब वाहिनी (LT), उच्चदाब वाहिनी (HT) व वितरण रोहित्र केंद्र (DTC) देखभाल दुरुस्ती (Preventive Maintenance) कामासाठी ई निविदा क्र. टी-०१ ते टी-०९/२०२६-२७, प्रत्येकी १० लाख, सविस्तर ई-निविदा https://etender.mahadiscom.in या संकेत स्थळावर दि. २०.०४.२०२६ वेळ १२:०० पर्यंत उपलब्ध आहे.
कार्यालयीन संपर्क क्र. ७८७५९३२०७०
पी.आर.ओ. क्र. - PRO/KOPZ/११/२०२६-२७
**कार्यकारी अभियंता, इचलकरंजी**

**जाहीर नोटीस**

१) मिळकतीचे वर्णन जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील शहापूर येथील क.ग.नं. २३४ क्षेत्र ४ हे ५१ आर आकार रू. २७.७५ पै. पैकी क्षेत्र ० हे ४० आर आकार रू. २.५८ पै. ची जागा यासी चतुः सिमा पुर्वेस ४० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस श्री. गोंदकर यांची मिळकत, दक्षिणेस ३० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस ६० फुट रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमेतील खुली मिळकत त्यातील तंदगभुत वस्तुसह व सर्व प्रकारच्या इजमेंटच्या हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत श्री. जोतिराम शंकर जाधव, श्री. परशराम शंकर जाधव, श्री. किसन शंकर जाधव, श्री. राजाराम उर्फ धोंडीराम शंकर जाधव रा. इचलकरंजी यांच्या एकत्रीत मालकी वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत ही आमच्या अशिलांना निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी असलेचे सांगून खरेदी देण्याचे ठरवून कराराव्दारे संचकार रक्कम स्विकारली आहे.

३) सबब सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सा, वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात ७ दिवसांचे आत खालील पत्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावा. मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता.९/४/२०२६.

**ॲड.संजय र.गजबी**
**नोटरी (भारत सरकार)**
**ऑफिस-७/७१, लक्ष्मी मार्केट, निवास, कमलकुंज, ८/१५२०/१/१, मधुबन हौ.सोसा.जवळ,इचलकरंजी.**
**मो. बा. ९४२२०५१९८३.**

**जाहीर नोटीस**

मौजे तारदाळ येथील गट नं. ७५१ पैकी प्लॉट नं. ए ७ चे क्षेत्र - ११५ -६५ चौ. मी. खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ए ६ ची मिळकत, पश्चिमेस - १८ फुट रस्ता, दक्षिणेस - २० फुट रस्ता, उत्तरेस-प्लॉट नं. ए ८ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही विनायक घनश्याम जोशी तर्फे वटमुखत्यार समीर आप्पालाल मुजावर यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस सही

ता.०९/०४/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,**
**गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**

**जाहीर नोटीस**

मौजे तारदाळ येथील गट नं. २८५ पैकी प्लॉट नं. १ व २ चे क्षेत्र - २४७-८६ चौ. मी . खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - गट नं. २१५ ची मिळकत, पश्चिमेस - २५ फुट रस्ता, दक्षिणेस - गट नं. २८५ ची शिल्लक मिळकत, उत्तरेस-२० फुट रस्ता येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही सदाशिव लक्ष्मण कोले यांचेकडून बंडू भाऊसो चौगुले रा . तारदाळ यांनी करारपत्राने घेतली असुन त्यांनी आमचे अशिलांशी सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस. सही

ता.०९/०४/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,**
**गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**

**जाहीर नोटीस**

मौजे **शहापूर** येथील **गट नं. ११७ पैकी क्षेत्र - ९२-९ चौ. मी.** खुली जागा व बांधकाम मिळकत यासी चतु:सिमा **पुर्वेस** - २० फुट रस्ता, **पश्चिमेस** - समीर मुजावर यांची मिळकत, **दक्षिणेस** - पोपट बरडे यांची मिळकत,**उत्तरेस**- अशोक देवडकर यांची मिळकत, येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही **द्वारका सिताराम शिंदे, नंदकुमार सिताराम शिंदे व संगिता दिलीप घोलप रा.इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस . सही

ता.०९/०४/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,**
**गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,**
**मो. ७८२०९०९७०५**



# SPORTS



## लखनौला मोठा धक्का वानिंदू हसरंगा आयपीएलमधून बाहेर

**नवी दिल्ली,ता.१०–**

**इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगामात (२०२६) लखनौ सुपर जायंट्स संघाला मोठा झटका बसला आहे. संघाचा मुख्य फिरकी गोलंदाज वानिंदू हसरंगा दुखापतीमुळे या संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे.**

लखनौने आता त्याच्या जागी दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी डावखुरा फिरकीपटू जॉर्ज लिंडे याचा संघात समावेश केला आहे. हंगाम सुरू होण्यापूर्वीच हसरंगाच्या फिटनेसबाबत शंका होती. आता तो खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले असून लखनौने त्याच्या रिप्लेसमेंटची घोषणा केली आहे. ३४ वर्षांचा जॉर्ज लिंडे हा दक्षिण आफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू आहे. तो पहिल्यांदाच आयपीएलचा भाग बनणार आहे. त्याच्याकडे टी-२० क्रिकेटचा प्रचंड अनुभव असून त्याने १६० पेक्षा जास्त सामन्यांत २१८ विकेट्स घेतल्या आहेत. तसेच तो खालच्या फळीत उपयुक्त फलंदाजीही करू शकतो. लखनौचे क्रिकेट संचालक टॉम मूडी यांनी कोलकाता विरुद्धच्या सामन्यानंतर सांगितले होते की, हसरंगा या हंगामात खेळू शकणार नाही.

संघाने मुजीब उर रहमान आणि लियम डॉसन यांच्या नावाचाही विचार केला होता, पण शेवटी लिंडेच्या अनुभवावर विश्वास दाखवला. लखनौचा पुढचा सामना १२ एप्रिल रोजी होणार असून, त्याआधी लिंडे संघात सामील होण्याची शक्यता आहे. लिंडेने आतापर्यंत ३ कसोटी, ४ वन डे आणि ३७ आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळले आहेत. टी-२० फॉरमॅटमध्ये त्याने ४ अर्धशतकेही झळकावली आहेत, ज्यामुळे लखनौच्या गोलंदाजीसोबतच फलंदाजीलाही बळकटी मिळेल.


# सनरायझर्स हैदराबाद - पंजाब किंग्ज भिडणार

**चंदीगढ,ता.१०–**

**आयपीएल २०२६ स्पर्धेतील १७ वा सामना पंजाब किंग्जचे होमग्राउंड मुल्लानपूर येथे होत आहे. या सामन्यात पंजाब किंग्जचा सामना सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. पंजाब किंग्जने या स्पर्धेत विजयी सुरूवात केली आहे. त्यामुळे या सामन्यात विजय मिळवून घोडदौड कायम ठेवण्याचा प्रयत्न असेल. तर सनरायझर्स हैदराबादचा संघ या पर्वात एका विजयासह आणि दोन पराभवांसह खेळत आहे.**

पंजाब किंग्स ५ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. तर सनरायझर्स हैदराबाद २ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. त्यामुळे दोन्ही संघांचा सध्याचा फॉर्म पाहता पंजाब किंग्जचा संघ मजबूत आहे. पण भुतकाळातील आकडेवारी पाहिली तर सनरायझर्स हैदराबादचा संघ पुढे आहे. त्यामुळे हा सामना तूल्यबळ होणार यात काही शंका नाही. सनरायझर्स हैदराबादकडे फलंदाजांची चांगली फळी आहे. त्यामुळे सामना फिरवण्याची ताकद आहे. दुसरीकडे, पंजाब किंग्ज संघ गोलंदाजीत बऱ्यापैकी आहे. त्यामुळे या सामन्यात काहीही होऊ शकते.

आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात पंजाब किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद हे संघ २४ वेळा भिडले आहेत. यात



सनरायझर्स हैदराबादने १४ सामने जिंकले आहेत. तर फक्त ७ सामन्यात पंजाब किंग्जने सनरायझर्स हैदराबादला पराभूत केले आहे. मागच्या पर्वात या दोन्ही संघात फक्त एक सामना झाला होता. हा सामना सनरायझर्स हैदराबादने ८ गडी राखून जिंकला होता. तर २०२४ मध्ये दोन्ही सामने सनरायझर्स हैदराबादने जिंकले होते. २०२३ मध्येही सनरायझर्स हैदराबादचे पारडें जड होते. पंजाब किंग्जने २०२२ मध्ये सनरायझर्स हैदराबादला ५ विकेट राखून शेवटचे पराभूत केले होते. पण याच पर्वातील पहिला सामना सनरायझर्सने जिंकला होता.

पंजाब आणि हैदराबाद या दोन संघांमधील २०२५ मधील सामना चर्चेत राहिला. कारण या सामन्यात स्पर्धेच्या इतिहासातील दोन सर्वोच्च धावसंख्या नोंदवल्या गेल्या. पंजाब किंग्जने ६ गडी गमवून २४५ धावा केल्या आणि विजयासाठी २४६ धावांचे आव्हान ठेवले होते. पण सनरायझर्स हैदराबादने २ गडी गमवून हे आव्हान पूर्ण केले. आयपीएल स्पर्धेतील सर्वोच्च धावसंख्या असलेला सामना ठरला. आता मागची आकडेवारी पाहता हैदराबाद पुन्हा एकदा पंजाब किंग्जला पराभवाची धूळ चारणार का? की पंजाब किंग्ज इतिहास बदलणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

## वैशाली ड्रॉसह अव्वल स्थानी पोहोचली

**नवी दिल्ली,ता.१०–**

**भारतीय ग्रँडमास्टर वैशाली रमेशबाबूने चेस कँडिडेट्स स्पर्धेच्या महिला गटातील १० व्या फेरीत युक्रेनच्या एना मुजिचुकविरुद्ध ड्रॉ खेळला. या ड्रॉमुळे मिळालेल्या अर्ध्या गुणांसह वैशाली अव्वल स्थानावर पोहोचली. दुसरीकडे, भारतीय ग्रँडमास्टर दिव्या देशमुखला रशियाच्या अलेक्झांड्रा गोर्याचकिनाविरुद्ध पराभव पत्करावा लागला.**

### दिव्या देशमुख, प्रज्ञानानंदा हरले; स्पर्धेतील ४ फेऱ्या बाकी

ओपन गटात भारताचा ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाला उझबेकच्या जावोखिर सिंदारोव्हविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवानंतर प्रज्ञानानंदा ७व्या स्थानावर घसरला. ही स्पर्धा सायप्रसच्या पाफोस येथे खेळली जात आहे. अजून चार फेऱ्या बाकी आहेत.

१०व्या फेरीत वैशालीला फारशी अडचण आली नाही आणि सामना चढ-उतारांशिवाय ड्रॉ राहिला. झू जिनेरला बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले, ज्यामुळे वैशालीला आघाडी मिळाली.



स्पर्धा अत्यंत रोमांचक बनली आहे. टॉप-६ खेळाडूंमध्ये १ गुणाचा फरक आहे. झू जिनेर आणि अन्ना मुजिचुक ५.५ गुणांसह वैशालीपेक्षा अर्धा गुण मागे आहेत. ११व्या फेरीत वैशालीचा सामना गोरियाचकिनाशी होईल, तर दिव्या झू जिनेरविरुद्ध खेळेल.

गेल्या वेळी भारताच्या डी. गुकेशने जिंकून चीनच्या डिंग लिरेनला आव्हान दिले होते. तेव्हा गुकेश कँडिडेट्स टूर्नामेंट जिंकणारा भारताचा दुसरा खेळाडू ठरला होता. ५ वेळा वर्ल्ड चॅम्पियन राहिलेल्या विश्वनाथन आनंदने १९९५ मध्ये पहिल्यांदा कँडिडेट्स टूर्नामेंट जिंकली होती. कँडिडेट्स टूर्नामेंट दर दोन वर्षांनी होते आणि विजेता वर्ल्ड चॅम्पियनला आव्हान देतो. ओपन गटातील विजेत्याचा सामना भारताच्या डी. गुकेशसोबत, तर महिला गटातील विजेत्याचा सामना चीनच्या जू वेनजुनसोबत होईल.

## रहाणेने खेळाडूंवर फोडले पराभवाचे खापर

**कोलकाता,ता.१०–**

**आयपीएल २०२६ स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्स संघाचा फ्लॉप शो सुरूच आहे. पंजाब किंग्जविरुद्ध झालेला सामना पावसामुळे धुतला गेला होता. त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी १-१ गुण देण्यात आला होता. लखनौ सुपर जायंट्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सकडे विजय मिळवण्याची नामी संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली.**

मुकुल चौधरी शेवटी फलंदाजीला आला आणि त्याने सामना लखनौ सुपर जायंट्स संघाच्या बाजूने खेचून आणला. लखनौचे ७ फलंदाज तंबूत परतले होते. पण शेवटी मुकुलने नाबाद ५४ धावांची खेळी करत संघाला ३ गडी राखून विजय मिळवून दिला.



विजय मिळवण्याची नामी संधी जिंकल्यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणे नाराज झाल्याचे दिसून आले. सामना झाल्यानंतर तो म्हणाला, हा पराभव पचवणे जरा कठीण आहे. मुकुलची खेळी टर्निंग पॉईंट ठरली. ज्या पद्धतीने त्याने ते फटके मारले ते खरेच कौतुकास्पद आहे. रहाणे म्हणाला, क्षेत्ररक्षण करत असताना १-२ चुका झाल्या, पण आमच्या गोलंदाजांनी खरेच खूप चांगली गोलंदाजी केली. सामना गमावल्यानंतर चुका काढणे खूप सोपे आहे. पण फलंदाजी करताना मी आणि अंगक्रिशने मिळून चांगली भागीदारी केली. त्यानंतर रोमन पॉवेल आणि कॅमेरुन ग्रीनने देखील चांगली फलंदाजी केली. मला तरी हेच वाटते की, या खेळपट्टीवर १८०-१८५ धावा पुरेशा होत्या. या खेळपट्टीवर मोठे फटके खेळणे सोपे नव्हते. शेवटी चेंडू थांबून येत होता. पण फलंदाजांना श्रेय द्यावे लागेल.

## खंडोबा तालीम उपांत्य फेरीत

### संयुक्त जुना बुधवार पेठवर ५-० ने दणदणीत विजय



**कोल्हापूर, ता.१०(प्रतिनिधी)–**

**सतेज चषक फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी झालेल्या सामन्यात खंडोबा तालीम मंडळने संयुक्त जुना बुधवार पेठवर ५-० असा दणदणीत विजय मिळवत स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. दोन गोल नोंदवून विजयात महत्त्वाची कामगिरी केलेला विष्णू मणिकंदम सामनावीर ठरला.**

पाटाकडील तालीम मंडळ व डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप(कोल्हापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कै. पांडबा जाधव व कै. रावसाहेब सरनाईक यांचे स्मरणार्थ सतेज चषक २०२६ फुटबॉल स्पर्धा सुरू आहे. छत्रपती शाहू स्टेडियमवर शुक्रवारी खंडोबा आणि जुना बुधवार यांच्यातील सामना पूर्णपणे एकतर्फी झाला. पूर्वार्धात प्रथमेश गावडेच्या पासवर विष्णू मणिकंदमने संघाचा पहिला गोल २६व्या मिनिटाला केला. त्यानंतर २९व्या मिनिटास कुणाल दळवीने दिलेल्या पासवर प्रताप याने गोल नोंदवून आघाडी २-० अशी केली.

पूर्वार्धातील आघाडीच्या जोरावर उत्तरार्धात खंडोबाच्या खेळाडूंनी योग्य समन्वय साधून आणखी तीन गोलची आघाडी वाढवली. त्यामध्ये विष्णू मणिकंदमने दिलेल्या पासवर रोहित जाधवने संघाचा तिसरा गोल केला. ४४व्या मिनिटाला झालेल्या या गोलनंतर ५५व्या मिनिटाला सचिन एस.ने दिलेल्या पासवर पृथ्वीराज साळोखेने गोलरक्षकाला चकवा देत गोल नोंदवून आघाडी ४-० अशी भक्कम केली. त्यानंतर विष्णू मणिकंदमने वैयक्तिक दुसरा तर संघाचा पाचवा गोल ६३ व्या मिनिटाला केला. जुना बुधवारकडून मयूर सुतार, संकेत कांबळे, प्रथमेश जाधव, सचिन मोरे, शुभम जाधव यांनी गोलक्षेत्रात चढाया केल्या पण त्याचे गोलमध्ये रुपांतर करण्यात ते अपयशी ठरले. अखेर उर्वरित वेळेत ५-० ची आघाडी राखत खंडोबाने सामना जिंकला.

**आजचा सामना : दिलबहार – फुलेवाडी : दुपारी ४ वाजता**

## केकेआरविरूध्द सामन्यात धोनी पुनरागमन करणार

**मुंबई,ता.१०–**

**आयपीएल २०२६ च्या सुरुवातीला चेन्नई सुपर किंग्ज संघर्ष करताना दिसत आहे. संघाचा आयकॉन आणि माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी पोटरीच्या दुखापतीने त्रस्त आहे, ज्यामुळे तो अद्याप मैदानात उतरू शकलेला नाही. आता चेन्नईचा पुढील सामना केकेआरविरुद्ध असणार आहे. या सामन्यापूर्वी आता धोनी बाबत मोठी अपडेट समोर आली आहे.**

स्पर्धेच्या सुरुवातीला, फ्रँचायझीने सांगितले होते की, धोनी रिहेब प्रक्रियेतून जात आहे आणि पहिल्या दोन आठवड्यांसाठी उपलब्ध नसेल. आता, त्याच्या तंदुरुस्तीबद्दल नवीन माहिती समोर आली आहे.

माध्यमांच्या वृत्तानुसार, धोनी ११ एप्रिल २०२६ रोजी चेपॉक येथील एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्सविरुद्धचा घरच्या मैदानावरचा सामनाही चुकवणार आहे. तो १४ एप्रिल रोजी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या पुढील सामन्यात पुनरागमन करेल. धोनी १४ एप्रिलच्या सामन्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त होऊन संघात सामील होईल. चेन्नई सुपर किंग्जने धोनीच्या पुनरागमनाबाबत अद्याप कोणतेही निवेदन जारी केलेले नाही.



दुसरीकडे, धोनीची अनुपस्थिती सीएसकेसाठी एक मोठे नुकसान ठरत आहे. संघाने सलग तीन सामने गमावले असून तो या हंगामातील पहिल्या विजयाच्या प्रतीक्षेत आहे. दुखापतीमुळे, धोनी आपल्या प्रकृती सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी चेन्नईमध्येच थांबला आहे आणि संघाच्या सपोर्ट स्टाफच्या देखरेखीखाली रिहेब प्रक्रियेतून जात आहे. त्याने काही दिवसांपूर्वी नेटमध्ये फलंदाजीचा सराव केला होता, परंतु तो अजूनही सामन्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त होण्यापासून दूर आहे.

## झिम्बाब्वे महिला संघ प्रथमच पाकिस्तान दौऱ्यावर

**नवी दिल्ली,ता.१०–**

**झिम्बाब्वे महिला क्रिकेट संघ आपल्या इतिहासात प्रथमच पाकिस्तान दौऱ्यावर जाणार असून, या दौऱ्यात तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामने खेळले जातील. सर्व सामने कराची येथील नॅशनल बँक स्टेडियमवर खेळवले जातील.**



आयसीसी महिला चॅम्पियनशिप २०२५-२९ चा भाग असलेली तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका ३ मे रोजी सुरू होईल. त्यानंतर १२ मे पासून टी-२० मालिका सुरू होईल.

पाकिस्तान महिला संघ सध्या महिला चॅम्पियनशिपच्या क्रमवारीत पाचव्या स्थानावर आहे. त्यांनी नुकतीच दक्षिण आफ्रिकेविरुद्धची तीन सामन्यांची मालिका १-२ ने गमावली आहे. दरम्यान, झिम्बाब्वे महिला संघ न्यूझीलंडविरुद्धची मालिका गमावल्यामुळे सातव्या स्थानावर आहे. झिम्बाब्वे संघ २९ एप्रिल रोजी पाकिस्तानमध्ये दाखल होईल आणि मालिकेची तयारी सुरू करेल.


**एकदिवसीय मालिका:** ३ मे: पहिला एकदिवसीय सामना, ६ मे: दुसरा एकदिवसीय सामना, ९ मे: तिसरा एकदिवसीय सामना

**टी मालिका:** १२ मे: पहिला टी सामना, १४ मे: दुसरा टी सामना, १५ मे: तिसरा टी सामना

## वनडे, टी-२० मालिकेतून क्रिस्टियन क्लार्क बाहेर

**नवी दिल्ली,ता.१०–**

**न्यूझीलंडच्या संघाला पुढच्या आठवड्यापासून बांगलादेश दौऱ्याची सुरुवात करायची आहे, ज्यामध्ये त्यांना यजमान संघाविरुद्ध तीन वनडे आणि ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे.**



न्यूझीलंडने या दौऱ्यावरील वनडे आणि टी-२० दोन्ही मालिकांसाठी आपला संघ बराच काळ आधी जाहीर केला होता, मात्र आता त्यांनी त्यात एक बदल केला आहे. बांगलादेशविरुद्धच्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी न्यूझीलंडने वेगवान गोलंदाज अष्टपैलू खेळाडू क्रिस्टियन क्लार्कचा संघात समावेश केला होता, परंतु दुखापतीमुळे तो आता या दौऱ्यातून बाहेर पडला आहे. न्यूझीलंड क्रिकेटने क्रिस्टियन क्लार्कबाबत जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीलंका-ए संघाविरुद्धच्या दुसऱ्या वनडे सामन्यात क्षेत्ररक्षण करताना झेल पकडण्याच्या प्रयत्नात क्लार्कच्या उजव्या हाताच्या बोटांमधील वेबिंगला (कातडीला) दुखापत झाली. यामुळे त्याला बांगलादेश दौऱ्यातून माघार घ्यावी लागली आहे.

## ब्राझीलच्या लॉरा कार्डोसोचा विश्वविक्रम

**नवी दिल्ली,ता.१०–**

**बीसीए कालाहारी महिला टी -२० ट्रॉफी स्पर्धेत लेसोथो आणि ब्राझील हे दोन्ही महिलांचे क्रिकेट संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात ब्राझीलचा संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना या संघाने २० षटकांअखेर २०२ धावांचा डोंगर उभारला. लेसोथो संघाला हा सामना जिंकण्यासाठी २० षटकात २०३ धावांचा पाठलाग करायचा होता. या धावांचा पाठलाग करताना लेसोथो संघाचा डाव पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळला.**

लेथोसो संघाचा संपूर्ण डाव अवघ्या ६.२ षटकात १३ धावांवर आटोपला. लेथोसो संघाचा डाव इतक्या लवकर आटोपण्यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे, ब्राझील संघातील गोलंदाज लॉरा कार्डोसो. या गोलंदाजाने ३ षटके टाकली. यादरम्यान तिने ९ फलंदाजांना बाद केले. म्हणजे अवघ्या १८ चेंडूत तिने ९ फलंदाजांना माघारी धाडले. यासह ती टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक ९ विकेट्स घेणारी जगातील पहिलीच गोलंदाज ठरली आहे.

याआधी टी -२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पुरुष किंवा महिलांच्या क्रिकेटमध्ये कुठल्याही गोलंदाजाला ९ विकेट्स घेता आल्या नव्हत्या. याआधी हा रेकॉर्ड पुरुषांच्या टी -२० क्रिकेटमधील भूटानच्या सोनम येशेच्या नावावर होता. त्याने ८ विकेट्स घेतल्या होत्या. तर महिलांच्या टी -२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये इंडोनेशियाच्या रोहमालियाने ७ विकेट्स घेतल्या होत्या. आता ९ विकेट्सचा रेकॉर्ड कोण मोडणार? हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे.

## करनूरचे कुस्ती मैदान बाणगेच्या ऋषिकेश पाटीलने जिंकले

### शंभराहून अधिक चटकदार, प्रेक्षणीय कुस्त्या



**कागल,ता.१०(प्रतिनिधी)–**

**करनूर (ता. कागल) येथील मरीआई, बिरदेव, हनुमान व गैबीपीर यात्रेनिमित्त कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम क्रमांकासाठी बानगेचा पै. ऋषिकेश पाटील विरुद्ध राशिवडेचा पै. प्रतीक म्हेतर यांच्यात सामना झाला. यामध्ये पायाने सिंगल नेल्सन डावावरती ऋषिकेश पाटील हा प्रतीक म्हेतर याला आसमान दाखवत चांदीच्या गदेचा मानकरी ठरला. मैदानाचे उद्घाटन युवा नेते नवाज मुश्रीफ व सेवानिवृत्त आरटीओ मोहन जाधव, कराडचे पोलीस उपनिरीक्षक अझरुद्दीन शेख यांच्या हस्ते झाले.**

दरवर्षी यात्रेनिमित्त कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीच्या कुस्ती मैदानामध्ये शंभरहून अधिक चटकदार अशा लहान मोठ्या कुस्त्यांमुळे कुस्ती शौकिनांच्या डोळ्याचे पारणे फिटले.यामध्ये ८० ते ९० किलो गटांमध्ये पै. चेतन टीकुळे विरुद्ध ऋषिकेश पाटील यांच्यात सामना झाला. घिसा डावावरती चेतन टीकुळे विजयी झाला. तसेच ७१ ते ८० किलो गटांमध्ये राजवर्धन पुजारी (मुरगूड) विरुद्ध संस्कार तोरस्कर (वारणा) यांच्यात लढत झाली. राजवर्धन पुजारी सिंगल नेल्सन डावावरती विजयी झाला. सुदर्शन पाटील (हदनाळ) विरुद्ध आकाश रोटे (यळगूड) यांच्यामध्ये तुल्यबळ लढत झाली.सुदर्शन पाटील एकचार डावावरती विजयी झाला.करनुरचे उमदे पै.संस्कार धनगर विरुद्ध आर्पण बनकर (कोगील) यांच्यात सामना झाला.त्यात संस्कार धनगर एकचार डावावरती विजयी झाला. तसेच पृथ्वी शिरोळे (करनूर) विरुद्ध मानव बनकर (हुपरी) यांच्यात लढत झाली. त्यात धक्का घिस्सा डावावरती पृथ्वी शिरोळे विजयी झाला. करनूरचा पै. संचित डुगे यांनेही चांगली कुस्ती खेळली.

माजी उपसरपंच इम्रान नायकवडी, उद्योगपती रमेश लालवाणी, प्रवीणकुमार कांबळे, सचिन घोरपडे, अनंत कांबळे यांच्या हस्ते ऋषिकेश पाटील याला चांदीची गदा व मानधन देऊन सन्मानित करण्यात आले. सर्जेराव पाटील, मारुती पोवार,शंकर कदम, संतोष मेटकर, राजकुमार बोडके, अनिल माने, भरत दंडवते, बाबुराव मालवेकर, अनिल चव्हाण, शिवाजी पाटील यांनी पंच म्हणून काम पाहिले.

यावेळी राजाराम चौगुले – खेबवडेकर यांनी निवेदक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन अशोक शिरोळे यांनी केले. यावेळी यात्रा कमिटी अध्यक्ष संदीप आमते,उपाध्यक्ष मिलिंद शेंडे, सरपंच संगीता जगदाळे, इम्रान नायकवडी, आनंदराव पाटील, जयसिंग घाटगे, वैभव आडके, सुनील गुदले, गुलाबराव पाटील, पुजारी माळू धनगर, कल्लाप्पा कोरे, समीर शेख, आण्णासो पाटील, जयवंत चव्हाण, अशोक आवळे, सुखदेव कांबळे, तानाजी जाधव, शरद चव्हाण आदींसह कुस्ती शौकीन उपस्थित होते.